चोळमंडलांत आजचे काळांतही चालून आहे ते भागवतमेळा नृत्यनाटकाबाबत्ती सर्वही जाणू असतील. तंजावर प्रांतांतील मेलटूर, शालीयमंगल, ऊत्तुक्काडु, नल्लूर, सारखें केंड्यांतही आजही भागवतमेळा नृत्यनाटकें चालवीत आहेत. भागवतमेळा नृत्यनाटकें वर जाणविल्या स्थलांत वासकरणार भागवतसंप्रदाय भागवतलोक भाग घेऊन चालवीत येनात. प्रह्लातचरित्र, रुक्मीणीकल्याण, हरिश्चन्द्रचरित्र, पार्वतीकल्याण, उषाकल्याणासारिखें नृत्यनाटकें आजहीं मेलटूरग्रामांत चालू येते.

भागवतलोक सर्व मिळून चालवीत येणें नाटकालच भागवत मेळा नृत्यनाटकें ह्मणून नावाने प्रसिद्धि झाले. मेलटूर भागवतमेळा नाटकें वेंकटरामशास्त्री ह्यानीं रचून दिल्हे, ते सर्व नाटकेंहीं प्रदर्शन केले आहेत. वेंकटरामशास्त्री रचिलेले अक्रा तेलुगुनाटकें आजचे काळांतहीं मेलटूर भागवतमेळा प्रदर्शन करीत आहेत. पंचनदभागवत रचिलेले ते तेलुगुनाटक सर्व शालीयमंगल ग्रामांत भागवतमेळा चालऊन येतात.

वेंकटरामशास्त्रीचे तेलुगु नाटकें नल्लूरग्राम भागवतमेळा चालतीकरून येतात. ऊत्तुक्काडु वेंकटसुब्बय्या रचिलेले कृस्णलीला तमिळलाटकें ऊत्तक्काडु भागवतमेळा चालवितात. ह्या लहानसे ग्रामांत वासकरणारे भागवतमेळाच मात्र चालवित येणें ते

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

नृत्यनावकेंचे प्रारंभकाल येक्कोणीस शतकांतच होय. हेत काळांतच महाराष्ट्रांत विष्णुदासभावे ह्यानी पहिलेवणी संगीतनृत्यनाटकें रंगभूमींत प्रदर्शन करविले.

सोळावाशतकांत दक्षिणभारतांत भागवतमेळा नृत्यनाटक संप्रदाय उन्नतरीतीने चालून होते. त्या नाटकांत दक्षिणदेशसंस्कृती दिसून येते, कूचिपुडि भागवताने चालऊन येणे आन्ध्रसंप्रदाय, कन्नडदेशाचे भागवताने चालऊन येणे कन्नडसंप्राय, (दशावतार नाटक भागवत बयलाटा केळणार) तमिळनाडूंत भागवताने चालऊन येणे भागवतमेळा ह्मणून, तीन संप्रदाय दक्षिणप्रांतांत दिसून येते. हे अपरूप भागवत संप्रदाय, आजचे काळांतहीं जीवत्व होऊन स्थिरस्थायीवणी आहे.

सत्रा वा शतकांचे सेवट पासून एक्कोणीम शतकाचे सुरुवात पर्यन्त तंजावर नायकराजे व महाराष्ट्र राजे निर्माण केलेले भागवतसंप्रदायाबदल, हे काळांतही लोक पूर्णवणी जाणिले नाहींत. ते आश्चर्यवणी सुधा वाटते. एक्कोणीस शतकाचे सेवटी च भागवतमेळासंप्रदाय उन्नती पावले ह्मणून अनेकाने विमर्शन करण्यांत येते. सोळावे शतकाचे सेवटीच भागवतमेळा संप्रदाय चोळमंडलांत स्थिरस्थायिवणी होते ह्मणावयाचे गोष्ट आतांतरी आह्मी चिंतू पाहावावें. हेच प्रस्तावनाचे मुख्य सार आहे.

तंजावर नायकराजे व महाराष्ट्र राजेंचे काळांत संगीतमेळा व भागवतमेळा ह्मणून दोन मेळासंप्रदाय चालूं आले. दोन विभागांत चाललेले नृत्यनाटकें तंजावर रंगभूमीत प्रदर्शन केले आहेत. नट्वांगमेळालाच हे काळांत संगीतमेळा ह्मणून सांगण्यांत येथे. संगीतमेळांत वाद्यवाजविणार, गायक नृत्यस्त्री आणी नट्वनार (नाडयाचार्य) असतील. संगीतहीं नृत्यहीं उन्नतवणीने आहे त्याकरितां 'संगीतमेळा' ह्मणून सांगण्यांत आले. नट्वानारालामात्र प्रधानस्थान मिळाला त्याला नट्वांगमेळा ह्मणून नूतन नामाने प्रसिद्ध केले.

हे नट्वांगमेळाने चालऊन येणे नाडचला आजचे काळांत '**भरतनाट्य**' ह्मणून बोलण्यांत आले. हे नाटचमेळ तंजावर राजेंचेवेळी संगीतमेळा ह्मणूनच बोलण्यांत आले, राजेवर रचिलेले नरस्तुती नृत्यनाटकें सर्व, हे संगीतमेळा चालविणार नाट्याचार्यी नेच चालऊन, भागघेऊन आले आहेत. भागवतमेळा नृत्यनाटकें आजचे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

काळांतहीं आह्मास मिळते, तरि राजेवर रचिलेले नरस्तुतीनाटकें आजचे काळांत पाहणेस मिळतनाहीं.

मन्नारुदासविलास, रघुनाथाभ्युदय, विजयराघवकल्याण, विजयराघवचन्द्रिकाविहार ह्मणावयाचे तेलुगु नरस्तुती नृत्यनाटकें सर्व विजयराघवकळांतील संगीतमेळा नाट्याचार्यानीहीं भागघेऊन चालवून आले अहेत. हेमाब्जनायिकास्वयंवर, विप्रनारायण चरित्र श्रीकृष्णविलास हे भक्तिस्तुती तेलुगुनाटकें संगीतमेळानीच भागघेऊन चालवीत आले आहेत. नायकराजेचे काळांत संगीतमेळानी नरस्तुति नाटकहीं व भक्तिस्तुति नाटकहीं चालून आणविले ह्मणावयाचे विषयीं संशयनाहीं.

रघुनाथनायक रुक्मिणीकल्याण जानकीपरिणय ह्मणावयाचे यक्षगाननृत्यनाटकें रचिले. रघुनाथनायक हे दोननाटकें स्वथा रचून रंगभूमीत प्रदर्शन केल्यांकरितां, अच्चुतप्पनायक त्यांचेपुत्र रघुनाथनायकाला, गौरवकरावे हे हेतूने राजसभामध्यें कनकाभिषेक करविले. रघुनाथनायक नृत्यगीतासारखें नृत्यकलांत प्राज्ञवणी होते. त्यायप्रमाण रघुनाथनायकाचातनय विजयराघवनायकहीं नाटक रचण्यांत निपुणत्व पाऊन तेलुगुभाषांत अनेक नृत्यनाटकें रचिले.

तंजावर नायकराजेंचे नृत्यनाटकेंत दरु, पद्य, गीत, कैवार, सलांदरु, दंडक, चूर्णिका, द्विपद, वचन, हेच्चरिकादरु, विरहपद, इत्यादि सारखें रचना असतील, नायकराजेंचे दर्भारांत चालिले नाटचांत शब्द, वर्ण श्रृंगारपदनृत्य कुंदकक्रीडा गूर्ज्जरीनृत्य, पेरणीनृत्य जक्किणीनृत्य रासक्रीडा, दंडलास्यनृत्य, सारिखें बहुनृत्याला उपयोगपडनार साहित्यकृती घेऊन वायानी नाटचाभिनय करतील ह्मणून रघुनाथाभ्युदय, राजगोपालविलास हे दोन काव्यांतहीं जाणविला आहे.

रघुनाथपुर अच्चुतपुर ह्मणून राजें त्यांचे नावाने अग्रहार करून भागवतलोकाना सर्वमान्य करून दिले. त्या भागवतमेळालोक त्याग्रामांतच भागवतमेळानाठकें चालऊन आलें. काळांतरी ते नाटकें क्षीणत्व पावले. पौराणिककालांत कृष्णचैतन्यभक्तींत मग्न झालेले महानलोकांस भागवत ह्मणावयाचे नावाने संवोधन करण्यांत आले.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पुण्डरीक पराशर व्यास अंबरीष शौनक सनकसनन्दन प्रह्लाद आणि नारद तुंबुर हे सर्व श्रीविष्णूचे परमभागवत भक्तलोक होय. त्यांस भागवतोत्तम सत्पुरुष-ह्मणून जाणवितात. ते महानलोकच भारतदेशांत पहिलेवणी चैतन्यभक्तीला मान्य करून, ते भक्ति प्रदर्शन करायाला श्रृंगारभक्तींत अनेक काव्य रचना करण्यांत आले. गीतगोविन्द रचिलेले श्रीजयदेवकवि हे मार्गांतच आले. आजहीं गीतगोविन्द प्रबन्धाला भारतदेशांत एक उन्नतस्थान देवून गौरव केले आहेत.

भारतदेशाचे उत्तर भागांत झालेले गीतगोविन्द संप्रदाय, काळांतरी दक्षिण-भागांतही पसरून झाले. ते आज पाहणेस समजून येते. हे संप्रदायमहत्व दक्षिणदेश भागवतलोक जाणून ते गीतगोविन्द प्रबन्धाला अनुसरून भजनोत्सव संप्रदायवणी नृत्यगीताने चालऊन, चैतन्यभक्ति संप्रदाय अनुष्टानांत आणविले. त्यानंतर दक्षिणदेशांत चैतन्यभक्ति रचना दक्षिणभाषांतच अनेकगीत प्रबन्ध रचण्यांत आले. त्याला उदाहरणवणी झालेले ते कूचिपुडी आणि तमिळनाडु भागवतमेळा हे दोन संप्रदाय आलेले चैतन्यभक्तीच ह्मणून सांगणे वरे होईल.

विजयराघवनायक तंजावर प्रांतांतील मन्नारगुडी क्षेत्रांतील श्रीराजगोपाल ह्मणावयाचे श्रीकृष्णावर अतीत भक्तीने होते. त्याकरितां त्यादेवाचे नाव घेऊन स्वता त्यानी मन्नारुदास ह्मणून नाम संबोधन करून घेतले. हे मन्नारुदास ऊर्फ विजयरागवनायकराजे त्यांचे कृष्णचैतन्यभक्ति प्रदर्शनकरण्यासाटीं कृष्णलीला वर अनेक नाटकें तेलुगु भाषांत रचिले. गोवर्धनोद्धारण, रतीमन्मथ, रासक्रीडा, नवनीतचोर, पारिजातापहरण, रुक्मिणीकल्याण, राधामाधवविलास, प्रह्लादचरित्र, पूतनाहरण, समुद्रमथन, प्रणयकलह, कृष्णविजय [कंसवध], जानकीपरिणय, विप्रनारायणचरित्र, पुण्यकव्रत हे इत्यादि कृष्णलीलाविनोद नाटकें रचून त्यांचे कृष्णचैतन्यभक्ती प्रदर्शन केले. हे विजयराघवराजाचे नामस्मरण येतें कारणें उचित.

विजयरागवनायक श्रीराजगोपाल देवाकरितां तेलुगु भाषांत गोपीगीत, भ्रमरगीत, विरहपदें, गोपालदण्डक, चूर्णिका, दूतपदें, आरजपदें, श्रृंगारपदें, दण्डलास्यपद, संवाददरु इत्यादि बहु चैतन्यभक्तिरचना कृतीं (जोलवर्णना साहित्यकृतीं) रचिले.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रह्लादचरित्र नाटकांत हे रचन्याविषयीं जाणविला आहे. हे प्रह्लादनाटक भागवत संप्रदायनाटक होय.

रघुनाथनायकाचे काळांत एक भागवत संत होऊन गेले. ते शिवनारायणतीर्थ ह्मणनार तंजावर प्रांतांत वरहूर ह्मणावयाचे ग्रामांत कृष्णमंदिरांत कृस्णचैतन्यभक्ति वाडविलें. त्याचे कृष्णलीलातरंगिणी नृत्यगीत, आजचे काळांतहीं भागवतलोक भजनोत्सवसंप्रदायांत आचरण्यांत आहे.

सत्रावाशतकांत दक्षिणदेशांतील कवीने मधुरभक्तिकविता त्यांचे मातृभाषांत रचिले. त्यांत शृंगारभक्ति रुची समृद्धीवणी होते. कांहीं कवीने त्यांस आदर सत्कार केलेले धनवंतावर मधुरकविता रचनाहीं (नरस्तुती शृंगारभक्तिरचना) केले. हे शतकांतच मधुरभक्ति रचनांत प्रधानस्थान मिळाले ह्मणून सांगूया. गीतसुंदरम्, शिवगीतिमालिका, रामाष्टपदी, शिवाष्टपदी सारखें मधुरभक्ति कविता रचण्यांत आले.

हे सत्रावाशतकांतच क्षेत्रज्ञ ह्मणावयाचे एक कृष्णचैतन्यभक्त तंजावर विजयराघवनायकाचे दर्भारांत अलंकारवणी असून शृंगारपदरचना केले. तमिळनाडूंतील अनेकराजेंचे दर्भारांत असून क्षेत्रज्ञकवि शृंगारपदरचना केले. जिंजी कृष्णप्पनायक, मधुरानायक, तंजावर विजयराघवनायक सारखें नायकराजे, त्यांचे राजसभाला क्षेत्रज्ञकविला बलाऊन आणून गौरव केले आहेते. हे इतिहासांत जाणविला आहे.

क्षेत्रज्ञानंतर तंजावरांत चैतन्यभक्ती दाखविणेस अग्रस्थानांत राहिले ते तंजावर शाहजीराजाच होय. शाहजीराजा अद्वैतमार्गांत राहिल्यामुळें शिवभक्ती आणि वैष्णवभक्ती हे दोनीहीं एकचवणी भाविले. त्याभावनांतच चैतन्यभक्ती प्रदर्शन करणेस मधुरकविता रचून दाखविले. शाहजीराजे बहुभाषाप्रवीण झाल्यामुळे तेलुगु मराठी संस्कृत आणि हिंदूस्थानी हे भाषांत मधुरकविता रचिले. तसेच शाहजीचे राजदर्भारांत भूषणवणी होतेते बहुभाषा कविलोक शाहजीवर मधुरभक्ति कवित्व रचून त्यांचे चित्त रंजविले.

शाहजीराजे मधुरभक्ती प्रदर्शन करून रचिलेले नाटकें शंकरपल्लकीसेवाप्रबंध व विष्णुपल्लकीसेवाप्रबंध हे दोन होय. तिरुवारूर त्यागेशावरहीं, विष्णुपल्लकीसेवा-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रबंध मन्नारगुडी राजगोपाल देवावरहीं रचिलेले, नाटक प्रवंधहीं पंचरत्नप्रबंध वणी लिहिलेले विषेष नाटक त्यागाराजावर उद्धेशून लिहिलेले संगीत नृत्यनाटक हे तीन नृत्य-नाटकें शाहजीराजे समोर संगीतमेळकर्ता स्त्रियाने प्रदर्शनकरून दाखविले आहेत. आणि शाहजीराजे रचिलेले तेलुगु मराठीं श्रृंगारपदरचना घेऊन हे वायानी अभिनयकरून दाखविले आहेत.

शाहजीराजे मराठींत रचिलेले नाटकें, लक्ष्मीनारायणकल्याण, लक्ष्मीभूदेवीसंवाद, गंगाकावेरीसंवाद, हरिहरविलास, सुभद्राकल्याण, त्यागराजविलास, मृत्युञ्जयचिरंजीवि-विलास (मार्कण्डेयचरित्र) त्यागराजविनोदचित्रप्रवन्ध (शंकरकाळीनटनसंवादनाटक) इत्यादि होय.

शाहजीराजे तेलुगुभाषांत रचिलेले नाटकें, शंकरपल्लकी सेवाप्रवन्ध, विष्णु-पल्लकीसेवाप्रवन्ध, किरातविलास, पार्वतीकल्याण, गंगापार्वतीसंवाद, रुक्मिणीसत्यभामा-संवाद, द्रौपतींकल्याण, श्रीकृष्णविलास, जलक्रीडा, सतीपतीदानविलास, सीताकल्याण, विघ्नेश्वरकल्याण, वल्लीकल्याण, सरस्वतीकल्याण, शचीपुरंदरनाटक, शांताकल्याण, सतीदानसूर, रतीकल्याण, पंचरत्नप्रवन्ध, पंचभाषाविलास इत्यादि तेलुगुनाटके शाहजी रचिले. तमिळभाषांतही कावेरीकल्याण नाटक शाहजी रचिले. चन्द्रशेखर विलास ह्मणून संस्कृतांत शाहजी एकनाटक रचिले आहेत. व्रजभाषांत विश्वातीतविलास व, राधावंशीधरविलास ह्मणून दोन नाटक शाहजी रचिले आहेत.

शाहजीराजेंचे काळांत, संगीतमेळकर्ताह्यानी तमिळ, तेलुगु, संस्कृत मराठी, इत्यादि भाषांत अद्वैत श्रृंगारपद साहित्याला, अभिनयकेले आहेत. ह्या श्रृंगारपद रचिलेले कविलोक, वासुदेवकवि, गिरिराज वालकविसुब्वणा, रामकवि, सोमकवि, मुत्तुक्कवि, रुक्मांगदकवि, त्र्यंवककवि, चोक्कनाथकवि, सप्तऋषिकवि ह्यासारिखें वहुभाषाकविलोक होय.

शाहजीराजेंचे काळांत शाहजीराजकुरवंजी, चन्द्रहासविलास, भूलोकदेवेन्द्रविलास, विष्णुशाहराजविलास, अतिरूपवतीकल्याण, शंकरनारायणकल्याण, त्यागेशकुरवंजी, मोहिनिविलासकुरवंजी, शाहराजविलास, राजमोहनकुरवंजी, चन्द्रशेखरविलास पंचकन्या-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

परिणय, राजकन्यापरिणय (तेलुगु) लीलावतीशाहरालीयमु हे तेलुगुभाषांतही, राजकन्यापरिणय मराठींतही रचण्यांत आले.

शाहजीराजे लिहिलेले नाटकरचनापद्धती. शाहजींजे नाटकांत पहिले तोडयमंगळदरु, शरणुदरु, मंगळदरु, विनायकपात्रप्रवेशदरु, नाटकपात्रप्रवेशदरु, पात्रसंवाददरु, सल्लांदरु, विरहाभिनयपद, हेलापद, चांदपद, हावभावपद, दूत्यपद, कुरवंजीदरु, द्विपदें, वृत्त, चूर्णिका, दण्डक, हेच्चरिका, शोभनदरु, जक्किणीदरु, ह्या सारखें पदरचना घेऊन नाटक बसविले आहेत.

शाहजीराजे नायकराजांचे संप्रदायपद्धतीला वाट लाऊनच हे नाटकरचनासर्व केले आहेत. ह्मणऊन सांगणे बरें होईल. शाहजीनंतर पहिले शरभोजीराजे काळांत संस्कृत काव्यनाटकेच रचण्यांत आले. नृत्यनाटकें काहीं रचण्यांत आले नाही. पहिले शरभोजीचे दर्भारांत गिरिराज ह्मणनार तेलुगुकवि लीलावतीकल्याण ह्मणावयाचे नरस्तुति नाटक राजाकरितां तेलुगु भाषांत रचिले.

पहिले शरभोजीराजे नंतर त्याचा बंधू तुळजाराजे राजरंजनविद्याविलास ह्मणावयाचे वेदांतपरनाटक तेलुगुभाषांत रचिले. तुळजाराजे नंतर त्यांचे वडील मुलगा बावासाहेब ह्मणनार एकोजीराजे विघ्नेश्वरकल्याण तेलुगुभाषांतरचिले अणि कमलाम्वात्यागेशपरिणय व शाकुन्तलनाटक हे दोन नाटकेहीं मराठीभाषांत रचिले. एकोजीचे पत्नी सुजानबाई, गिरिराजकवि वेंकटगिरि कवि सारिखें तेलुगुभाषा भागवतमेळा गोष्टीला गौरव करावे ह्माहेतूने एक अग्रहार सर्वमान्यकरून त्याला एकोजीराजपुर ह्मणून नामठेविले.

बावासाहेबराजे तेलुगुभाषांतहीं पदरचना केले आहेत. त्यांचा नामावर आहेते द्विपदरामायण नीतिपद साहित्य आह्मास पाहणेस मिळते. बावासाहेबानंतर प्रतापसिंहराजे नाटकरचण्यांत श्रद्धाघेऊन होते. सुप्रसिद्ध माधवस्वामीचे ज्येष्टपुत्र रामपंडित ह्यांचे काळांत प्राज्ञवणी असून ग्रंथरचना केले. रामपंडित काव्य, नाटक अलंकार, व्याकरण, अद्वैत, मीमांसा शास्त्रांत निपुणवणी होते. पंडितानी रामायण, भागवत, भारतासारखें ग्रंथेहीं टीकावणी लिहिले आहेत. रामपंडितानी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कर्णाटकसंगीतांत प्राज्ञवणीहोते. ह्यानी पहिलातुळजाराजे, एकोजी ऊर्फ बावासाहेब प्रतापसिंहासारखें राजेचे दर्भारांत भूषणवणी होते.

रामपंडित नाटक रचण्यांत श्रद्धाघेऊन अनेक मराठीनाटकें लिहिले. ते नाटकेंसर्व त्यांचे आश्रित प्रतापसिंहराजेवर अंकित केले. पार्वतीकल्याण, रुक्मिणीकल्याण, प्रभावतीपरिणय उषाकल्याण, सीताकल्याण, जांबवतीपरिणय, अनुसूयोपाख्यान, ध्रुवचरित्र, रुक्मांगदचरित्र, प्रबोधचन्द्रोदय, पारिजातपहरण, जानकी-सुखोल्लासकुरवंजी, प्रतापरामकुरवंजी, जानकीसुतविजय ह्यासारिखें नाटकें मराठी भाषांत रामपंडित रचिले आहेत.

रामपंडित रचिलेले नाटकेंसर्व श्रीप्रतापरामसन्निधींत, उत्सवकालांत प्रदर्शन-केल्यासारिखें समजून येते. रामपंडिताचे नाटकें सर्व इतिहासपुराणसंमतीने रचण्यांत आले. रामपंडित समर्थरामदास संप्रदाय असलेतरिहीं रामभक्ती बरोबर व कृष्णचैतन्य भक्तीहीं ह्याभावनाने दाखविले आहेत. तसेच रामभक्तींत मग्न झालेले प्रतापसिंहराजेहीं कृष्णचैतन्यभक्तीने अनेक पदरचना केले आहेत. द्रौपदीवस्त्रापहरण, गोपीवस्त्रापहरण, रासक्रीडा, पूतनामोक्ष, इत्यादि साहित्यरचना प्रतापसिंहराजेंचे नामावर लिहिले आहेत.

प्रतापसिंहराजेनंतर दुसरा तुळजाराजेचे दर्भारांत अनेक संगीत पंडित असून भूषण केले. हे राजे त्यांचे पूर्वजांचे नाटकरचना सर्वहीं रंगभूमींत चालविले. हे राजेचे काळांत भागवतमेळा उत्सवसंप्रदाय नाटक चालून झाल्यांसारखें समजून येते. अमरसिंहराजेचे काळांत मातृभूतय्या, ह्मणनार तेलुगुकवि रचिलेले पारिजातापहरण ह्मणावयाचे तेलुगु नाटक राजसभेंत प्रदर्शन केले आहेत.

दुसरा शरभोजीराजेचे काळांत मोहिनीमहेशपरिणय, गंगाविश्वेश्वरपरिणय, गणेशविजय, गणेशलीलार्णवकुरवंजी, राधाकृष्णविलास ह्यासारिखें मराठीनाटके तंजावर रंगभूमींत प्रदर्शन केले आहेत. शरभोजीराजे संगीत व नृत्यनाटकावर विशेषश्रद्धा घेऊन होते. त्यांचे आश्रित कविलोक उटके गोविन्दाचार्य, विरूपाक्षकवि, रंगनाथकवि इत्यादि होते. ह्याकविलोकाचे आश्रितामुळें शरभोजीचे काळांत अनेक संगीत नृत्यनाटकें

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

व नृत्यपदें इत्यादि ग्रंथें रचण्यांत आले. भागवतमेळासंप्रदाय चालविणार हे भागवतमेळाहीं राजेचे काळांत राजवाड्यांतील रंगभूमींत अति उन्नतरीतीने चालविले आहेत.

दुसरा शरभोजीचे पुत्र शिवाजीराजेचे नामावर अन्नपूर्णापरिणय ह्मणावयाचे एक तेलुगुनाटक पाहणेस मिळते. ते तंजावर कोंकणेश्वर देवालयाचे उत्सवकालांत प्रदर्शन केल्यांसारखें, आणि ते अन्नपूर्णा नाटक, तंजावर शगर भागवतमेळा भागवताने भाग घेऊन चालविले आहेत. ह्मणून आधारपूर्व, ते अन्नपूर्णा नाटकाचे ताडपत्र तेलुगु भाषांतील ग्रंथावरुन समजून येते.

प्रतापसिंह, दुसराशरभोजी, व शिवाजीराजे ह्यांचें काळांत प्रदर्शन झालेले नाटकें सर्व तंजावर भागवतमेळा भागवतानेच प्रदर्शन करण्यांत आले आहे. हे विषय ग्रंथालयांतील ताडपत्रावरील तेलुगुलिपी नाटकावरून समजून येते. ते नाटक ग्रंथें प्रतकेलेले भागवतमेळांतील, अमृतकवि, तुळसीअय्यंगार ह्यानी जाणविलेलेवरुन समजून येते. काही नटकांत तेलुगु भागवत नाट्यांची नावसुधा जाणविला आहे.

ते विकटकवि वेंकटसुब्बय्या, मीनाक्षीसुंदरं, आहोबिलसुंदरं, सुब्बुकुट्टि, वैद्यनाधुड्डु, सारखें लोक मराठीनाटकांत मुख्य पात्रवेष घेऊन नृत्य प्रदर्शन केले आहेत. मीनाक्षीसुंदरं अहोबिलं, सु,बुकुट्टी सारीखें नटानें नाटकांत स्त्रीपात्र वेष घेऊन नृत्य प्रदर्शन करविले आहेत.

मराठींभाषा नाटक सर्व तेलुगुलिपींतील भागवतमेळा भागवतलोकच भाग घेऊन तंजावरांत प्रतापसिंहराजेपासून शिवाजीराजेचे कालपर्यंत तंजावर रंगभूमींत मराठी संगीत नृत्यनाटकें प्रदर्शन करून हे नाटककला जीवण्यांत ठेविले होते. हे गौरव मानणे अति मुख्य आहे. ह्यांचाविना नाटक प्रतिकेलेले बावत्ती, प्रदर्शन केलेले बाबत्तीं मराठीं लिपींत एकहीं ग्रंथ आधारपूर्ववणी पाहणेस मिळत नाही.

आतां येथें छापिलेले पांच नांटकांची कथाबावत्ती कांहीं संक्षेपमाहिती खाले देण्यांत आले आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मृत्युंजयचिरंजीव नाटक –

सुप्रसिद्ध मार्कण्डेयक्षेत्र तंजावरप्रांतांत तिरुक्कडैयूर ह्मणावयाचे ग्रमांत अमृतघटेश्वर नावने शिवलिंगदेवस्थान आहें. ह्या अमृतघटेश्वर देवावर शाहजीने भक्ती ठेऊन ह्यांचे चरित्र येथें नाटकवणी लिहिले आहेत. श्रीमद्भागवत व मार्कण्डेयपुराणांतील आधार कथाभाग घेऊन हे प्रस्तुत नाटक लिहिले आहेत.

मृकंडुमुनिदंपत्ती आपणास संतानप्राप्ति नाही ह्मणून खंत्य पाऊन ईश्वराचे अनुग्रहाने पुत्रप्राप्ती होईल ह्मणून दृढभावाने दोहेहीं मिळून शिवाला उद्देशून तपकेले. मृकंडुमुनीचे तपास संतोष झालेला परमेश्वर मुनीचे समोर प्रत्यक्ष होऊन 'वर माग ह्मणाले'. दंपत्ती आपणास पुत्रप्राप्ती व्हावे ह्मणून प्रार्थिले. ईश्वर मुनीस पाहून तुह्मास शतायुवर्षाचे मूढपुत्र पाहिजेकाय, अथवा सोळावर्षाचे सगुणपुत्र पाहिजेकाय ह्मणाले. दंपत्ती सुपुत्र मागीतले.

ईश्वर तथास्तु ह्मणून अदृश्य झाहले. ईश्वराचे परिपूर्ण अनुग्रहाने काहीं काळांनंतर मृकंडुमुनीचे पत्नी मरुद्वती गर्भधारण होऊन पुत्ररत्न प्रसविली. ईश्वराचे प्रसादाने उपजला पुत्रास विधिप्रकारें मार्कण्डेय ह्मणून नाम ठेविले. सगुणपुत्रासह मृकंडुदंपत्ती ईश्वराचे सेवा करीत होते. मार्कण्डेय विद्यापारंगत होऊन शिवभक्ती करीत होते. ते पाहून मृकंडुदंपत्तीस खेदवाटला. पूर्वी शिवाचे वचनाप्रकार बाळास सोळावावर्ष पूर्तीहोणार आहे. माघे त्याचे गती कायहोईल ह्मणून विचारकेले. वडीलांचे दुःख पाहून मार्कंडेय प्रश्न केलाकीं "कां तुह्मी दुःखित दिसतात, ते मला सांगा" असे मार्कण्डेय ह्मणाला. "मार्कण्डेयास शिवाचे वर सांगून, तुला सोळावें वर्षी पूर्ति होतां. तुझे जन्म सरेल, हे चिंतून आह्मी दुःखभोगतों" असे दंपत्ती ह्मणाले. वडीलाचे वाक्य ऐकून मार्कंडेय 'मी परमेश्वराकडे माझे पूर्णआयुष्य मागेन, तुह्मी मला आंशीर्वद करावे' ह्मणून सांगून सर्व शिवक्षेत्राला यात्राकरून शिवस्तोत्र करित आहे.

यात्रा संपऊन अमृतघटेश्वरक्षेत्रास परत येऊन शिवास उद्धेशून स्तोत्रकरितो. ते काळी त्याचे सोळा वर्ष पूर्ती होण्यांत आले. रीतीप्रमाणे मार्कण्डयाचे जीव

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

घेणेस काळ आला. ते वेळी मार्कण्डेय अमृतघटेश लिंगास आलिंगन करून स्तोत्र करिताझाला. यमधर्मराजा याचावर पाश घालणे करितां शिवलिंगालहीं मिळून पाश घालितां हे वेळी परमेश्वर लिंगांतून आविर्भाव होऊन मार्कंडेयास 'चिरंजीव भवा' ह्मणून आशीर्वाद केले. ते पाहून मृकुंडदंपत्ती संतोष होऊन स्तोत्र करितेझाले.

शाहजी राजेस पुत्रसंतान झाले नाही. त्या बाबत्ती ईश्वराचे अनुग्रहाने पुत्रप्राप्ती होईल ह्मणून चिरंजीवपद घेतलेले हे मार्कंडेय भक्ताचे चरित्र नाटकरूपाने लिहून अमृतघटेश ईश्वराचे पादकमली सर्मपिले असें समजतें.

कमलांबा त्यागेशपरिणय नाटक –

संस्कृतांत आहे ते कमलालयमहात्म्यांत कमलांबात्यागेशपरिणय ह्मणावयाचे पुराणसंबंधी पाहणेस मिळते. तिरुवारूर क्षेत्रांतील त्यागेश ह्मणावयाचे परमेश्वरहीं कमलांबा ह्मणावयाचे पार्वतीदेवीहीं लग्न करूनघेतल्यांसरिखें रचिलेले एक लहान नाटक होय. बाबासाहेब ह्मणणार एकोजीराजे त्यांचे शिवभक्ती प्रदर्शन करावया निमित्ताने लिहिलेले कल्पित नाटक ह्मणून समजून येते. कथाभाग ह्मणिजे, देवेन्द्र आराधना केलेले वीथीविटंक त्यागेशमूर्तीला देवलोकाहून बक्षीस ह्मणून, मुचुकंदचक्रवर्त्तीने इन्द्राकडेहून घेऊआणून ह्या कमलालयक्षेत्रांत स्थापना करून आराधना केले. कमलालयक्षेत्रांतील कमलांबा ईश्वराला लग्नकरूनघ्यावे, ह्या उद्धेशाने तप करिते. त्या तपाला संतोषमानून त्यागेशमूर्ती प्रत्यक्षझाला. त्या त्यागेश ह्मणावयाचे ईश्वरहीं व कमलांबा ह्मणावयाचे देवीही लग्नन करून घेतात. ते समारंभच हे नाटक होय.

पार्वतीकल्याण नाटक –

पार्वतीकल्याण ह्मणावयाचे नाटककथाभाग स्कांधमहापुराणांत पाहणेस मिळते. आणि वराहपुराण, शिवपुराणासारिखे पुराणांतहीं पार्वतीकल्याण कथाबाबत्ती जाणविला आहे. काळिदास महाकविहीं कुमारसंभव ह्मणावयाचे काव्याचाद्वारा हे पार्वतीपरिणयबाबत्ती वर्णन केलेआहेत. वर जाणविला पुराणाचे आधाराने कवीने पार्वतीपरिणय कथाभाग नाटकरूपाने रचिले आहेत.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शाकुंतल नाटक –

महाकवि काळिदासांचे शाकुंतलनाटककाव्याचे आधाराने हे शाकुंतलनाटक रचिले आहेत. हे शाकुंतलनाटक कथा लोकप्रसिद्धहोऊन आहेतच.

मीनाक्षीकल्याण नाटक –

मीनाक्षीकल्याण ह्मणावयाचे नाटक हालास्यमहात्म्यग्रंथांत पाहणेस मिळते. ते हालास्यमहात्म्यग्रंथाचे आधाराने कवी येथें मीनाक्षीकल्याण नाटक ह्मणून रचिले आहेत. पूर्वीं दक्षिणदेशांत राज्यभार केलेले मलयध्वजपांड्य व कांचनमलिका ह्यादंपत्तीस दैवानुग्रहाने एकमुली तटाकांत मिळते. ते बाळाला तटातकी ह्मणून नमठेऊन प्रेमाने पालन करितात.. हे तटातकी पिद्यापांरगत होऊन होती युक्तवयांत तीचा चिंतन शिवभक्तींत मग्न होऊन शिवालाच वरावे ह्मणून तप करिते झाली.

त्यानंतर मीनाक्षी लोकदिग्विजय करावया ह्याहेतूने पांडयसेनाघेऊन निघाली. अष्टदिक्पालकासहीं जिंकिली ईशानदिशाचे अधिपति ईश्वरास उद्धेशून बाण सोडितां, ते जाणिलेले प्रथम ईश्वरगण नंदीश्वर, तटातकी बरोबर युद्ध करून हरतो. ते जाणिलेले ईश्वर तटातकी समोर उभीराहतो. समोर उभीराहिलेले ईश्वरास पाहून, त्याचा रूपलावण्यांत मग्न होऊन, हाच अमचापती ह्मणून संतोष मानली तटातकी. ह्यासमई ईश्वर आणि तटातकी परस्पर मोहांधकार पावले. दोघेचे स्थिती जाणिलेले कांचनमालिका एक शुभदिनी लग्नाचे कार्य सर्व निश्चय करून ईश्वरास तटातकी ह्मणावयाचे मीनाक्षीला देऊन लग्न करविले. लग्न समारंभ थाटाने चालून झाले.

माझा मातृभाषा तेलुगु असलेतरी संगीत व नृत्यनाटक ह्याकलावर मला आहेते रुचि व प्रेमाने, मी ग्रंथालयांत आहेते अनेक संगीत व नृत्यनाटक साहित्य-ग्रंथेंहीं पाहण्यांत आले. माझे गेल्या पंचेवीसवर्ष ग्रंथालयाचे सेवेंत, मी मराठी नाटकरचनाला, कांही केलेपाहिजे ह्मणून चिंतिलों. ते आतां फळास आले. मला आहेते मराठीसाहित्यावरची रुचीमुळें मागे नाटकें संपादन करणेंस सिद्धझालों. आतां मराठी साहित्याला मी काहीं अल्पसेवा केलों ह्मणून समाधान पावतों.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

हे नाटकांत व प्रस्तावनांत काहीं चुकी घडल्या असेल ह्मणिजे त्यास क्षमा मागतों. प्रेमानी साहित्याचे रुचीमात्र घेऊन आह्मास गौरव करावे ह्मणून प्रार्थना करून प्रस्तावना पूर्ती करितों.

हे मराठीनाटकें मला प्रसिद्ध करणेस परवानगी दिल्याबदल ग्रंवालयाचे कार्यकारिणीसमितीस मी आभार मानतों. हे मराठीनाटकें प्रसिद्ध करणेस मला उत्साहाने सहाय करून व भूपाली लिहून मदत केलेले ग्रंथालायाचे मराठीपंडित श्रीमंत टि. आर. भीमराव यांस मीं ऋणी आहे. ग्रंथ शुद्धिने छापून दिल्याबदल आणि सर्वांने सहाय केल्यावदल ग्रंथालयाची नौकरीलोकासहीं मी आभार मानतों.

ना. विश्वनाथन्.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

॥ विषयसूचिका ॥

			पत्र संख्या
PREFACE	...	...	- 1 -
முகவுரை	...	...	- 3 -
प्रस्तावना	...	...	- 5 -
राजांचे नाटकें			
१ मृत्युञ्जयचिरंजीवनाटक	-शाहराजा	...	1 — 40
२ कमलाम्बात्यागेशपरिणय	-बावासाहेब, एकोजी II		41 — 54
३ शाकुन्तलम्	,,	...	55 — 78
४ पार्वतीपरिणय	-प्रतापसिंहराजा	...	79 — 126
५ मीनाक्षीपरिणय	-शरभेंद्रभूपाल	...	127 — 160

तेलुगु हस्तलिखितग्रंथांची क्रमसंख्या —

1. M *480* to *485*   *3.* M *606* to *609*   *5.* M *661*

2. M *695*   *4.* M *660*

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

OUR

MARATHI PUBLICATIONS

* * *

Bhonsle Vamsa Charita	Rs.	12	00
Srimad Bhagavatha Skandha I	...	1	50
Baktha Vilasa	...	10	00
Dance Pieces in Marathi	...	6	00
Devendra Kuravanji	...	1	25
Gaja Sastra	...	1	50
Satyasandha Vijaya	...	1	25
Krishna Manjari	...	1	25
Krititraya	...	6	00
Loka Geet	...	1	00
Mahabharatha (Virataparva)	...	11	00
Mallari Mahatmya	...	8	00
Ramamirtha Taranga	...	3	50
Rajakanya Parinaya	...	5	00
Sri Ramadinacharya	...	6	00
Thanjapuri Mahatmya	...	8	00
Thyagaraja Mahatmya	...	4	50
Thyagesapada	...	4	00
Sri Ranganatha Mahima	...	8	50
Sri Gurudasa's Nirupana Gutcha		20	00
Sri Radhakrishna Vilasa and Mohini Mahesa Parinaya Natakam	...	2	00

*

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

॥ श्रीः ॥

॥ पांच मराठी संगीत नृत्य नाटकें ॥

॥ १. मृत्युञ्जयचिरञ्जीव नाटक ॥

श्री शाहजी राज कृत.

तोडयमंगळदरु. राग : नाट – झंप ताळ.

जय पार्वतीरमण जय पन्नगाभरण
जय सुरनुतचरण जय दीनतरणा ॥ प ॥

जय अखिलनुतचरण जय अनंगहरण
जय असुरसंहरण जय दुरितशमना ॥ अ प ॥

जय रविशशिनेत्र जय राजराजमित्र
जय सुनामपवित्र जय सुचारित्र
जय मुनिकृतस्तोत्र जय कर्पूरगात्र
जय सदावासगोत्र जय सुन्दरवक्त्र ॥ -१

जय नारदादिगेय जय जक्तविधेय
जय गिरिजार्धकाय जय अमरराय
जय [1]शमित अरिमाय जय शुभोत्कर्षध्येय
जय भवनीसहाय जय नमश्शिवाय ॥ -२

1. स्मित.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मंगळदरु. राग : गुम्मकांबोदी – त्रिपुटताळ.

महालक्ष्मी वल्लभाय मंगळं
जय [1]महनीयचरिताय मंगळं ॥ १ ॥

राजीवलोचनाय राकेन्द्रवदनाय
आजि जितदैत्याय मंगळं ॥ -१

शरणागतरक्षाय शमितारिपक्षाय
करुणार्द्रैकचित्ताय मंगळं ॥ -२

सुरमुनिवन्दिताय सुचरितैकगम्याय
परिहृतदुरिताय मंगळं ॥ -३

सूत्रधारी – ऐणेंरीती नाट्यारंभकरून मृत्युंजयचिरंजीव नाठक शाहमहाराजविरचित या रंगभूमींत नाट्य करितों यास, सकल जनास संतोष होवया कारणें, इष्टदेवताची प्रार्थना करितों पहा.

वंदितो मी एकदंताचे पाये अनेकदंत तो मज सहाये
हरितसे सकलविघ्न 'उपाये दया करितो मजवरि गणराये ॥ १ ॥

सू. – एणेंरीती विघ्नेश्वराची प्रार्थना केल्यानंतर सरस्वतीची प्रार्थना करितों पहा

विश्ववन्द्य जननी सरस्वती
वीणापुस्तकें धरिते दोनीहाती
वंदितों तिचेंचरण ध्यानातें
दया करिते मजवरि याजनातें ॥ २ ॥

---

1. कमनीय.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. – एणेंरोती सरस्वतीची प्रार्थना केल्यानंतर परमेश्वराची प्रार्थना करितो पहा.

वंदितों महदद्भुतदैवता । अर्धतनु स्त्रीपुरुषार्थसंयुता
एकपार्श्वें व्याघ्रचर्मस्य कनकांवर । वामपार्श्वें नीलकेश सव्यजटाभार ॥

सानंदगिरिजायुक्तः सस्मित प्रियभाषणः ।
शिवः करोतु कल्याणं चन्द्रार्धकृतशेखरः ॥

सू. – एणेंरीती परमेश्वराची स्तोत्र केल्यानंतर महाविष्णूचि प्रार्थना करितो पहा

नमो वेदैकवेध्याय अवनीउद्धरणायच
आपदामपहर्ताय वासुदेवाय मंगळं ॥

सू. – एणेंरीती सकलदेवताची प्रार्थना करून मृत्युंजयचिरंजीवनाटकांत वक्तें निजभक्तींकूने,
"विघ्नेश्वर नाट्यं कर्तुं परिक्रामति अलोकयन्तु सभासदः"

गजाननमहं वन्दे गिरिजानन्दवर्धनः
अज्ञानतिमिरोध्वंसि ज्ञानसूर्यप्रकाशकम् ॥

प्रावेशिक दरु. राग : पाडी – आदिताळ.

वंन्दे शिवसुतं वरदममरनुतं
सुन्दरगुणयुतं सुप्रसन्नवदनम् ॥ -१

वालेन्दुशेखरं फालसिन्धूरधरं
लालितभक्तवरं लीलया विघ्नहरम् ॥ -२

पाशांकुशधरं फणिवरकेयूरं
मूषिकवाहनं मोदककरम् ॥ -३

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. - एणेंरीती वाङमाधुर्यार्थपुष्टि कारणे प्रार्थना केली असतां तदनंतर विघ्नराज नाट्यरंगी संतोषेंकून नृत्य करीत येतो पहा.

प्रावेशिक दरु. राग : पाडी – आदिताळ.

संतोषें नृत्यकरी शमऊनी विघ्नसारी
दंतिमुख आला देव दनुजसंहारी ॥ ध्रु० ॥

सिंधूर माथेवरी शशिकला शोभे बरी
मंदमंदार कपोळी मधुकर हारी ॥ -१

पाशांकुशधारी पापसंघ सकलहारी
मूषिकवाहन मोदककरी ॥ -२

सर्वदा दयाकरी सर्प शोंभे दोंदावरी
पार्वती शिवसुत पहा रंगांतरी ॥ -३

सू. – अहो भागवत हो विघ्नेश्वर आलाकीं पूजाकरायास अर्चकास बोलावा. पारिपार्श्वक वचन - अवश्य बोलावितों.

सू. - अरे कोण आहे रे, अर्चका पूजा करायाला येरे. पूजारी व - कां हो बोलावितां हेंघे आलों. सू. व - अरे वेढचा विघ्नेश्वर येऊन फार उसीर- झालाकीं लौकरी स्नान करून पूजा करीरे. पूंजा - व - स्नान करून आलों ह्मणूनच देवास सिवून पूजा करितों.

सू. व. - बरें स्नान करून येरे. पूजारि - व - "जयजय देवदेवोत्तमा देवतासार्वभौमा नृत्य गीत वाद्य मवधारय. पूजा झाली आह्मी घरास जातों."

सू. - एणेंरीती विघ्नेश्वर येऊन सकलविघ्न निवारण करून वेल्यानंतर मृत्युंजयचिरंजीव नाटकांत प्रथम पात्रप्रवेश ऐसा जो. मृकंडु महामुनीश्वर आपणास तपः करायास उत्तम रम्यस्थळ पाहून या ह्मगून शिष्यास पाठविले असतां, त्याकरितां सुमती शिष्य येतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रावेशिक दरु.   राग : कापी – अटताळचापु

विभूति अंगी लाऊन
विभु शिवस्मरण करून ॥ प ॥

शुभ रुद्राक्षमाला धरून
सुमती आला हांसून ॥ अप ॥

सू. एणेंरीती मृकंडु महामुनीश्वराची शिष्य सुमती येऊन उत्तमस्थळ पाहून, मृकंडुमहामुनीश्वरास जवळी जाऊन सांगीतले, ते वर्तमान ऐकून मृकंडुमहामुनीश्वर पत्नीसह तपोवनास येतो पहा.

प्रावेशिक दरु,   राग : मध्यमावती – अटताळ चापु

जटामकुट धरून
जलजाक्षीसह मौनि आपण ॥ प ॥

कटी व्यघ्रचर्म धरून
कमनीय मृकंडु आला संतोषाने ॥ अप ॥

कमंडलु घेऊन
करी दंड धरून
अमल रुद्राक्षमाला घालून
अखिलांगीं भूति लावून ॥ -१

सुमती वचन :— स्वामी स्थळ पाहून आलों हे उत्तमस्थळ तपः करायास येथेंच तपः करा

सू. एणेंरीती पत्नीसह मृकंडुमुनी येऊन बसलें असतां मृकंडुमुनीस पाहून, मुनीचे बाईल मरुद्वती आपणास संतान नाही याकरितां मनांत क्लेश वाठते ह्मणून, मृकंडुमुनीचे पत्नी मरुद्वती बोलते पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मरुद्वतीची दरु. राग : ललितपंचम – आदि ताळ

कांता जन्म कसांस -- ऐका स्वामी ॥ प ॥

संतान हीन जन्म व्यर्थ
 संतत पितृऋणग्रस्त
संताप पावते मनास ॥ अप ॥

मललिप्त शरीराने
 ममतेन येऊन
माते स्तन्य दे म्हणून ॥ -१

बाळ पाठीवरी पडून
 बगळेंतून डोई घालून
बाळें स्तन्यपान दिल्हे विणे ॥ -२

क्षणभरी रांगते ते
 क्षणा मध्ये अटकलते
क्षणभरी रोदन करिते ॥ -३

क्षणात खदखद हासते
 क्षण बोबडे बोलते
क्षण ऐसा [1]बाळ न खेळवितां ॥ -४

पायी घागर्या बाळे
 पदकें सरी वागनखें गळां
बाहु शोभे तोळबंद ताइत ॥ -५

---

1. पाख

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

होईस मोतीयांची टोपी
डोळां काजळ कानी कुडक्या बाळया
आई ह्मणून अलंकार न करितां ॥ -६

सू. एणेंरीती बोलून मरुद्वतीने अंतकरणास परमक्लेश वाटताती ह्मणून न सहतां मग ती बोलती पहा

पुनः मरुद्वतीची दरु. राग : आहिरी – अटताळचापु

असून फल काय स्त्रीपुरुष
असून फल काय ॥ प ॥

असून फल काय अवनीवरी
भासुर पुत्र असल्यां वांछून ॥ अप ॥

सुमरहित मालतीपरि
शुकरहित वनापरि
कमलरहित सरोवरापरि
कमलवैरिरहित रात्रीपरि ॥ -१

फलरहित वनरुहापरि
प्राणरहित देहापरि
जलरहित वरनदीपरि
ज्वालारहित दीप धरापरि ॥ -२

घन मणिरहित हारापरि
धनरहित जनापरि
दिनकररुचिरहित दिवसापरि
दिव्य संतानरहित जगतीवरि ॥ -३

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एणेंरीती मरुद्वती विशेष बोलतां ऐकून पत्नीसी मृकंडुमुनि बोलतो पहा.

राग : सावेरी – अटताळ

मृकंडुमुनीची दरु.

संतानरहित जन्म व्यर्थ
म्हणून त्वां म्हणतले
सत्य ते मज मानले ॥ प ॥

संतानापरीस संतानेंकून संतोष
संतानफल जन्मास संतत असे ॥ अप ॥

वेदाध्यन करून
विचित्रज्ञान संपादून
विविधयज्ञ करून
मोद देवताप्रार्थन
योगसाक्षात्कार पाहून
मुख्य संतान पावन - चन्द्रवदने ॥ -१

तपोवन फिरलयाने
तपश्चर्य केल्याचे फ़ळ
धर्म आचरिल्याचे फळ
जप सदाकेल्याचे फळ
महादान केल्याचे फळ
स्नानसंध्या केल्याचे फळ - चन्द्रवदने ॥ -२

मरुद्वतीवेवचन :— ऐका स्वामी ये गोष्टीची तुह्मास चिंता आहे मजहीं परमक्लेश वाटताती यास काय उपायकरावा सांगा स्वामी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एर्णेरीती मरुद्वतीचे वचन ऐकून मृकंडुमुनि मरुद्वतीस पाहून मग त्या बोलतो पहा.

दरु – आदिताळ

शरण जाऊं शिवास तो
संतान देईल आह्मास - ऐक प्रिये ॥ प ॥

दीनदयापर करुणासागर
दिगंबर पुरहर
गानलोल शंकरा वांचून
आह्मास गती कोण आहे - ऐक प्रिये ॥ -१

गंगाधर गिरिजार्धशरीर
गजचर्मांबरधर
तुंगत्रिशूल डमरूधर
धूर्जटी त्रिनयन - ऐक प्रिये ॥ -२

नीलकंठ निर्मलरूप
निखिलार्तिहर
बालेन्दुशेखर फाललोचन
भवभयमोचन - ऐक प्रिये ॥ -३

सू. एर्णेरीती स्त्रीपुरुष दोघेही बोलून परमेश्वरास उद्देशून वनामध्यें निर्मळ अंतःकरणे तप करीत असतां, परमेश्वर त्यांचा तपास मानून संतोषेंकरून वर देयास वृषभवाहनारूढ होऊन सांबशिव येतो पहा.

जटामकुटमण्डितं कुटिलसद्विपेन्द्राजिनं
प्रसन्नवदनाम्बुजं फणिफणास्फुरत्कुण्डलम् ।

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

त्रिशूलडमरूद्वहं त्रिपुरदैत्यगर्वापहं
भजामि गिरिजापतिं भयनिवारणं शङ्करम् ॥

परमेश्वर प्रावेशिक दरु   राग : शंकराभरणं – आदिताळ

शंकर आला सभेस ॥ प ॥

भवभय सकल निवारी
भव भुजगकुंडलधारी
शिव अति आनंदकारी
सेविती जन अतिसादरी ॥ -१

शरणागताचे भयहारी
शशिकळा जटाधारी
करी शूल डमरूधारी
कामगर्वापहारी ॥ -२

आरूढ वृषभावरी
आंग राख भस्मधारी
कारुण्यनिधि रुद्राक्षधारी
कौतुक त्रिपुरहारी ॥ -३

सू. – एणेंरीती परमेश्वर प्रत्यक्षझाला, त्यास पाहून मृकंडुमुनि नमस्कार करून बोलतो पहा.

मृकंडमुनीश्वराचे दरु.   आदि ताळ.

वंदीतसें तुजे पायरे
वर द्या वांछित मज दे ॥ प ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कल्याणाचल कोदंडधर
कल्याणीमनोहर
नागभूषण नन्दिवाहन
नररुंडमालाधर ॥ -१

रुद्राक्षमालाधर
भस्मलिप्तशरीर
रुद्र त्र्यंबक देव
वंदीतसें तुज पायरे ॥ -२

सू. – एणेंरीती मृकंडुमुनि नमस्कार केला ते पाहून परमेश्वर संभाषेंकून बोलतो पहा. परमेश्वर - व - मृकंडमुनि ! तुजे तपास मानलों. प्रसन्न झालों असें. काय मागतोस ते माग. मृकंडु - व - श्रीमांबशिवा ! तुमचे दयेने सकल श्रेयः प्राप्ति आहे. एक पुत्रसंतानाची इच्छा आहे. ते तेवडी दया केल्याने पितृऋणापासून मुक्त होईन, संतान जनितसुख अनुभवायासी इच्छा आहे, तुमचे दयेने इच्छापूर्ति व्हावे. परमेश्वर - व - ऐक मृकंडुमुनी ! शंबरवर्षे आयुष्याचे मूढ कुलपांसन पाहिजे कीं ? सोळावर्षें आयुष्याचे सकल विद्यापारंगत सकल धर्मस्थापक कुलतिलक पाहिजे कीं ? हे सांग तोची देऊं, मृकंडमुनि - व - अवश्य स्वामी तसेंच पत्नीस विचारून बोलतो.

सू. - एणेंरीती मृकंडुमुनि पत्नीसी पाहून 'आह्मास कोणतापुत्र मागावे' ह्मणून विचार करितो पहा

मृकंडुमुनि आणी मरुद्वतीचे दरु.

मृकंडु. - सुत कोणता मागावे म्यां
सांग प्रिये आतां

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शतायुः अथवा षोडशायुः
सांग प्रिये आतां ॥ -१

मरुद्वती. - अचिरायुः गुणवंत असल्यां
आह्मास कां स्वामी
अतिचिरायुः अगुण असल्यां
आह्मास मागा स्वामी ॥ -२

मृकंडु. - कुलपांसन सुत सहस्त्र
असूनि काय प्रिये
कुलतिलक एक असल्यां
भूषण आहे प्रिये ॥ -३

मरुद्वती. - संतान झालेतरि पुरे
संतोष आह्मास स्वामी
संतत तुह्मीच विचारा
तुह्मी जाणा स्वामी ॥

सू. - एणेंरीती स्त्रीपुरुष विचारकरून मृकंडुमुनि परमेश्वरासीं बोलतो पहा.

मृकंडमुनीश्वराचे दरु. राग : कापी – आदिताळ.

सत्पुत्र दे मज देवा - गुण
संपन्न सुशील देवा
विपन्न सज्जन मान्य देवा
वेदशास्त्र पुराणवेत्ता देवा ॥ -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शमदमादि गुणशील - सदा
शैवभक्तकैकलोल
विमल सत्यवचनपाल - देवा
विश्वजन अनुकूल ॥ -२

स्नान संध्या जपकारी - सदा
जननीजनक तापहारी
दानधर्म आचारी - ऐसा
तनय दे मज त्रिपुरारी ॥ -३

सू. एणेंरीती मृकंडुमुनीचे वचन ऐकून सांबशिव त्यावरी कृपाकरून वर देतो पहा.

परमेश्वराची दरु.

देतों संतान संतोषें तुज
देतों संतोषें तुज - मृकंडु ॥ प ॥

दिनकरसमतेज भूतदया समाज
भुवनैकवन्द्य तनूज ॥ अ प ॥

कुल पवित्रकारीस
गुरुजन संतोषकारीस
फल सद्धर्मचारीस
कुलतिलकपुत्र ऐसे ॥ -१

सू. एणेंरीती सांबशिव मृकंडूस वर देऊन आपल्या निजनिवासी चालिला पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु,

भक्तवत्सल आसक्तचित्त
भक्तावरि दया करून ॥ प ॥

भक्तांकूने भुवन
भजेया चालिला ॥ अ प ॥

सू. एर्णेरीती परमेश्वर येऊन मृकंडूस वर देवून निजनिवास चालिलानंतर कथा ऐसीजें, परमेश्वरवराचा प्रभावाने मरुद्वती [1]गर्भ होऊन नवमहिने भरून प्रसूतिकाल होऊन कष्टी होती पहा.

सू. एर्णेरीती मरुद्वती कष्टीहोत असतां, मृकंडूचा आज्ञावरी सुमतीशिष्य जाऊन सुईणीस बोलाविला. सुईण येते पहा.

मरुद्वती - व - अरे कोणरे! सुमती, कायकीं कष्टी होताती, सुईणीला बोलाऊन येरे.
सुमती - व - बरे बाई बोलावितों.

सू. व - एर्णेरीती सुमतीने सुईणीस बोलविलें असतां सुईण येते पहा.

प्रावेशिक दरु. आदिताळ.

बांकडे वोंचरे दांत
बांकित चाळत येते ॥ प ॥

खोंकित काटो हातीं
खांळ बोल बोलते ॥ अ प ॥

सू. अव्वाजी तूं कोणगे - सुईणवचन - कोणरे अप्पा तूं दोंडयाचा लेंक नव्हेस - सू. व - अव्वाजी तूं कोण मला पूसतेस - सुईण - व अरे अप्पा मी सुईण.

---

1. गरोदर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मरुद्वती कोणी निंद्याया कारणें कष्टी होते ह्मणून बोलाविलें कीं त्या कारणे आलें. सू - व बरें मरुद्वती कडे जा. सुईण - व - कायगे मरुद्वती कसें वाटतें - मरु - व - अगे आई पोट दुखतें. बरें वाटत नाही - सुईण - अरे सुमती मरुद्वती फार कष्टी होते प्रसूतिकाळ आहे. राख घेऊन ये. येरंडेल घेऊन ये. निंबाचापाला घेऊन ये - सुमती - व - अवघें आणिलें सावधान पहा - सुईण - व - अरे लेंकुरूं दिसतें. अमालासी कुंथ, उखळावरि बैस, अमासी चाळ, अमासी वोणवो हो, ह्मणिजे लेंकुरुं नीट येईल, मरु. व - अगे आई मी काय करूंगे. जीव कासाविस होतो - सुईण - व - अगे मी किती सांगीतलेंकीं दादळयापासीं निजूं नको. जरि त्यापासी निजायास जाईनास तरी ऐसें कां होतें. बरें कुंथ कुंथ लेंकुरुं बाहेर आलें. "पुत्र झाल हा" मृकंडुमुनी तुह्मास पुत्र झाला. मृकंडु - व - सुमती परमेश्वराचे दयेने पुत्र झाला पहा. साकर घेऊ येऊन वांटिरे - सू. व - एणेंरीती मृकंडुमुनीश्वरास पुत्रोत्सव जाहल्यां असतां लेंकरास घेऊन बाळांतीण येते पहा.

बालांतीण प्रावेशिक दरु,

बाळ हातीं घेऊन
भाळिं पट्टा बांधून ॥ प ॥

पाला निंबाचा घेऊन
बाळांतीण आली संतोषानें ॥ अ प ॥

हळदी सर्वांगी लाऊन
हरुषें रक्षामर्व बांधून
तिलक काजळकाळें लाऊन
देह धवळाळी विडे घेऊन ॥ -१

हिरवी कांकणे लेऊन
हिरवी साडी चोळी नेसून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शिरसी वेष्टित सर्वीस बांधून
शीघ्र आली नामकरण कारणे ॥ -२

मृकंडुवचन - अरे सुमती परमेश्वराचे वरप्रभावाने पुत्रझालाकीं नामकरण करायास आमचे पुरोहित काशीभट्टास बोलाऊन आणिरे.

सुमतीवचन - बरें स्वामी आज्ञेप्रमाणे बोलाऊन आणितों.

सू. एणेंरीती मरुद्विती [1]बाळास घेऊन आल्यानंतर बाळासी नामकरण करावयासी मृकंडूचा आज्ञेवरून सुमतीने जोश्यास बोलाविला असतां, जोशी येतो पहा.

प्रावेशिक दरु.

जोशी येतो पहा ॥ प ॥

पट्टवर्धन लाऊन
पंचांग घेवून
काटी टेंकित बोचरा
काशीभट्ट आला लऊन ॥ -१

जोशी वचन - नमस्कार उत्तरोत्तराभिवृद्धिरस्तु कायहो मृकंडुमुनि तुह्मास पुत्र झाला काय? बरें त्यास वेळ कोण मुहूर्तकाय. हे सकळ असिलें पहिजे सांगा.

मृ. व -सायंकालीं गोधूळीं लग्नी पुत्रोत्पत्ति झाली.

सू. मृकंडु वचन ऐकून जोशी लग्न वेळ पाहून बाळास मार्कण्डेय ह्मणून नाम ठेविले.

सू. एणेंरीती बाळास नामकरण केल्यानंतर मृकंडु मरुद्वती पुत्रसुख अनुभवीत असतां तदनंतर कथा ऐसीजे. तदुपरि तनयासी पंध्रावर्ष जाहल्या सोळावेवर्ष चालते ह्मणून मृकंडु आणी मरुद्वती चिंताक्रांत होऊन तनयास सवें घेऊन तपोवनास येतात पहा.

---

1. लेंकरास

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु.

तनयास सर्वे घेऊन
अनुपद चिंता करितां ॥ प ॥

मुनि मृकंडु व्याकुळ
मने वनितेसह येतो ॥ अ प ॥

सू. एणेंरीती मृकंडु मरुद्वतीसह मार्कण्डेयास घेऊन तपोवनास येऊन तनयास पाहून परस्पर चिंताक्रांत होऊन असतां मरुद्वती देवीस उद्धेशून स्मरणकरून बाळासी रक्षी ह्मणून बोलते पहा.

दरु –

बाळासी रक्षी तूं देवी शर्वाणी
सोळावेवर्ष चालते जननी ॥ -१

काळभय शीघ्र निवारी भवानी
कायकरूं याचे सांग नीलवेणी ॥ -२

भवजनित संताप दूरिकरी शंकरी
बालेन्दुशेखरी गौरी ॥ -३

अव माझा तनया लौकरी भुवनेश्वरी
अखण्ड आयुष्य दे ईश्वरी ॥ -४

आयुरभिवृद्धि दे तनयास आनन्दवल्ली
अन्तकभयहर मरकतवल्ली ॥ -५

मायातीतरूप पाव शिवकामवल्ली
मानसभय निवारी अभिरामिवल्ली ॥ -६

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एणेंरीती मरुद्वती पार्वतीस उद्देशून बोलिल्यानंतर मृकंडुमुनि परमेश्वरास उद्धेशून बोलतो पहा.

दरु

सुत संरक्षण करी
झडकरी चन्द्रशेखरा - क्षण
सुत न पाहतां राहवेना
मजकून सांवशिवा ॥ -१

सोळावें वर्ष समीप
उरले नीलकंधरा - आतां
बाळां शतायुः दे तूं
लौकरी त्रिपुरांतका ॥ -२

सतत विचार व्याकुळ
मन माझे पार्वतीशा - सांग
सत्वर विचार त्यास
मज फाललोचना ॥ -३

तुजवीण गति अन्यत्र
नाही नागभूषणा - देवा
मज या संकटापासून
सोडावी देवदेवा ॥ -४

सू. एणेंरीती मृकंडुमुनि आणी मरुद्वती, पार्वतीपरमेश्वरास उद्धेशून बोलिल्यानंतर मरुद्वती चिंता न सहतां सकलजनास पाहून बोलती पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु. राग : आहिरी – अटताळ.

काय करूं किती धीर धरूं
आतां - सांगा बाई
कामसुंदर सुत सोळावेवर्ष
चालतें आतां - सांगा बाई ॥ -१

संतान नसतां सकलजनास
एक दुःख असतां
संतान होऊन विच्छित्ती झाली
ते दुःख न कोणास ॥ -२

कोण सत्वर येऊन
रक्षील मज बाळास
कोण माझे संतापहारील
सकलजनांत आतां ॥ -३

न कळतां आह्मी पुत्र
मागीतला सांबशिवा - उगाच
नको आतां ते दुःख
आह्मास अनुभवेना ॥ -४

कोणातरी विचारूं काहीं
सांगा - आह्मा लौकरी
कोणता हो उपाय यास
करूं मी आतां ॥ -५

सू. एणेंरीती मृकंडुमुनि मरुद्वती चिंताक्रांत होऊन मग तनयास पाहून बोलताती पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

संवाद दरु. राग : केदारगौळ – आदिताळ.

मृकंडु :- तुज सारखी निधी कधी पाहूं
[1]आह्मी - ऐक बाळा ॥ प ॥

मरुद्वती :- भजतोस आह्मास निशिदिन
बहु भक्तींकूने - बाळा ॥ अ प ॥

मृकंडु :- वेदशास्त्र मग मी कोणास
सांगू - ऐक बाळा
विविध विद्या कोणास मी
सांगू - ऐक बाळा
मोद योगाभ्यास जप मुहुः
मुहु मी कोणास सांगू ॥ -१

मरुद्वती :- कोण मज माते ह्मणून
पाचारील - ऐक बाळा
कोण आह्मा वृद्धाची वेळा
सेवाकरील - ऐक बाळा ॥ -२

कोण निजगुण संतोष
करील - ऐक बाळा
कोण [2]आमुचे तापत्रय
हारील - ऐक बाळा ॥ -३

सू. एणेंरीती मातापिता चिंताक्रांत होऊन आपणास पाहून बोलताती, क्लेशपावताति, हे पाहून मार्कण्डेय मातापितासी बोलतो पहा.

---

1. आह्मीहृत भाग्य 2. आह्मा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु. राग : शंकराभरण – पंचघातमद्यं ताळ

इतुका विचार हेतु काय
इतुके कां मुख तुमचे म्लान आहे
इतुके दिवस नाही तो विचार काय
सांग माये बापा सांग माये ॥ -१

माझाकडे पाहून कष्टी कां होतां
माझे काय अन्याय सांग तों आतां
माझे मी प्रायश्चित्त करीन आतां
माझे माता पिता माझे माता ॥ -२

सू. एणेंरीती मार्कण्डेयाचे वचन ऐकून माता पिता अंतःकरणी क्लेश पाऊन बोलताती पहा.

दरु. राग : गुम्मकांबोदी – आदिताळ

बाळा तुझी अन्याय काय
बहूंच आमचा अन्याय काय ॥ प ॥

नीललोहितास आह्मी निश्चिता
चिरंजीवपुत्र नाही मागितल्या
वेदांतज्ञान पाहून विद्या तुझी पाहून
सादरसद्गुण पाहून सहृदयेने ॥ -१

मोद तुज खेळन पाहून
खेद पावते अंतःकरणे
आदिदेव दत्त आयुरादाय पाहून
अंतःकरण चंचल होते ॥ -२

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एणेंरीती गुरूजन बोलणे ऐकून मार्कण्डेय बोलतो पहा.

राग : भैरवं – आदिताळ

दरु.

चिंता कशास तुह्मास
चिंता कशास ॥ प ॥

चिंता कशास तुह्मास
चित्तीं संतोष असा ॥ अ प ॥

तुह्मास जो प्रसन्न झाला तो
मज बिसरेल काय
ब्रह्मेन्द्रवन्दित शिवा
बाळा विसरेल काय ॥ -१

एकाचे अट्टहास
एक धनी आहे काय
पाकशासनादि वन्द्य
परमेश्वर मज साह्य आहे ॥ -२

शिवपूजा करीन
शिवमन्त्र [1]जपून
शिवध्यान सदा करीन
शिव मज कल्याणकरील ॥ -३

काळाचे भय मज काय
काळ ह्मणताती कोठे आहे

---

1. जपेन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

काळकंठ महेश माझे
कामित कुलतैवत आहे ॥ -४

मार्कण्डेय वचन : ऐक माय बापाहो तुह्मी कशास चिंताकरितां तुह्मास जो प्रसन्नझाला त्यास मी प्रसन्नकरीन, त्यापासून अयुरभिवृद्धि [1]पाऊं घेईन, तुमचे आज्ञा झाल्याने शिवदर्शनास जातों - मृकंडुमुनि - व - दीर्घायुष्यमस्तु, बरें शिवदर्शनास जाऊन ये सूत्रधारि - व - एणेंरीती मार्कण्डेय मातापिताची आज्ञा घेऊन शिवदर्शनास येतो पहा

दरु

इन्द्रुशेखर पादारविंद
पूजाकरायाला मंदयाने ॥ प ॥

मुनिमृकंडुनंदन आनंद-
युक्त चालिला संतोषानें ॥ अ प ॥

सू. - एणेंरीती मार्कण्डेय शिवस्थळ सेवनास जातां, आधीं काशीस येऊन विश्वेश्वरास स्तोत्र करितो पहा

दरु

बासवादि निर्जरार्चित - देवदेव
काशीविश्वेश पाहिमां ॥ प ॥

वेदप्रतिपाद्य शंकर - पुरहर
केदारेश पाहि पाहिमां ॥ अ प ॥

---

1. मागोन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कुंभसंभवादि पूजित - भोसलनाथ

शंभुमहादेव पाहिमां

अंबिकानाथ लोकेश - नासिक

त्र्यंबकेश पाहि पाहिमां ॥ -१

काळकूटभयनिवारण - पार्वतीश

काळहस्तीश पाहिमां

लोकनाथचन्द्रशेखर - देवदेव

एकाम्रनाथ पाहि पाहिमां ॥ -२

करुणाकर कामितफलप्रद - भूतेश

अरुणाचलेश पाहिमां

अंबरकेश शिवकामिरमण - आर्तिहर

चिदंबरेश पाहि पाहिमां ॥ -३

ब्रह्मादिदेव सेवित - वटुकनाथ

ब्रह्मपुरीश पाहिमां

देवमुनिगण सेवित - पशुपतीश

देवश्वेतवनेश पाहि पाहिमां ॥ -४

हृद्यजनितरोगमोचन - भवतरण

वैद्यलिंग पाहिमां

कायक्लेश सकलमोचन - कामहर

मयूरनाथ पाहि पाहिमां ॥ -५

मध्याद्यंतरहित - नीललोहित

मध्यार्जुनेश पाहिमां

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जंभारिवरदायक - कृत्तिवास

कुंभेश पाहि पाहिमां ॥ -६

पंचवक्त्र पापमोचन - विष्णुवल्लभ

पंचनदीश पाहिमां

कंजलोचनपूजित - आनंदवल्ली

तंजपुरीश पाहि पाहिमां ॥ -७

गुहगणेशचरित्रामोदित - दीनदयाळ

बृहदीश पाहिमां

शंभरारि दर्पभंजन - उमारमण

जंबुलिंग पाहि पाहिमां ॥ -८

गोत्रारिसंसेवित - विश्वनाथ

मातृभूतेश पाहिमां

इन्द्रसकलजटाशोभित - मीनाक्षीनाथ

सुन्दरेश पाहि पाहिमां ॥ -९

किंकर आर्तिहरण - शर्वाणीरमण

शंकरनारायण पाहिमां

वर्धितधर्मसकल - विरूपाक्ष

अर्धनारीश पाहि पाहिमां ॥ -१०

रामपूजित पादपंकज - वामदेव

रामलिंगनाथ पाहिमां

भेदाभेदरहित आदिदेव

वेदवनेश पाहि पाहिमां ॥ -११

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

भोंसल शाहेन्द्रदेवता - भोगिभूष
ईश त्यागेश पाहिमां
विमर्दितारिसमूह - गंगाधर
अमृतघटेश पाहि पाहिमां ॥ -१२

सू. - एणेंरीती मार्कण्डेय सकलदेवस्थळ सेऊन भक्तोनें एकांतःकरणें अमृतघटेश्वराची पूजा करितो पहा

दरु राग : शंकराभरणं – अटदाळ

पावे शिव मज तूं येक्षणी ॥ प ॥

बाल मी मजला
बालेन्दुशेखरा
पालित तूं पर्वत
बालिकानायका ॥ -१

करुणासागरा
कमनीयगंगाधरा
कामितफलप्रदा
कंदर्पदर्पहरा ॥ -२

शरण आलों तुज
समीप भय माझे
शशि जटा विराजे
शंकर सत्वरा जे ॥ -३

सू. - एणेंरीती मार्कण्डेय परमेश्वराची पूजाकरून पंचाक्षरजपकरून शिवस्तोत्र शिवध्यान शिवैकनिष्ठ होऊन असतां अनेकदिवस झाल्यानंतर कथासंविधान एसीजे,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

चित्रगुप्ताने मार्कण्डेयास सोळावर्ष झाली ह्मणून यमधर्मराजास सांगीतलें, ते ऐकून यमधर्म यमकिंकरास पाहून आज्ञा केली. "मार्कण्डेयास घेऊन येरे" ह्मणून. याप्रकारें यमकिंकर मार्कण्डेयास घेऊन जायास येताती पहा.

प्रावेशिक दरु.

काळी अंग सारी
काळें वस्त्र धारी ॥ प ॥

काळें विकृत स्वरूप
करी पाश धारी ॥ अ प ॥

अट्टहास करिती
अखिलजन भेडसाविती
भट यामाचे धाविती
बहु वेगीं येताती ॥ -१

यमकिंकर वचन - अरे अकटा अरे विकटा अरे शकटा अरे मर्कटा मार्कण्डेय कोठे रे ! आहा हू हू. अरे मर्कटा मार्कण्डेय कोटे रे ! हा हा हा हू हू हू अरे हे गे मार्कण्डेय. अरे इकडे येरे - सू. - एणेंरीती यमकिंकर येऊन मार्कण्डेयास पाहून बोलतो पहा

यमकिंकर व - अरे मार्कण्डेया तुझे आयु:प्रमाण झाले. यमधर्मराजा तुजला घेऊनये ह्मणून आह्मास पाठविले आहे. तूं चाल आह्मा बरोबरी - मार्क - व - ऐकारे यमकिंकरा हो, मी शिवभक्त तुह्मी मला सिवायास अधिकार नाही.

सू. व. - एणेंरीती मार्कण्डेयाची शिवपूजा सामर्थ्यापुढें तपोबळापुढें, त्या समीप न जातां आपणांत अपण किंकर बोलताती पहा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

झंपताळ

दरु

जवळी याचे जावेना - विकटा
ज्वलनापरि तावितो ॥ प ॥

जवळी याचे कैसे जावें - विकटा
जवळी याचें - कैसे जावें ॥ अ प ॥

पाश हाती गळताती - अकटा
प्राण थरथर कांपताती
पाश कैसा आह्मी घालवें - अकटा
पाश कैसा आह्मी घालवें ॥ -१

कधी ऐसे नाही पाहिले - शकटा
कोठून हे विपरीत
कालकूटा सारखें बाळ - शकटा
कालकूटा सारखें बाळ ॥ -२

पळून आह्मी जाऊं - मर्कटा
प्रकट यमास सांगूं
पळतां पुरे झाले ह्मणून - मर्कटा
पळतां पुरे झाले ह्मणून ॥ -३

सू. - एणेंरीती यमकिंकरांस मार्कंडेया समीप ना जातां भीऊन परतून यमापासी जाऊन हा वृत्तांत सांगतां, यमधर्मराजा ऐकून कोपाक्रांत होऊन मार्कंडेयास नेयास आग्रहेंकून यम येतां पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रावेशिक दरु.

यम येतो पहा - वैवस्वत
यम येतो पहा ॥ प ॥

काळरूपेंकून करीं दंडधरून
काळ मेघापरि गर्जून
काळ पाश घेऊन काळेंवस्त्र लेऊम
काळ महिषारूढ होऊन ॥ -१

यम वचन - अरे शकटा अरे विकटा अरे, बालमार्कण्डेय कोटेरे - शकट - व. स्वामी हेगे बसला अहे. तोगे तोच मार्कण्डेय - सू. व - एर्णेरीती यम येऊन, निश्चित जप करीत बसला त्या मार्कण्डेयास पाहून यम बोलतो पहा.

दरु अटताळ

नये ह्मणतोस नये ह्मणतोस
ह्मणिजे काय ॥ प ॥

भय माझे न मानितां
बहु धीटपण आहे ॥ अ प ॥

डोळें झांकून पुटपुट करितोस
डोंगरें सारिखें अचल बसतोस
काळ मी मज नेणेस
काळकंठास पूजितोस ॥ -१

कित्ती स्नान केल्यानें
कित्ती संध्या केल्यानें

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कित्ती ध्यान केल्यानें
कित्ती लपशील माझापुढें ॥ -२

मज पाशास अगोचर काय
माझा आज्ञा मोडीस कोण आहे
मजपुढें पळसी ह्मणिजे काय
माझा दाडास पारण तूं -३

सू. एणेंरीती यमाचेवचन एकून मार्कण्डेय धि:कार करुन यमास बोलतो पहा.

दरु,

मज कोणाचे भय काय
मज स्वामि शिव आहे ॥ प ॥

तुज इतुका गर्व काय
तूं मूढा परतृ जाये ॥ अ प ॥

तुझे मुख पाहूं नये
तुजसी बोलणे काय
तुज स्पर्शी स्नान आहे
तूं चंडाल येथून जाये ॥ -१

शिवपूजा मीं करितों
शिवध्यान मी करितों
शिवस्तोत्र मी पठतों
शिवशिवा तूं येथें कां आलास ॥ -२

सू. एणेंरीती मार्कण्डेयाचे वचन ऐकून यम कोपाक्रांत होऊन बोलतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

संवाद दरु.

यम :- सकळ विश्व मज भीत आहे पोरा
सहसा मज न भीतां बोलतोस काय ॥ -१

मार्कण्डेय :- विश्वातीताची दया मजवरी आहे
जाये वेडा झंवी तुजाने माझे होणे काय ॥ -२

यम :- मजपुढें गर्व तूं मागती बोलतोस काय
क्षणातें माझें दाढेंत तुज रगडूं काय ॥ -३

मार्कण्डेय :- धाडा तुजे माझे स्वामी पाडील पाहे - आतां
दर्प तूं नकोकरूं उगला जाये ॥ -४

यम :- कां मुनिपोरा इतुका ह्मणतलास - आतां
कालदंड तुजला मारितसें ॥ -५

मार्कण्डेय :- मज मारणार ऐसा कोण आहे - सदा
मज रक्षीत सांबशिव पाहे ॥ -६

सू. एणेंरीती मार्कण्डेयाचे वचन ऐकून यमास क्रोध उठून हाती पाश धेऊन. "आतां तुला मारितों" ह्मणतां मार्कण्डेय भीऊन लिंगास कवठाळून धरिले ते पाहून यम बोलतो पहा.

दरु –

कोणाचा पाठीसी पडसील - आतां
कोठें तूं लपशील ॥ प ॥

कोण तुझे मज पासून सोडवील
कोण तुज पाठीसी घालूं पाहतों ॥ अ प ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

साह्य तुझे जो करील - आतां
सहज मी त्यास धरीन
बाहुबळ प्रकट करीन - बहुधा
पाशें एका दोघास धरीन ॥ -१

सू. एणेंरीती बोलून यमाने मार्कण्डेयास लिंगासह एकसमयावच्छेदें पाश घालून बोढित असतां मार्कण्डेय परमेश्वरास पाहून बोलतो पहा.

दरु आदिताळ

शिवशिवा पावे शिवा पावे
हरहरहर शिवशिव पावे ॥ प ॥

माता तूं मज पिता तूं
भ्राता तूं गुरू तूं - देवदेवा ॥ अ प ॥

मज बाधा होईल तेथें
मज मी सेवीन - हरहरा
तुज बाधा कशास
मज करितां - हरहरा ॥ -१

अभय मज देऊन
अंतक संहार करून - आतां देवा
शुभदया प्रकटकरी तूं
हरहर शिवा पावे - देवदेवा ॥ -२

सू. एणेंरीती मार्कण्डेयाचे प्रलाप ऐकून यम अमर्यादा करितो ते पाहून, मार्कण्डेयास रक्षायास श्रीसांबशिव लिंगांतून प्रकट होतो पहा. [हे ठाहीं अनेकरंगित बाणकेळी करणे (बाण उजळविणे)]

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एणेंरीती सांवशिव प्रत्यक्षहोऊन काळास लाता मारून, शूल हाती घेऊन काळाचा उरावरी पाय टेऊन शूलेंकून मारायास उद्युक्त असतां, मार्कण्डेय परमेश्वरास धाहून स्तोत्र करितो पहा.

दरु

अंतकांतक पाहिमां
अखिलार्तिहर पाहिमां ॥ प ॥

नागचर्मांबर देवादिदेवा
नागेन्द्रकेयूर नागास्यजनका
नगजाप्राणनायका ॥ -१

कर्पूरगौर दीनदयाळा
कंजाक्षशर दर्पकसंहरा
तरुणेन्दुकळाधरा ॥ -२

वासवादिसन्नुत हेमाद्रिचाप
वासुदेव[1]सन्नुत भोंसलकुल
शाहेन्द्रपूजित कनकवसन्ता ॥ -३

सू. - एणेंरीती परमेश्वर काळसंहार करितां ह्मणून ऐकून, इन्द्र ब्रह्मा विष्णु अधीकरून काळसंहारमूर्तीचे दर्शनास येतात पहा

प्रावेशिक दरु. र:ग : रामकली - आदिताळ

इन्द्रब्रह्मादिदेवतां
इन्दुसूर्याग्निसहिता ॥ प ॥

---

1. सेवित

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सान्द्र अखिलदेवगण

संतोषेंकून येताति पहा ॥ अ प ॥

सू. - एणेंरीती सकलदेव आणी ऋषीश्वर येऊन परमेश्वरास पाहून साष्टांग नमस्कार करून पुष्पाञ्जलि करून स्तोत्र करितात पहा

दरु

राग : भूपाल – अटताळ

चन्द्रशेखर भुजगकेयूर

सकलभयहर त्रिपुरसंहार ॥ प ॥

सान्द्रदयाकर गरळकंधर

सांबशिव सततमस्मिन् पाहि पाहि ॥ अ प ॥

शहजीराजाभीष्टदायक

शर्व गिरिजाप्राणनायक

विहगराजतुरंगसायक

विश्वहित सत्रतमास्मिन् पाहि पाहि ॥ -१

सू. - एणेंरीती सकलदेव ऋषीश्वर येऊन परमेश्वराचे स्तुति करीत असतां तदनंतर कथा ऐसीजे, भूमिदेवी चिंतायुक्त होऊन परमेश्वराचे सन्निधानास येतो पहा

दरु

भूमिदेवि येते पहा - अति सत्वरा ॥ प ॥

अलिकुलनीलवेणी

अंबुजदळलोचनी - कलकंठी

शुकवाणि कमनीयकल्याणी ॥ -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. – एणेंरीती भूमिदेवी येऊन परमेश्वरास नमस्कार करून बोलने पहा

दरु राग : रामकली – अटताळ

हरहर दयाकरी - अति सत्वरा ॥ प ॥

बहुभार माझ्याने बळेंकून - धरावेना
महादेवा काळास मज करितां प्राणदान द्या ॥ -१

दीनदयाळा देवादिदेव कृपाळा
मीनकेतन दर्पहर मृत्युंजय महेश्वरा ॥ -२

सू. – एणेंरीती भूमिदेवीचे वचन ऐकून परमेश्वर बोलतो पहा

दरु राग : देसाक्षी – अटताळ

दुरात्मा पापिष्ठ दुर्बुद्धि कराया श्रेष्ठ
सुरासुराचेकंटक सुतरां माराया योग्य
भूमि कैसें सोडावे ह्मणतेस ॥ -१

शिवद्रोह हा करितो
शिवभक्तांस उपद्रव करितो
अवनी तुझे कारणें असूं दान यास मी देतों ॥ -२

सू. – एणेंरीती परमेश्वराचें वचन ऐकून सकलदेव आणी ऋषीश्वर बोलताती पहा - देवऋषि वचन - "ऐका स्वामी तुह्मीच प्रतिष्ठा करून यमास स्थापित केले. आतां तुह्मीच यमाच संहार केलातरी. भूभार अधीक होते. यास भूमिदेवीवरि, आह्मावरि, दयाकरून काळास सोडावें स्वामी" - सू. व. - एणेंरीती त्यांचे वचन मान्य करून सकलदेवांवरी अनुग्रह करून काळावरि दयाकरून, सोडून, दीधला. सर्वेच यम उठूनपरमेश्वरास नमस्कार करून स्तोत्रकरितो पहा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

राग : भैरव – अटताळ

दरु

हरहर हरहर हरहर शंकरा ॥ ध्रु० ॥

धन्य आजि सुदिन
धन्य जालों तुझे चरणस्पर्शन
धन्य तुझे दयेने
धन्य जीवन पावन ॥ -१

करें केले मी अपराध
गर्ववचन केले अपराध
चरणें केले मी अपराध
सर्व क्षमाकरा शंकरा ॥ -२

नेत्रें केले मी अपराध
श्रोतें केले मी अपराध
गात्रें केलें मी अपराध
गंगाधरा [1]सकल क्षमाकरा ॥ -३

अज्ञानें केले मी अपराध
आग्रहानें केले अपराध
सुज्ञानें देऊन तूं आतां
सुबुद्धि मज सिकविलें ॥ -४

सू. - एणेंरीती यमाने स्तोत्र केलें ते ऐकून परमेश्वर बोलतो पहा.

1. सर्व

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु

राग : देवगांधारी – झंपताळ

त्याचे वाटे सर्वथा
जाऊं नको शमना ॥ प ॥

भूचक्र चराचरास
बुद्धिवंत मज भक्तास ॥ अ प ॥

शिवभक्ति करील त्यास
शिवपूजा करील त्यास
शिवध्यान करील त्यास – चिंतूनको
शिवस्मरण करील त्यास ॥ –१

शिवकथा ऐकील त्यास
शिवस्थळास चरील त्यास
शिवतत्वज्ञ करील त्यास
त्याचे वाटे सर्वथा जाऊंनको ॥ –२

जो रुद्राक्ष भस्म धरील
जो रुद्रजप सुबुद्धीने करील
जो रुद्रभक्ताची भक्तिकरील
जो रुद्रव्रत प्रदोषकरील ॥ –३

सू. एणेंरीती परमेश्वर यमास बुद्धी सिकऊन निजभक्त मार्कण्डेयास पाहून वर देऊन बोलतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु – (चंदनचर्चित इति छाया)

नित्य मार्कण्डेय ! चिरंजीव असे
सत्य आमुचे भक्तितत्पर हा असे ॥ ध्रु ॥

भाव तुजा पाहून भक्तीस संतोषून
भुवनी काळा पासून रक्षून
सेवा माझे पासून सर्वदा घावी ह्मणून
देवां मुनिमध्यें कीर्ति तुझी प्रकट केली ॥ -१

सू. एणेंरीती परमेश्वरें मार्कण्डेयास वरदेऊन सकलदेव ऋषीश्वरास पाहून बोलतो पहा.

दरु. राग : वसंतभैरवी – आदिताळ

काळसंहार हें चरित्र
कामनेने जो ऐकिल्यां ॥ प ॥

बाळ मार्कंडेया सारिखें
बहुदिन चिरंजीव होईल ॥ अ प ॥

सरस शाहेन्द्र कृत
वरनाटक पाहेल जो
सुरुचिर भक्तींकूने
सुमति ऐकील जो ॥ -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

धरणीवरि त्यास सर्वास

धनधान्य पुत्र देईन

वर कळत्र मित्रादि

वैभव सुख देईन ॥ -२

सू. एणेंरीती परमेश्वराचे वचन ऐकून सकल देवऋषिगण संतोष पावले हें पाहून नारद किन्नर किंपुरुष मंगळ गातातीं पहा.

जयमंगळं नित्य शुभमंगळं ॥ प ॥

मंगळं सदा मृत्युंजयास

मंगळं अभिरामवल्लीस

मंगळं मार्कण्डेय रक्षकास

मंगळं श्रीसांबशिवास ॥ -१

मंगळं शशिवन्हिभानुनेत्रास

मंगळं कैलासवासास

मंगळं निजभक्तरक्षकास

मंगळं दुरितहरणास ॥ -२

मंगळं भोंसलकुल शाहदेवास

मंगळं देवादिदेवास

मंगळं देवतासार्वभौमास

मंगळं श्रीत्यागेश्वरास ॥ -३

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. इति श्रीभोंसलकुलांबुधिसुधाकर श्रीशाहमहाराज विरचितं मृत्युंजयचिरंजीविचरित्र नाटकं सकलश्रेय:प्रदं सकल रसिकविद्वज्जनप्रीतये श्रीत्यागेश्वर परिपूर्ण सच्चिदानंद सांबसदाशिवार्पणमस्तु.

श्री पूर्णानंदार्पणमस्तु

मृत्युंजय चिरंजीव नाटक संपूर्ण.

M. No. *481* ईय लेखनमुनेंदु पदिवनाटकंबैन मृत्युंजयचिरंजीवनाबकं संपूर्णमगुनट्टु गानु लेखरि वेंकटरंगय्य व्रासि पूर्तिसेसिन आकुलु १९.

तेलुगुं लिपींत आहे ते मराठी ताडपत्र नाटक.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

॥ २. श्रीकमलांबात्यागेशपरिणय ॥

(यक्षगान)

*श्रीबावासाहेब विरचित.

तोडयमंगळ दरु राग : नाट – रूपकताळ

जयजय श्री त्यागेश
जयजय गौरीश ॥ पं ॥

जय भोंसलकुल पाल
जय कीर्ति विशाल
जय सद्गुण शील
जय मंगळ शील -१

एकेन्द्रार्चित पाद
तुळजेन्द्रादि विनुत
श्रितजन सुरभूज
श्री त्यागराज -२

शरणु दरु राग : सौराष्ट्र – त्रिपुटताळ

शरणु शरणु शुभप्रदायक
शरणु गौरीनायक

* एकमहाराज ऊर्फ बावासाहेब (1735 – 36 A. D. Thanjavur)

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शरणु भोंसलवंशपालक
शरणु श्रीपतीनायक -१

बालशशिधर नीलकंधर
निगमगोचर शंकर
फाललोचन भयविमोचन
देवपूजित श्रीत्यागराज -२

मंगळ दरु — राग : कांबोदी – आदिताळ

कमलांबात्यागेशास मंगळ - नित्य
कर्पूरगौरास मंगळ ॥ प ॥

एकेन्द्रपूजितास तुळजेन्द्रपालकास
कल्याणदायकास मंगळ -१

कारुण्यसागरास सद्गुणवंतास
महनीयत्यागेशास मंगळ -२

सू. - (नाचंते) ऐका हो भागवत हो: श्रीभवानीपती श्रीलक्ष्मीपती श्रीमहागणपती श्रीरेणुकादेवी श्रीचन्द्रमौळीश्वर श्रीपार्वतीदेवी श्रीखंडेरायादि सर्वदेवताप्रसाद शाश्वत आहे. ते भोंसलवंश (वर्णन) वर्णितों पहा.

श्रीभोंसलकुलमणि एकेन्द्रसुत शाहमहाराज शरभमहाराज सहोदर दीपांबिका गर्भाब्धिसुधाकर तुळजमहाराज कुलपत्नी राजकुमरांबिका नंदनाग्रणी एकमहाराज विरचित **श्रीकमलांबात्यागराजपरिणये** सकल श्रेयसे संतान सौभाग्य सकल-सांम्राज्य विजय अयुरारोग्य दीर्घायुष्याभिवृद्धिकर, सकल कल्याणप्रद आचन्द्रतारक असे. या नाटकीं इष्टदेवताची प्रार्थना करितो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आत्मा त्वं गिरिजापतिः परिकरा प्राणाः शरीरं ग्रहं
पूजा ते विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः ।
संचारपरयोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वगिरः
यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ॥

सू. - एणेंरीती इष्टदेवताची प्रार्थना केल्यानंतर विघ्नेश्वराची प्रार्थना करितो पहा.

सर्वविघ्नहरं देवं शंकरानंदवर्धनं
शुभश्रेयोप्रदातारं वंदेहं गणनायकम् ॥

सू. - एणेंरीती विघ्नेश्वर स्तुति करितां विघ्नेश्वर येतो पहा.

प्रावेशिक दरु

गणपति आला श्रितजनपाला
पाहुनि मजला संतोषें झाला
दीनदयाळा सद्गुणलीला
घनशुभलीला गजमुख आला -१

सू. - एणेंरीती विघ्नेश्वर येऊन सकल विघ्ननिवारण केल्यानंतर कथा ऐसी जे, देवेन्द्र सभेप्रति येतां म्हणून सभ्यास सावध करवयाकारणे विजयवंत येतो पहा.

प्रावेशिक दरु

विजयवंत सभेप्रति येतो
पाठी गदा लाऊनि
काठी करी धरुनि
सोन्याची टोपी घालुनि -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. - एणेंरीती विजयवंत येऊन सभेस सावध केल्यानंतर देवेन्द्र निजसभेसी येतो पहा.

प्रावेशिक दरु राग : शंकराभरणं – आदिदाळ

स्वर्णभूषण लेऊनि
सकलदेवतासी मिळूनि
हाती वज्रायुध घेऊनि
ऐरावतावरि बैसूनि -१

(हे ग्रंथांत पाने दोन व तीन नाहीत त्याकरितां दरु अपूर्त)

सू. - एणेंरीती इन्द्र बोलत असतां मुचुकुंदराजा बोलतो पहा.

चूर्णिका

"ऐक देवा देवतासार्वभौमा, सुत्रामा, वासरपल्लभ कुलप्रदीपा, नवीनपंचसायकरूपा, सद्गुणकलापा, समरदिलीपा, भोंसलकुल कलशांभोधि शशांका, एकेन्द्रतनय महाराज जनका. शाहमहाराज शरभराजन्यसोदर दीपांबिका गर्भशुक्ति मुक्ताफल, तुळजमहीपाल, पालित चोळमंडळीं शिरोमणि कमलापुरस्थळीं, पराशक्ती कमलांबादेवी दृढभक्तीनें त्यागेश्वर प्रीती होवया कारणें तपः करिते. त्या पुण्यस्थळी त्यागेश्वरास प्रतिष्टा केल्यीयां, त्यागेश्वर प्रत्यक्ष होऊनि त्या पराशक्तीस लग्न करूनि, तुळजेन्द्रएकेन्द्रास संतान सौभाग्य सकल साम्राज्याधिपत्य आरोग्य दृढगात्र दीर्घायुष्य देऊनि इष्टदेवता होऊनि सर्वदा प्रतिपालन करावें" ह्मणून सोमास्कन्धास वर मागीतला.

इन्द्र :- ऐक मुचिकुंदा तसेच होईल. राजहंसांबिका रामकुमारांबिका श्रीमत्सुजनाबाई अंबिकास आजी सुदिन. कनकवसंत त्यागेश्वरास घेऊन त्यास्थळी प्रतिष्टा करा हो.

सू. एणेंरीती इन्द्राचे वचन ऐकून, मुचुकुंद, पुरंदराचें आज्ञावरून सोमास्कन्धास घेऊन कमलापुरास येतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रावेशिक दरु,

राग : कैदारगौळा – आदिताळ

सरस फुल्लइलीसकल
परिमळकर्पूरमिळित
तरुणेन्दुचूडामणि
त्यागराजास घेऊनि -१

सू. एणेंरीतीं मुचुकुंद येऊनि शुभलग्न पाहूनि त्यागेश्वर प्रतिष्ठाकेल्यनंतरें त्यागेश्वर दर्शनासाठी कमलांबा येते पहा.

प्रावेशिक दरु.

राग : आहिरी – आदिताळ

कमलांबा आली जननी
कमलदळनयनी
त्यागेश्वर दर्शन इच्छूनि
संतोषें हंसगामिनी -१

मधुर कोकिलवाणी
मधुपसन्निभवेणी
भोंसलकुल पोषिणी
श्यामा नित्यकल्याणी -२

सू. एणेंरीती कमलांबा येऊनि सोमास्कंध पादारविंदी वंदन करूनि स्तोत्र करिते पहा.

कमलांबा द्विपदें :

जय भक्तमंदार जय शुभाकार
जय जगदाधार जय फणिहार -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शंकर परमेश चन्द्रावतंस

पंकजभवनुत पाहि त्यागेश -२

शरणागतत्राणपर शैलजारमण

करी दया मजवरि घनत्यागराज -३

सू. एणेंरीती कमलांबा स्तोत्र झल्यनंतर श्री त्यागेश्वर कमलांबेची भक्ती पाहूनि त्यागेश्वर वर्णितां पहा.

त्यागेश दरु

किर्ता चतुरवंती हे पहा तुह्मी ॥ प ॥

हृदय कमला मध्यें

मायाभक्ती इच्छिती

सरस घनस्तनकुंभ - सारिखे

सरस अधरबिंब - सारिखें -१

सरस बोलणें तीचे

सकलमन्त्र सारिखे

सरस स्वरूप तीचे

पार्वती सारिखे -२

सू. एणेंरीती त्यागेश्वर कमलांबाची शृंगार वर्णिल्यानंतर कमलांबा त्यागेश्वराचे सौन्दर्यातिशय पाहूनि सखीजन परिवृत होऊनि शृंगारवनास येऊनि आप्तसखीस पाहूनि बोलते पहा.

कमलांबा दरु रा : आहिरी - अटताळ

विरह आतां सोसवेना कीरवाणी - मदन

विंदितो मज कुसुमबाणी मधुपवेणी -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सरस चन्द्र तावितो चन्द्रवदना - मज
मधुपरव विरह करितो कुंदरदना -२

मलयमारुत तापकरितां मंजुवाणी - आतां
मत्तकोकिल दावितो भये पद्मपाणी -३

सू. एणेंरीती बोलूनि विरह न सहतां मग ती बोलते पहा.

कमलांबा दरु राग : सावेरी – आदिताळ

सांग गे साजणी
सरस शुभवाणी ॥ १ ॥

श्री त्यागेश येऊन
मजवरि दया करून
कधी मजला लागीन
करील चन्द्रवदना -१

सू. एणेंरीती कमलांबादेवि विरह न सहत असतां देवीची प्राणसखी पाहूनि तीने वेगी महादेवपट्टणास येऊनि प्रसन्न धवळवराहस्वामी जवळी, कमलांबा देवीची वृत्तांत बोलतां ते ऐकूनि, धवळवराहस्वामीस भक्ती करीत असतां, त्यागेश्वर संतोषूनि, तुळजेन्द्र एकेन्द्रास संतान सौभाग्य दीर्घायुष्य देयास कारणें आणी धवळवराहस्वामी कारणें त्यागेश्वर प्रत्यक्ष येतो पहा.

प्रावेशिक दरु राग : सारंगा – आदिताळ

त्यागेश आला संतोषानें
त्यागेश आला
सकलदेवगणसेवित नन्दि
वाहनावरि बैसूनि ॥ ध्रु ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

भोंसलकुलपालक नित्य
सकलश्रेयोदायक
एकेन्द्रसन्नुत तुळजेन्द्रपूजित
इन्द्रनुतनायक त्यागनायक -१

सू. एणेंरीती त्यागेश्वर प्रत्यक्षयेतां समोर धवळ वराह स्वामी येतो पहा.

प्रादेशिक दरु आदिताळ

धवळ वराह येतो - प्रसन्न
धवळ वराह येतो
मणिमयकुंडल कानी शोभतां
मुनिजननिर्जर सन्नुति करितां -१

सू. एणेंरीतीं प्रसन्न धवळवराहस्वामी समोर येऊन राजाधिराज त्यागराजांस पाहून स्तोत्र करितो पहा.

वराह स्वामी दरु राग : बिलहरी — झपुताळ

हरहर शंभो चन्द्रकळाधर
पालय मां देव नित्यं
गौरी मनोहर गंगाजटाधर
एकेन्द्र परिपालक
तुळजेन्द्रसन्नुत इन्द्रादिपूजित
त्यागेश पालय मां -१
नागेन्द्रभूषण नागचर्माम्बरधर
नन्दिवाहन सकलसन्मुनिपालक
शाहेन्द्रसन्नुत कमलजपूजित
भोंसलकुलपालक वरदसोमास्कंध -२

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एणेंरीती प्रसन्न धवळवराहस्वामि स्तोत्रकरून रत्नसिंहासनी बैंसलें असतां त्यागेश्वर दर्शनासाटी नारदमहामुनि येतो पहा.

प्रावेशिक दरु

राग : मोहन – झापुताळ

हर हर शंकर चन्द्रकळाधर

म्हणूनि मनी ध्यान करितां

सुरमुनि नारद आला संतोषें

सुरुचिर वीणावादन करितां -१

सू. - एणेंरीती नारद येऊनि त्यागेश्वरास वराहस्वामीस वंदनकरून स्तोत्रकरून त्यागेश्वरास पाहून बोलतो पहा.

दरु

राग – कांबोदी – आदिताळ

नारद - दया करा गंगाधरा

गौरीमनोहर सुन्दरत्यागेश्वरा

तुजवरि मोहूनि कमलांबा जननी

आहे कल्याणकरा करुणासागरा -१

वर तूं होवया गौरी करिते तपः श्रीपुरी

त्या कन्यकास कल्याणकरूं घे शिवा लौकरी ॥

सू. - एणेंरीती प्रसन्नधवळवराहस्वामीचे वचन ऐकूनि त्यागेश्वर बोलतो पहा.

परमेश्वर - ऐका हो धवळवराहमूर्ति तसेच कल्याणकरून घेईन नारदासी धाडून सकलदेवास सकलऋषीश्वरास बुलावून पाठवा.

सू. - एणेंरीती त्यागेश्वराचे वचन ऐकून धवळवराहमूर्ति नारदास पाठवितां, नारदमुखें त्यागेश्वर कमलांबिकापरिणय ऐकूनि संतोषेंकडूनि लक्ष्मीसहित महाविष्णु येतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रावेशिक दरु राग : सुरटी – आदिताळ

आदिविष्णु संतोषाने
आला लक्ष्मीसहित ॥ १ ॥

एकेन्द्र सन्नुत गरुड
वाहनावरि बैसूनि
उरी कौस्तुभमणि शोभत
करी शंखचक्र विरचित -१

सू. - एणेंरीती आदिविस्णु आल्यानंतर सुब्रह्मण्य आणी गणपति मिळून येतात पहा. (समयोचित दरु उपयोग करा)

सू. - एणेंरीती सुब्रह्मण्य आणी गणपति आल्यानंतर कमलांबात्यागेश्वरपरिणय महोत्सव होवया कारणें सरस्वतीसहित ब्रह्मदेव येतो पहा.

प्रावेशिक दरु राग : कापी – आदिताळ

ब्रह्मदेव आला वाणीसहित ॥ ध्रु० ॥

सकल देवासी मिळूनि
ऐरावतावरी बैसूनि
त्यागेश लग्न इच्छूनि
संतोषहृदय होऊनि -१

सू. - एणेंरीती शचीसमेत इन्द्र आल्यानंतर बृहस्पती येतात पहा,

प्रावेशिक दरु राग : – भैरव – शापुताळ

आला बृहस्पति संतोषूनि
सकल शिष्यासी मिळूनि

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सरस शकुन पाहूनि
त्यागेश दर्शन इच्छूनि -१

सू. - एणेंरीती बृहस्पती आल्यानंतर सकल ऋषीश्वरास बुलावा ह्मणतां सकल ऋषीश्वरासहित येतात पहा.

प्रावेशिक दरु राग : शंकराभरण – शापुताळ

ऋषिजन येतात पहा संतोषें ॥ ध्रु० ॥

विभूति लाऊनि
वलकल नेसूनि
शिष्यासी मिळूनि
शिवभजन करूनि -१

सू. - एणेंरीती सकलऋषीश्वर येऊन त्यागेश्वरास वंदूनि स्तोत्र करितात पहा.

प्रावेशिक दरु राग : एरुकलकांबोदी – आदिताळ

त्यागेशा तुह्मी आह्मावरी
करुणाकरा लौकरी
शरणागतजनपालक भवभय
हर भक्तजनपालक -१

सू. - एणेंरीती सकलऋषीश्वर स्तोत्रकरून सकलऋषिपत्नीस बुलावा ह्मणतां सकल ऋषिपत्नी येतात पहा.

राग : सौराष्ट्र – शापुताळ
प्रावेशिक दरु

ऋषिपत्नी मिळूनि
आजि सुदिन ह्मणूनि

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

त्यागेशास लग्न ह्मणूनि
आला संतोषें करूनि -१

सू. - एणेंरीती ऋषिपत्नी आल्यानंतर प्रसन्नधवळवरामूर्ति कल्याणमूहूर्त पाहून वहिणी कमलांबिकेस बुलावा ह्मणून सखीस पाठवितां कमलांबादेवी सकल शृंगारवती होऊनि सखीसमेत महादेवपट्टणास येते पहा.

प्रावेशिक दरु राग : आहिरी – आदिताळ

कमलांबा आली जननी
कमलदळनयनी
त्यागेश्वर दर्शन इच्छूनि
संतोषें हंसगामिनी -१

मधुर कोकिलवाणी
मधुपसन्निभवेणी
भोंसलकुल पोषिणी
श्यामा नित्यकल्याणी -२

सू. - एणेंरीती श्रीकमलांबा आल्यानंतर प्रसन्नधवळवराहमूर्ति संतुष्टचित्त होऊन, सकल देवास मिळून ब्रह्मा बृहस्पतीस मिळऊन, हरिद्राकुंकुमगंध फलपुष्प इत्यादिक शोभनद्रव्य आणून, त्यागेश्वरास प्रार्थनाकरून कल्याणमंटपीं नवरत्नखचित कांचनपीठीं कमलांबासहित त्यागेश्वरास सुस्थिरकरून, लग्न करितात पहा.

सू. - एणेंरीती लग्नसमई तुंबुरुनारद सकल गंधर्व मिळून शोभन गातात पहा.

दरु

शोभाने शोभाने नित्य ॥ प ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

श्री त्यागाधिराजाने
कमलांबा मनोहरास
श्री एकेन्द्र विनुतास
तुळजेन्द्र पूजितास -१

सू. एणेंरीती कमलांबा त्यागेश्वरास लग्न झाल्यानंतर देवसभेंत बैसले असतां सकल गंधर्व रंभा ऊर्वशी नृत्य आणी गीत करितात पहा.

जक्किणि दरु राग : बिलहरी – आदिताळ

श्री गौरी मनोहरूरे
श्री चन्द्रमौळीश्वरूरे
एकेन्द्र विनुतुरे
तुळजेन्द्र पालकुरे -१

एल्लिलां एल्लांले एल्लिलां एल्लांले

एल्लिलां राजहंसांबिका
तनय एकेन्द्रविनुत
संतान आयुष्य देहि
चन्द्रमौळीश्वर दयेने -२

एल्लिलां ऐल्लांले एल्लिलां एल्लांले ॥

राग : बेगडा – अटताळ

दरु

श्री विश्वेशास भजतों - श्री चन्द्र
मौळीश्वर शंकरास भजतों ॥ १ ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

गौरी मनोहर गंगाजटाधर
भोंसलकुलदेव शंभुमहादेवा - भजतों -२

श्री तुळजेन्द्र महाराजेन्द्र पालक
श्री एकेन्द्रवरदायक शंकरास - भजतों -३

श्री गिरिजानायक संतान दायक
शरभेन्द्रपालक विश्वेश्वरास - भजतों -४

सू. श्रीमद्भोसलवंश कुलकलशैकमहाराजतनूज शाहराजसहोदर शरभमहाराज वरसहोदर तुळजमहाराजतनूज राजहंसांबिकानंदन एकमहाराजविरचित कमलांबात्यागराजपरिणय नाटकीं सकलदेवब्राह्मणाचें वचन फलश्रुति ऐसी जे.

" श्री ऐकेन्द्र तुळजेन्द्र राजहंसांबिका रामकुमारांबिका श्रीमत्सुजनाबाई अंबिकास संतान सौभाग्य सकल साम्राज्याधिपत्य आरोग्य सदृढगात्र दीर्घायुष्यवंत होऊनि सकल बंधुजन हितजन आश्रितजन विद्याजन लोकजनास सकळास प्रतिपालन करूनि त्यागेश वरप्रसादाने कुलदेवता प्रसन्नता शाश्वतेने लक्ष्मीकटाक्षाने भुवनीवरि आचन्द्रतारक साम्राज्य करितील " असे गंधर्वादिक अशीर्वाद करितात.

॥ शुभमस्तु ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

॥ ३. शाकुंतलनाटक ॥

(यक्षगान)

बाबासहेब विरचित.

मंगळ दरु

श्रीगौरीरमणास मंगळ
श्रेयः प्रदायकास मंगळ ॥ प ॥

एकेन्द्रपालकास संतानदायकास
गंगाजटाधरास मंगळ
चन्द्रमौळीश्वरास मंगळ
लक्ष्मीप्रदायकास मंगळ —१

शरणु दरु

शरणुशरणु शुभप्रदायक
शरणु विघ्ननिवारक
शरणु भोंसलवंशपालक
शरणुशरणु विनायका —२

सकलभय शुभकर
सकलदैवत सन्नुत
सकलगुणनिधि सांबतनय
सकलशास्त्र विशारद —३

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

द्विपदें

श्रीगणनायक श्रितपारिजात
नागेन्द्रभूषण नागकेयूर ॥

बालेन्दुशेखर भवभयहरण
नीललोहितहित निर्मलगात्र ॥

जय भवानीपुत्र जय सच्चरित्र
जय पद्मदळनेत्र जय जगन्मित्र ॥

भुवनेशपालित भोंसलवंश
भवदीय पावन पादारविंदि ॥

वंदनकरूनि भूवरि तुळजेन्द्र
नंदन एकभूनायकमणीने ॥

सविनयभक्तीने शाकुंतलाख्य
नवरसालंकारनाटक रचिले ॥

सरसकाव्य सामर्थ्य सत्कविकोटि
उरुतरसंतोष होवयासाटि ॥

सू. - एणेंरीती शाकुंतलनाटकारंभी चन्द्रमौळीश्वर प्रसन्न भवानी खंडेरायादि सकलकुलदेवता वंदूनि इष्टदेवताची स्तोत्रकरूनि शाहेन्द्रास प्रार्थूनि भोंसलवंश वर्णितो पहा. "श्रीमद्भोंसलकुलकलशांबुधि पूर्णचन्द्रा, माळोजी धरापुरंधरतनूज शाहमहाराजतनूज एकमहाराजपुत्र शाहमहाराज शरभमहाराजानुज दीपांबिकातनय एकमहाराज विरचित शाकुंतलनाटक नाचूनि सामाजिक मनसंतोष करूं

नट. एक सू. - परमपावन भोंसलवंश महाराजचरित्र ऐकूनि संतोष झाले. याउपरी भूप्रार्थना विघ्नेश्वरस्तुतिपूर्वक नाटकआरंभकरा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chenhai

सू. - तसांच करितों

विपुलेसर्वसस्याढ्यै: चतुरंभोधिमेखले
कामितार्थप्रदेश्यामे भूमिदेवी नमोस्तुते -१

शास्त्रप्रसंगगोषाढ्यं विद्वद्रत्नविराजितं
सभ्यस्संकुलकल्लोलं सभांभोधिमहंभजे -२

शंभोशर्वदयांबोधे सर्वदेवात्मकप्रभो
तुळजेन्द्रादिसंस्तुत्य कुसुमांजलिरस्तुते -३

श्रेय:संपत्प्रदातारं पार्वतीप्रियनंदनं
तुळजेन्द्रस्तुतं नित्यमेकेन्द्रनुतमाश्रये -४

सू. - एणेंरीती स्तोत्रकरितां नाटकारंभी निर्विघ्नहोवयाकारणे सुमुख होवून विघ्नेश्वर येतां पहा.

प्रावेशिक दरु.

गणपति आला संतोष झाला
गजमुखाला पाहूनि मजला -१

आनंदरूपाला सकलदेव नायकाला
पार्वतीतनयाला पाहूनि मजला -२

सू. - एणेंरीती विघ्नेश्वर येऊन सकल विघ्न निर्विघ्नकेल्यानंतर सूत्रधारं नटीस पाहून बोलतो पहा.

सू. - ऐक नटी वसंतऋतु वर्णनकरा. संस्कृतमाश्रित्य नटी बोलतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कीरकोकिलसन्नाद चारुसूनविराजितः
पंचबाणबलोल्लासी मधुमासोविराजिते ॥

तवास्मिन् गीतरागेण हरिणा समाहृतः
एषराजेव दुष्यंतः सारंगेणातिरह्मसा ॥

सू. - एणेंरीती सूत्रधार सूचना करितां दुष्यंत महाराज येतां पहा.

प्रावेशिक दरु — राग : सौराष्ट्र – आदिताळ

सरस रथावरि बैसूनि
चतुरंगदळ घेऊनि
दुष्यंत नृपशिरोमणि
आला हरिणा पाटी लागूनि -१

सू. - एणेंरीती दुष्यंतराज येऊनि रम्यप्रदेशीं असतां राजदर्शनासाटी द्वारपालक हरिजी नायक येतो पहा.

प्रावेशिक दरु

काटी हाती घेऊनि
कांवळ कटी नेसूनि
भाळी गंध लाऊनि
हरिजीनायक आला हासूनि -१

सू. एणेंरीती हरिजीनायक आल्यानंतर राजप्रधानी येतां पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रावेशिक दरु

राग : केदारगौळ – आदिताळ

चतुरंगदळ घेऊनि
चतुरोपाय योजूनि
सकलभूषण लेऊनि
आला प्राधानी सद्गुणी -२

सू. एणेंरीती राजप्रधानी आल्यानंतर विदूषक येतो पहा.

प्रावेशिक दरु

विकट चतुर बोलत
विनोद बहु करीत
अखिलजन हासवीत
आला विदूषक आतां -१

सू. एणेंरीती विदूषक आल्यानंतर शिखारीजन येतात पहा.

प्रावेशिक दरु

राग : बृंदावनी – आदिताळ

आले संतोषाने शिखारीजन ॥ ध्रु ॥

हाती शिखारा घेऊनि
संग कुत्तर्या धरूनि
दुष्टमृग वनोवनी
धुंडीतधुंडीत मिळूनि -१

सू. एणेंरीती शिखारी जन आल्यानंतर दुष्यंतमहाराज सकलपरिवार उभाकरून शिखारासी मिळूनि शिखारी खेळतो पहा,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु राग : नादनामक्रिया – आदिताळ

शिखारी खेळूं हो
शिखारीजन हो
हरिण ससें बहुत पळताती
लांडिगे डुकरे धावताती -१

सू. एणेंरीती दुष्यंतमहाराजा शिखारी खेळत हरिणाचीपाठी लागून कश्यपमुनीश्वराचा आश्रमाजवळी येतां राजागमन कळून सकलऋषीश्वर येतात पहा.

प्रावेशिक दरु राग : भैरवं – शापुताळ

भाळी विभूति लाऊनि
रुद्राक्षमाला धरूनि
सकलशिष्यासी मिळूनि
सकलऋषीश्वर आले संतोषूनि -१

सू. एणेंरीती ऋषीश्वर आल्यानंतर दुष्यंतमहाराजा वंदनकरितां ऋषीश्वर आशीर्वाद करितात पहा.

आशास्यमन्यत्पुनरुक्तभूतं श्रेयांसि सर्वाण्यदिजग्मुषस्ते
पुत्रं लभस्वात्मगुणानुरूपं भवंतमीढ्यं भवतः पितेव.

सू. एणेंरीती ऋषीश्वर आशीर्वाद केल्यानंतर दुष्यंतमहाराजा ऋषीश्वरास पूजून पाठऊन, हरिणासी लक्षून आश्रमप्रवेश करितेसमई विदूषक बोलतो पहा.

विदूषक - "ऐका महाराज, हा मृग आश्रम मृगासारिखे आहे. पाठी लागून जाऊन क्षणतन्यां कांतागमन वाटते पाहून जाऊं"

सू. एणेंरीती विदूषक बोलत असतां शकुंतलकन्या सखीपरीवृत होऊनि वनविहारार्थ येते पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रावेशिक दरु

राग : आहिरी — आदिताळ

येते पहा शकुंतला ॥ ध्रु ॥

सरस मधुरवाणी
चन्द्रबिंब वदनी
अरुण पल्लवपाणी
हंस वरगामिनी —१

सकलसखी मिळूनि
वनविहार इच्छुनि
सरसिजदळ नयनी
सतत मधुपवेणी —२

पुन:प्रावेशिक दरु

येते शकुंतला कन्या
जलधिकन्या
लावण्य सकलमान्या —१

मेनकातनय धन्या
बिंबाधरी
रूपवती जनगण्या —२

सू. एणेंरीती शकुंतला येऊनि वन विनोद पाहूनि सखींसी बोलते पहा.

राग : वसंतभैरवी — आदिताळ

दरु

शकुंतला — काय वर्णू मी वनशृंगार
काय वर्णू मी सखी सांग ॥ प ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विकच सुमकालित

वृक्ष शोभती पहा ॥ अ प ॥

नवपल्लवसमेत वल्ली पहा

मधुकर झेंकारकरितात पहा

कोकिल ध्वनिकरितात पहा -१

सू. एणेंरीती शकुंतला वनलीला वर्णनकरीत असतां हरिणाचेपाठी लागून येऊन दुष्यंतमहाराजा त्यावनी शकुंतलासपाहून लतांतरीलपून विदूषकाप्रती बोलतो पहा.

दरु राग : कापी – अदिताळ

दुष्यंत - मन माझे हरिते पहा

नर्मसखी हे

मन माझे भुलाविती

नर्मसखी -१

मदव मोहन मन्त्र कीं

नर्मसखी हे

मानिनीमणि कीं सांग

नर्मसखी -२

सू. एणेंरीतीं दुष्यंतमहाराज शकुंतलासपाहून मोहून लतांतरीं लपून असतां शकुंतला सखीप्रती बोलते पहा.

शकुंतला दरु अटताळ

काय सांगू सखी हे विनोद ॥ ध्रु ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सुंदरमुख पाहूनि सखी - माझे

भुलूनि भ्रमरमनी

विकचकमल ह्मणूनि - धांरूनि

नाद करितो साजणी -१

मधुराधर पाहूनि - शुकधाम

देतो पल्लव ह्मणूनि

गाणे माझे ऐकूनि - कोकिल

कलहास येतो वनी -२

सू. एणेंरीती शकुंतलाचे भयवचन ऐकून सखी बोलते पहा.

दरु राग : कांबोदी – आदिताळ

सखी - भय कैंचे सखी भय कैंचे ॥ प ॥

राजदुष्यंत महाराज

राज्य करीत असतां

मदनाचे बळ हे

मधुप शुकादीचे -१

चोरांचे भय नाही

चाडीचे भय नाही

जाराचे भय नाही

त्याचे देशी मधुप -२

अनिलाचे भय नाही

अग्नीचे भय नाही

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शत्रूचे भय नाही
त्याचे देशी परभृत -३

सुगुण दुष्यंत भूप
तपन सम प्रताप
असतां मन्मथरूप
अब्जाक्षी शुकालाप -४

सू. - एणेंरीती सखी बोलत असतां शकुंतला लतांतरी दुष्यंत महाराजास पाहून मन्मथ ह्मणून सखीसी बोलते पहा.

दरु राग : आहिरी – अटताळ

शकुंतला - विरह माझे सोसवेना मधुपवेणी - आतां
सरसचंदन साहवेना मंजुळवाणी -१

चन्द्रपाहूनि सोसवेना चन्द्रवदना - आतां
सरस कर्पूरविडे घेऊन कमलनयना -२

सरस गान सोसवेना कीरवाणी - आतां
मदन माझे बाण विंदितो नीलवेणी -३

सू. - एणेंरीती शकुंतला दुष्यंतमहाराजाचे सौंदर्यपाहून सखीसी मग ती बोलते पहा.

दरु एकताळ

शकुंतला - मदन हेकीं मज कळेना
नृपती हेकीं मज कळेना -१

चन्द्र हेकीं मज कळेना
इन्द्र हेकीं मज कळेना -२

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सूर्य हेकीं मज कळेना

गंधर्व हेकीं मज कळेना -३

सू. - एणेंरीती शकुंतला विरह अभिनयतअसतां दुष्यंतमहाराजा शकुंतलास पाहून विदूषकाप्रती बोलतो पहा.

दरु राग : ललितपंचम – आदिताळ

दुष्यंत - न कळे सखा सांगा हे कौतुक ॥ प ॥

मुक्तामणीकीं सुन्दर रतीकीं

वनदेवताकीं कांतामणीकीं -१

चन्द्रबिंबकीं सरस मुकुरकीं

विकचपद्मकीं कांतामुखकीं -२

मदगजकुंभकीं माणिककंदुककीं

कनककलशकीं कांताकुचकीं -३

सू. - एणेंरीती दुष्यंतमहाराजा बोलून निजसखाप्रती बोलतो पहा.

दुष्यंत - ऐका सखा आश्रमी जाऊन, तेथिंचे अमांथिक कौतुक पाहून याहो.

विदूषक - ऐका महाराजा आश्रमी जाऊन झणतल्यां व्याकुल कुत्ताचे भये कडून, तुम्हाजवळी बसलों हे.

दरु राग ; घंटारवं – झापुताळ

सखा - मी तिकडे जाईनां - मजे

कुत्तर्यांचे भय सोसवेनां -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

हास्य मी कधी करीना - तुमचे
संग मी शिखारीसी कधी येईना -२

व्याघ्र भय सासवेना - मदनभूत
खिदडिल्याने मज धाववेना -३

सू. - एणेंरीती विदूषकाचेवचन ऐकून दुष्यंतराजा विदूषाकासी बोलतो पहा.

दुष्यंत - ऐका विदूषक भीऊंनको तेथें जाऊन वनदेवतास ऋषिकुमारीकीं पूर्वोत्तर विचारून ये.

सू. - एणेंरीती दुष्यंत बोलतां विदूषक सखीजवळी येऊन बोलतो पहा.

दरु राग : कापी – शापुताळ

विदूषक - कन्यामणि हे कोण मजला सांग - गंधर्व
कन्याकीं ऋषितनूजकीं सांगा.

सू. - एणेंरीती विदूषक बोलतां शकुंतलाची आज्ञानंतर मंजुवाणी बोलते पहा.

दरु राग : तोडी – आदिताळ

सखी - ऐका तुह्मी सखा
कौशिकाची कन्या हे
मेनका तनूज हे
शकुंतला कन्या हे -१

सरस गुणवती हे
सुंदर रूपवती हे
सर्वांगसुंदरी हे
शकुंतला कन्या हे -२

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. - एणेंरीती बोलून सखी विदूषकाची पूर्वोत्तर विचारितां विदूषक बोलतो पहा.

दरु

राग : भैरवी – आदिताळ

विदूषक - चन्द्रवंश नृप श्रीमंत
जनपति दुष्यंत - त्याचा
सखा मी धीमंत
मज हे वृत्तांत -१

सू. - एणेंरीती विदूषक निजवृत्तांत सांगून दुष्यंतमहाराजाचे जवळी जाऊन शकुंतलाचे वृत्तांत आणी सौंदर्य वर्णितो पहा.

चूर्णिका

विदूषक - "ऐका दुष्यंतमहाराज, रविकोटितेज, अनन्यसाधारणलावण्या, कौशिक मेनकाकन्या, सुंदरी जनाग्रगण्या, शकुंतलानाम कन्या, कश्यपाश्रमवासिनी गजराजगामिनि, संफुल्लशतपत्रजितनेत्रा, संपूर्ण चन्द्रमंडलसमान वक्त्रा, नवपद्मकोश कंदुक करिकुंभगिरिवरसमानलसमानवक्षोजयुगळा, शंबररिपुकरधृत कंबुसंदरगळा, अरुणपल्लवाधरा, कटिजितवसुंधरा, नीलाभ्रनिभवेणी, कोकिलवाणी, सकलसद्गुण सौंदर्यभाग्या, तुज योग्या," तीचे सौंदर्यातिशय काय वर्णू मी काय वर्णू.

सू. - एणेंरीती नर्मसखाचे वचन ऐकून दुस्यंतराजा पंचबाण वश्यहोऊन शकुंतला जवळी येतो पहा.

राग : सौराष्ट्र – आदिताळ

प्रावेशिक दरु

विरहभार कडूनि
विवशचित्त होऊनि

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दुष्यंत नृपशिरोमणि
येतो शकुंतला इच्छूनि

सू. एणेंरीती दुष्यंतमहाराजा येतां पाहूनि (सरसरंभा) लाजूनि शकुंतला कन्या वृक्ष आश्रमी घेऊनि असतां तीचेमन कळून दुष्यंतमहाराजासी राजोपचार करून सखीजन बोलतात पहा.

राग : पंतुवराळी – आदिदाळ

दरु

सुदिन झाले आजि
कल्याण झाले
नृपशिखामणि तुझे
पाहून आह्माला -१

भानुबिंब पाहूनि
पद्मिनीसेपरी
चन्द्रबिंब पाहूनि
कुमुदिनीपरी -२

सू. एणेंरीती सखीवचन ऐकून विदूषक बोलतां पहा.

चूर्णिका

विदूषक - ऐका सखीजना हो "महाराज दुष्यंत शकुंतलाकन्या मिळविल्याने, हे वधूवर संतोषाने, कौंडण्यारत्नापरी, चन्द्रचन्द्रिकेपरी उमामहेश्वरापरी, लक्ष्मी नारायणापरी, वाणीहिरण्यगर्भापरी, शचीपुरंदरापरी, सीतारामचन्द्रापरी, रुक्मिणी कृष्णापरी, रतीमन्मथापरी, सतत संतानसौभाग्य साम्राज्यादि सौख्य अनुभवीत असतील."

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सखी - तुझे कल्याणवचन वाङ्निश्चय निश्चये.

सू. एणेंरीती सखी बोलून सखीजन शकुंतलेप्रती बोलती पहा.

दरु

राग : नादनामाक्रिया – शापुताळ

सखीजन - एके बाई शकुंतले झाले
तुझे मनोरथ सफळ
आजि दैव अनुकूल झाले
आह्मा संतोष झाले -१

दुष्यंतराजा तुज योग्य - तूं
दुष्यंतराजास योग्य
वरिल्याने या नृपतीस - तूं
आनंद होईल आह्मास -२

सू. एणेंरीतो सखीजन वदून, पुष्पवेंचाचे व्याजें सखीजन निघाले. विदूषकहीं भोजन व्याजें निघाला. त्यासमई उभयतां येकांतअसतां दुष्यंतमहाराजा शकुंतलेप्रती बोलतो पहा.

दरु

राग : आहिरी – आदिताळ

दुष्यंत - कां लाजतेस मज पाहूनि
कमलनयनी - मुख ॥ प ॥

माझे चन्द्रबिंब आहे
तुजनेत्र चकोर आहे
मधुराधरसुधा मज दे
ममतेने आलिंगन दे -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

[1]आजि लावण्य होईन
तुजवचन मी ऐकीन
मजसी मिळूनि राहे
उचित गांधर्वविवाहे -२

सू. एणेंरीती दुष्यंताचेवचन ऐकून शकुंतला लज्जावती होऊन बोलते पहा.

संवाद दरु राग : मोहन – शापुताळ

शकुंतला - जनपाल तूं मज
वचन ऐकिल्यानें
अनुमान नाहीं तुजला
वश्य होईना -१

दुष्यंत - ऐक मानिनी तुज
शुभ वचनें
अनुमान न करी मज
पाणिग्रहणें -२

शकुंतला - मज मानसीं तूं
राज्य दिल्ह्यानें
संतोषाने मी
तुजसीं रमेने -३

दुष्यंत - सरस मुद्रिका हे
घेतां कटी

---

1. तुजला वश्य होईन.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तूं शकुंतले मज
दयाकरी -४

शकुंतला - सरस गांधर्व
कल्याण करूनि
मजसी मिळा तुह्मी
नृपशिरोमणि -५

दुष्यंत - मदन लीला करूं
मदवती तां करी
ऐसी सुदिन झाला
ऐक तूं नारी -६

सू. एणेंरीती दुष्यंतमहाराजा शकुंतलास मुद्रिकादेऊन गांधर्वविवाह करून सपरिवार स्वपट्टणास गेल्यानंतर तदनंतर कथासंविधान एसीजे. "शकुंतला गरवार होऊन येते पहा"

शकुंतला प्रावेशिक दरु आदिताळ

हंसगमन चालती - पूर्णचन्द्र
सारखे मुख शोभती -१

कुचकुंभयुगीं दिसती - मधुपयुक्त
नवपद्मकोशरीती -२

तनु शोभे घामकढूनि - कोकिलवाणि
नाजूकवस्त्र लेऊनि -३

सू. एणेंरीती शकुंतला आल्यानंतर मसवसमई सुईणीसी बुलावं ह्मणतां सुईणी येते पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सुईण प्रावेशिक दरु

लेंकरे कडे घेऊनि
निंबाचे पाला घेऊनि
काटी हाती घेऊनि
आली सुईणी धाऊनि -१

सू. एणेंरीती शकुंतलेस पुत्रझाला त्यानंतर लग्न पहावयास जोश्यास बुलाऊं या
म्हणतां रंगाजोशी येतां पहा.

जोशी प्रावेशिक दरु

काटी हाती घेऊनि
कपाळीं गंध लाऊनि
पंचांग हाती घेऊनि
आला रंगाजोशी संतोषूनि -१

सू. - एणेंरीती जोशी येऊनि जातक पाहिल्यानंतर स्वपुत्र घेऊनि बाळंतिनी कश्यपमुनीं
जवळी येते पहा.

दरु राग : सौराष्ट्र

हाती बाळ घेऊनि
क्षीरभरितस्तनी
हिरवी चोळीसाडी नेसूनि
येते पहा बाळंतिणी -१

सू. - एणेंरीती शकुंतला आल्यानंतर कश्यपमुनीं ज्ञानदृष्टीने सकलवृत्तांत समजून
शकुंतलेस पाहून बोलतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कश्यप - शूरस्य सत्यसंधस्य दुष्यंतस्य यशस्विन:
भार्यासी दैवकृपया धन्या त्वंहि शकुंतले

"ऐक शकुंतले दैवेचेने दुष्यंतमहाराज तुझा पुरुषझाला, पुत्रहीं उपजला आह्मास आनंदझाला, (सर्वदमन) पुत्रघेऊन पतीकडे जाऊन सकलसाम्राज्यसुख अनुभवितां पतीची सेवाकरीत सुखरूप असे हो"

सू. - एणेंरीती कश्यपमुनी ऐसा ह्मणून आशीर्वादकरून जातकर्मकरून सर्वदमन ह्मणून नामकरणकरून पांचवर्षे झाल्यानंतर शिष्यासहित सर्वदमनपुत्र आणी शकुंतलेस पाठवितां पुत्रासहित शकुंतला दुष्यंतमहाराजाजवळी येते पहा.

प्रावेशिक दरु

शकुंतला - सत्पुत्र संग घेऊनि
संतोषचित्त होऊनि
आपले पतीस इछूनि
आली भामिनी -१

सू. - एणेंरीती शकुंतलेस आणून शिष्य, दुष्यंतमहाराजास पाहून बोलतात पहा.

शिष्य - बालोऽयमेकश:पुत्र: भार्येयेतिशकुन्तला ।
राजन् ! रक्षसुतं भार्यामागता काश्यपाज्ञया ॥

सू. - एणेंरीती शकुंतलेसी वोपून शिष्य आश्रमास चालिले. तदनंतर दुष्यंतमहाराजा अद्भुतपाहून शकुंतलेसपाहून बोलतो पहा.

राग : पंतुवराळी

दरु

दुष्यंत - कोण तूं सांगे चन्द्रवदनी
कोण तूं सांगे मधुकरकेशी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कोकिलवाणी काय निमित्त
कोठूनि आलीसी -१

कमललोचनी तुज
कधी पाहिले
पति कोण सांगगे
बालेन्दुफाले -१

सू. - एणेंरीती दुष्यंतराजाचे वचनऐकून लज्जाकडून नम्रमुखी होऊन शकुंतला भामिनी बोलते पहा.

२६ राग : नीलांवरी – अटताळ

ऐका हो महाराजे
काय सांगू मी
तुह्मी सर्वज्ञ होऊनि
पुसतां तूं कोण ह्मणूनि -१

कार्य बांधव राजे
ह्मणतां ते गोष्टी सहज
विसरला तुह्मी कां जे
साक्षी यास रतीराजे -२

हरिणापाठी लागूनि
तुह्मी आश्रमी येऊनि
भरवसा मज देऊनि
रमलाकीं नृपमणि -३

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तूंच माझा पती
मींच तुझी युवती
तुजविना मज जगती
नाही कीं वेगळी गती -४

सू. - एणेंरीती शकुंतलेचे वचनऐकून दुष्यंतराजा बोलतो पहा.

दुष्यंत - ऐक सुंदरी धनेच्छा असल्याने धनिकापासी जा, कामेच्छा असल्याने कामुकापासी जा, सूर्यचन्द्रवंशराजे परस्त्री परधन आशा न करिनात उगा जागें.

सू. - एणेंरीती दुष्यंतराजाचे वचनऐकून शकुंतलां बोलते पहा.

दरु राग : घंटरवं – आदिताळ

शकुंतला - सत्य सोडूं नये
दुष्यंतराजा
सत्याकडूनिकीं
सकलकल्याण विजय -१

तुह्मी मज सोडिल्याने
मी तुह्मास सोडीना
तुमचीमुद्रा पाहूनि
करीं दया नीतीकळूनि -२

सू. - एणेंरीती दुष्यंतमहाराज शकुंतला परस्पर विवादकरित असतां आकस्मात नारद येतो पहा.

राग : – मोहनं – शापुताळ

प्रावेशिक दरु

नारद - नारायण हरी नारायण हरी
नारायण हरी ह्मणतां

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

महतींवीणा वाजवीत आला
नारद मुनीन्द्र गातां -१

सू. - एणेंरीती नारदयेऊन दुष्यंतास आशीर्वादकरून बोलतो पहा.

नारद - ऐका दुष्यंतराजा महापतिव्रता परमपावनी अलिनीलकुंतला शकुंतला हे तुझीभार्या. हा बालक तुझीपुत्र हे अर्थसंशय नाही. अंगीकार करा. ह्याबाळकास अनुरूपवती गंधर्वकन्या अनुकूलकरून आणिलो सुकन्यकेची विवाहकरून सुखी असा हो.

सू. - एणेंरीती नारद वदतां महामुनि दर्शनप्रभावेंकडून पूर्वस्मरण येऊन दुष्यंतराजा बोलतो पहा.

दुष्यंत - ऐकां नारदमुनिचन्द्रा प्रत्यक्षझाली ते गोष्टी अंगीकरिल्या त्याजानास तथ्य वाटेना याकरितां परिहारकेल्यां इत्क्यावरी तुमचे वचनाप्रमाणें वर्तू स्वामी.

सू. - एणेंरीती दुष्यंतमहाराजा अंगीकारकरून शकुंतलेस अंतःपुर पाठऊन सर्वदमन कुमारास नामकरण उपनयनादिक करायासाटीं पुरोहितास बुलावा ह्मणतां पुरोहित येतो पहा.

प्रावेशिक दरु

पुरोहित - वेदशास्त्रपुराण
वेत्ता पुरोहित
आला अतित्वरित
अखिलाश्रित शिष्यासहित

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. - एणेंरीती पुरोहित अल्यानंतर दुष्यंतमहाराजा पुत्रास भरतम्हणून नामठेवून उपनयनादिक करून पुत्रास विवाहकरायाकारणें गंधर्वकन्या सुकन्याला बुलावितां सुकन्या येते पहा.

प्रावेशिक दरु   राग : बिलावल – आदिताळ

सुकन्या - येते सुकन्या पहा
सौंदर्यगेहा
हेमसमानदेहा -१

राजहंसगामिनी
कोकिलवाणी
राजीवदळनयनी -२

सू. - एणेंरीती सुकन्या आल्यानंतर कनककदळीस्तंभ नारिकेळ नवपल्लवतोरणांक चित्र वितान सकलजनबांधवसमेत कल्याणमंटपी नवरत्नपीठी वधूवरास बसऊनि विवाह करितेसमईं शोभनगान करायासाटी सुवासिनीजनास बुलावितां सुवासिनीजन येतात पहा.

प्रावेशिक दरु   राग : सौराष्ट्र – आदिताळ

सुवासिनी - चोळी लुगडे नेसूनि
पाळी कुंकू लाऊनि
बगळयां लेंकरू घेऊनि
आल्यां सुवासिन्या मिळूनि

सू. एणेंरीती सुवासिनीजन आल्यानंतर भरत सुकन्यका विवाहमहोत्सवसमईं गंधर्व मंगळ गातात पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

द३

चतुरास भरत सुकन्यकेस
सतत सद्गुणरूपसदनास
सरसिजलोचनास पंकजवदनास
परमपावन शुभभरतास -१

राग : गुम्मकांबोदी

मंगळ दरु

तुळजमहाराजास मंगळ - नित्य
दीपांबिकातनयास मंगळ -१

सज्जनाधाराम सुंदररूपवंतास
एकेन्द्रविनुतास मंगळ -२

दुष्टजननिग्रहास शिष्टजनपालकास
महनीयचरितास मंगळ -३

भोंसलकुलजांस भोगदेवेन्द्रास
चोळभूपालास मंगळ -४

गद्य

इति श्रीमद्भोंसलकुलकलशांभोदिसुधाकर तुळजमहाराजप्रियनंदनेन, श्रीमदेकमहाराज पुरंदरेण श्रींगिरिजाशारदांबाकटाक्षलब्द चतुर्विधकवितानिर्वाहकेनविरचित शाकुंतलनाम नाटिकमिदं, सतत संतानसौभाग्य आरोग्य आयुष्य अभिवृद्धिविजय सकलसाम्राज्यलाभ पुत्रपौत्राभिवृद्धि शौर्यधैर्य सत्कीर्तिभाग्य समुदयं, एकेन्द्रतुळजेन्द्रयोः ददातु पश्यतां शृण्वतांच. शाकुंतलनाटक संपूर्ण.

॥ सुभमस्तु ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

॥ ४. श्रीपार्वतीपरिणय नाटक ॥

प्रतापसिंहराजा विरचित

श्रीशालनी जाप्रति नागराजी
योषास्थयें लाभलि नागराजी

भूषावळी जो धरि नागराजी
असो अह्मा तो सुर नागराजी

सू. पारिपार्श्वका येथें संगीतसाहित्यादि सकलकलावल्लभ परमदुर्लभ शिवभक्ति पारावारपारीण अनन्यसाधारण अदूष्यवैदुष्यमंडित पंडितमंडली - श्रीचन्द्रमौलीश्वरात्म-स्वरूप श्रीप्रतापरामचन्द्र नित्यमहोत्सव पहायास मिळाली आहे. तरी सर्वजन मनोरंजन कल्याणपरंपरावर्धन पार्वतीकल्याणनावांचे नाटक नाचऊन यांचेचित्त संतुष्टकरावें.

पारिपार्श्वक - अरे सूत्रधारा अनवद्य **गद्यपद्यात्मकनाटकाचा** निर्माता कोण?

सू. - प्रतापराम सद्भक्ति विभवोद्धाम जो महा
प्रतापसिंहराजर्षि प्रणीतायासि तो पहा

क्षमाधरगणी महामहिम दूसरा तो गिरी
समान जगि जाणसे गगनहिं स्वशृंगें गिरी

हिमांशुकृतशेखर स्वसुर दिव्यवेषें पहा
हिमाद्रिवर येतसे भरुनियां प्रमोदें महा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

राग : भैरवी – आदिताळ

प्रावेशिक दरु

हिमवंत - आला हिमाचल हा
अचलेश पहा ॥ पं ॥

मानुषवेष धरूनि
सानुचर गुणनिधि
मान्य शुद्धभावाख्य
मैत्र वसे सन्निधि -१

सू. एणेंरीती हिमाचल येऊन मेनेचे स्मरणकरितां ती येते पहा.

प्रावेशिक दरु

मेनादेवि - मेना येतसें विलोकीं
एणांकमुखी
जे नारीमणी लोकीं
मीनांकक्कांते सारखी -१

सू. एणेंरीती मेनादेवि येऊन संतान नाहीह्मणून अत्यंत चिंतातुर भर्तारानिकट जाऊन विनयपूर्वक बोलते पहा.

मेनादेवि दरु

राग : आहिरी – शापुताळ

ऐक आतां आत्मनाथा ॥ पं ॥

ऐक स्वामी महदैश्वर्य सागरा
गैकरिनासि हे एक माझी गिरा ॥ अ पं ॥

लेंकरावीण जीणें लेखिजे आमुचे लोकीं
आश्चर्यचि देख महा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शेखि गति परस्लोकींहिं नाहीच हेकीं
सांगति पुण्यश्लोकी आम्हां

जीवनवीणें कुंटें जेवी वृथा आणि
ते वांजवृक्षहिं त्याचेपरी
जीवेंवीणें कुंडि हे वल्लभा जसी
तेवींच आमुची भावींपरी

कोणाचें लागतां ऋणी रात्रींदिस
नेणेंची हे मी नीट मनी
जाणे तपासीच जाणे यापरि युक्त
राणामध्यें नगराजशिरोमणी

सू. - एणेंरीती मेनाने प्रार्थना करितां ते युक्त मानून अपल्यास्थळींच हिमाद्रि तपश्चरणीरत होतां. अनुचरां सगट मेनादेवी सेवेस तत्परझाली पहा.

निजकरेंचि सुगंध उगाळी
व्यजन घेऊनि वातहिं घाली

अलस आणि पीठींत अघाली
कळुनि धर्म करूंहिं निघाली

सू. - एणेंरीती मेनोदेवी सेवाकरितां हिमाचलानें पूजनपूर्वक देवींचें ध्यान धरितां तो नेपथ्यांत शुद्धभाव येतो पहा.

राग : कल्याणी

प्रावेशिक दरु

शुद्धभाव आला - उद्धारक जो
शुद्धभाव आला ॥ १ ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शुद्धभावं आला उद्धार कार्यें जो

बद्धकंकण प्रबुद्धजना इष्ट -१

सू. - एणेंरीती शुद्धभाव येऊनि आपल्या प्रभाव वर्णितो पहा.

हिमाचलाचा शुभभाव साचा

घेऊनि ठेवा आजि चिद्रसाचा

आलों पहा मी बहुतां दिसांचा

संदर्शनें हर्ष अपार सांचा

सू. - आणिकहिं एक चोज ऐक

तपोत तप तापसी, जप जपोत जें निश्चयें

कपोत खगवृत्तिनें, उदरहिं भरोत स्वयें

उपोषण करोतहिं, परि न पोशिता पैं मला

अपोहन घडे फळा, ह्मणुनि धन्य मी एकला

सू. - एणेंरीती आपुला, प्रभाव वर्णित शुद्धभावानें येऊन हिमाचलास विलोकून तूं महा भाग्याचा, साक्षात परदेवता प्रसन्नझाली ह्मणून संवादतां देवी येते पहा.

प्रावेशिक दरु. राग : [1] कानडा

देवी - देवी आली देख नयनीं ॥ प ॥

देवी आली महदेवयोगें जवळी ॥ अ प ॥

कोटिदिनकररुचिर कोटीरमस्तकीं

नेट कालकलंकीं नीट कैसा

1. राग कन्नडा (नवरसकन्नडा)

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लोट परदीप्तीचा लोटलाकीं जणू
वाटतो भाव किति वानि जे कायसा -१

सू. - एणेंरीती हृदयसरोवरात मनोलक्षण उत्पलात . प्रत्यक्षझाली जे त्रिपुरसुंदरी तिला विलोकून विनयपूर्वक हिमाचल बोलतो पहा.

दरु राग : भैरवी

हिमाचल - अपुरूपभेटी तुझी आजि जाहली ॥ प ॥

उपकार काय वदूं आपण मी माऊली ॥ अ प ॥

तपति तप ज्यासाटीं, तापसी थोर ते
उपरि उपरि नसूनि, उपरतीची
नपरि त्यांचे दिठी, सपनिहि जे पडत
रूपडें पूर्णसुख, रूपजीचें असीची -१

मननशील स्वयें मुनिहिं विख्यात जें
सनकप्रभृति भले आणिक सुरुची
जननी ऐशाची थामनिंहिं नस्फुरसी जे
अनुपमे त्या तुझ्या घन बोध मूर्तीची -२

दरु

तेंचि अवो जननी तत्व तूं ॥ प ॥

प्रकृतिपर जगत्प्रकृति प्रथम जे
सुकृति वदति मम, सुकृत विपाकचि ॥ अ प ॥

शंख देतां ज्येथ, शंख चित्सुख लाभें
नो करिलि योगी, जोख देना कोण्हा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पारुषल्या जेथें, पौरुषेंतर वाणी
पौरुष रूपमहा, पुरुष जीचें जगी -१

सू. - एणेंरीती हिमाचलकृत स्तोत्र ऐकून देवीनें संतुष्टहोऊन अभीष्टवर माग ह्मणतां त्यानें मेनेचें मुख विलोकितां ते देवीप्रति बोलते पहा.

देवी प्रसन्न जाहलीस जरी स्वभावें
हे विश्वबीज निजरूप दयार्द्रभावें
लोपोनि आपस नटें अतिबालवेषें
तेणें भरीन नभ मी जननी प्रतोषें

सू. एणेंरीती मेनेचें वाक्य ऐकून देवीनें तान्ह्य लेंकराचें रूप धरिते पहा.

निरखुनि गिरिजेचावेष तैं फार तान्हा
स्तनि गिरिवनितेचा सूटला थोर पान्हा
उचलुनि करपद्में पद्मिनीस्त्री उमेतें
सुचित सदनिं आली प्राणनाथा समेतें

सू. एणेंरीती हिमाचल मेनादेवी देवदेवीस घेऊन आपुल्याघरास आल्यानंतर देवेंद्र येतां ह्मणून सभ्यास सावधकरायाकारणें कंचुकी येता पहा.

प्रावेशिक दरु राग : कल्याणी

कंचुकी - येतसे अमरनाथाचा दूत तो पहा ॥ प ॥

येतसे शक्राचा दूत, येथेंचि तेजस्वी महा ॥ अ प ॥

वेत्र ज्याचे हातीं मिरवे,
चित्र कनकाचा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

नेत्रें निमिषावीणहिं दोन्ही,
चित्रि लिहिजे वेष जयाचा

सू. एणेंरीती कंचुकी येऊन सभ्यास सावधकेल्यानंतर देवेंद्र येतो पहा.

प्रावेशिक दरु. राग : सावेरी

देवेन्द्र - आला शचीपति आराधिति
अति ज्याला निर्जर सुमती ॥ प ॥

वालार्कसमद्युति मालारत्नाचिया
मोला गळां ज्याचिया डोलती ॥ अ प ॥

हेमदंड दिव्यचामरें उडविती
वामलोचना सुंदरी
प्रेमभरितचि ते मयूरगण
कोमलस्वरिं गाति आदरीं -१

सू. एणेंरीती देवेंद्रयेऊन आपणास तारकासुरानें कष्टीकेलें ते वर्तमान ब्रह्मदेवापासीं निवेदावें ह्मणून चिंतितां ब्रह्मदेव येतो पहा.

प्रावेशिक दरु

ब्रह्मदेव - येतसे ब्रह्मदेव देवदेव ॥ प ॥

येतसे विधि सर्वचेतनि उत्तम
येथेंचि त्रिभुवनहेतु निरामय ॥ अ प ॥

मंडितमुनिवर मंडली धरूनि - क -
मंडलु निजकरीं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पुंडरीकासनशौंड जो ब्रह्मांडलक्षण

भांडरचनि अखण्डवैभव -१

सू. एणेंरीती ब्रह्मदेव आल्यानंतर (देवेंद्र) त्याला विलोकून तारकासुरांचे वर्तमान सांगतो पहा.

दरु

राग : सौराष्ट्र

देवेन्द्र -

फार कांहीं सळितो हां

तारकासुर पापी महा

सारभूत थोंड कां हा

स्वामी कथितों भाव पहा -१

तापत्रय निरसाया

तापसीं मांडितां तपा

बापुडया त्यांचाही

प्राण घेतो अकृपा -२

याजितां देवता उद्देशें

यजमान ते तेथें जनीं

मजचि द्या हविर्भाग

म्हणतो हा दुष्ट मनीं -३

घातकी ये तिहिं लोकीं

घातलीं आपुलीं ठाणीं

रातलों सेवनि त्यांचे

ताता आह्मी दीनवणी -४

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

स्वामी यया दनुजकुलाधम तारकानें
केल्यां आह्मी स्वपदभ्रष्ठ प्रतारकानें
त्याचा जसा परिसुं भाग्य उतारकानें
ते सांगिजेपरि भयांबुधि तारकाने

सू. याप्रमाणें देवेन्द्राचे वाक्य ऐकून ब्रह्मदेव प्रत्युत्तर बोलतो पहा.

दरु राग : हुशेनी

ब्रह्मा - सांगतों मी परिसा उपाय तो
चांगला एक असा ॥ प ॥

सांगतों मार्ग मी चांग शत्रूचिं उचले
भांगडी करूनिहिं टांगडी मांडेसा ॥ अ प ॥

मार वैरीस सुकुमार गिरीश - कु
मारी पासूनि सुकुमार जन्मला जरी
मारील तोचि कुमार नामांकित
तारक दिसतो सुमार ऐसापरी -१

सू. एणेंरीती ब्रह्मदेवाचेंवाक्य ऐकून देवेन्द्र विज्ञापना करितो पहा.

वचन - स्वामी आपण सांगीतले तेगोष्टी अशक्य ऐसी वाटते तेचि ऐकावे.

कदाचिद्दिकद्दंती पाहतील भागांनि धरणी
रणी गाढध्वांताकरीं अजय पावेल तरणी
त्वरें पंगू वेघूं सकल गिरिशृंगाहिं उपरी
परी नोहे कामी पुरहर केला हे स्फुटपरी -७

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. - ऐसे देवेन्द्राचेंवाक्य ऐकून ब्रह्मदेव प्रत्युत्तरदेतो पहा.

वचन - जरी ईश्वर ऊर्ध्वरेता निष्काम यागोष्टीस संदेहनाही. अहो देवेन्द्रा परमेश्वर निष्काम परंतू तो आत्मरामस्वरूपानंदभोगी सदा आसक्त आहे. यास्तव अनन्यरूप देवीचेठाई कैसा लोलंगता होईना तेचि ऐक.

रंभेचे कुचकुंभहिं झगटल्यां कांहीं न जे मोहती
तेहिं नित्यविरक्त मुक्ति ललनासक्तीमध्यें पोहती.

तैसाचि त्रिपुरघ्नमग्नविषईं होईल देवीचिया
जे त्याचीच निजात्मरूपरमणी आनन्दवल्ली प्रिया.

वचन - याकार्यीं मन्मथासहिं प्रेरावें तो क्षणामध्यें परमेश्वराचेंचित्त देवीचेठाई आसक्त-करवील.

सू. - एणेंरीती ब्रह्मदेव बोलत असतां वसंतदत्तहस्त मन्मथ येतो पहा.

प्रावेशिक दरु राग : सौराष्ट्र

मन्मथ - रतिपति येतो पहा, अति सुन्दर ॥ प ॥

सू. एणेंरीती मन्मथ आल्यानंतर त्याला विलोकून देवेन्द्र बोलतो पहा.

वचन - "अहो मन्मथा परमेश्वराचें अंतःकरण स्वबाणप्रहारें जर्झरकरून विषय-सुखाकडें फिरवावें" म्हणून देवेन्द्राने सांगतां "ते कार्य अशक्य" म्हणून मन्मथ उत्तर देतो पहा.

घालारे कोलदंडास शिवमुनिसुता ताणुनी बाहुदंडा
आलों मी कालदंडासहित यम असें बोलणारा उदंडा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जेणें तत्कालदंडा करूनि हित तनुशी घेतलें प्राणदंडा
तो माझा बालदिंडाहुनि मृदुविशिखें जिंकवे केविं दिंडा

सू. [1]एणेंरीती मन्मथाने उत्तरदेतां देवेन्द्र मन्मथाचें प्रोत्साहनकरून बोलतो पहा.

दरु

राग : मध्यमावती

धीर नटकीं कदापिहि वीरमंडना
शूर कोण जगती तुज - स-
मोर टिकूनि करील भंडना ॥ प ॥

वृंदारकमणि, जो कां शमदमगुण ठेवा
नंदतनय धरीत हृषीकेशह्मणूनि नावां
विंदूनि तो कुसुमशरी नीट हृदयकमळी तुवां
वृंदेशी रतकेला कंदर्प नित्य नवा

भिक्षाटनावसरीं जो ऋषिवर्य रामा
लक्षूनि वश्यजाहला तुजलागीं धामा
सुह्माचिकिं पशुपती दुसरा निरूपीं
ब्रह्मादिकां अजय तूं विजयस्वरूपीं

सू. एणेंरीती इन्द्राने मन्मथाचीपाठी थापटून खुशाल करितांच मन्मथ बोलतो पहा.

झाली जऱ्हीं सुगरिणी रमणीकराचें
मांडे करीलतऱ्हीं कायकथीं स्वाचे

1. एणेंरीती मन्मथाने उत्तर देतां अन्योन्य देव बोलते झालेकीं याचा सेवटे आला हे यास्तवहिं गाऊन दिंडा ह्मणून बोलिला वरें भवितव्यप्रमाणे याप्रकारें देव संवादतां देवेन्द्र मन्मथाचें प्रोत्साहनकरून बोलतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तंतूंविना चतुरतो बहुसाल कोष्टी

निर्मी पटा घडेल हे कसी सत्य गोष्टी

वचन - तरी परमेश्वराचें चित्र व्यामोहनकरि जसें स्त्रीरत्न असिल्यानें तिलापुढें करून कार्य साधितों. वसंत मलयमारुतहिं बरोबर असावें.

सू. एणेंरीती मन्मथाचें वाक्य ऐकून देवेन्द्र बोलतो पहा.

वचन - त्रिभुवन सुंदरी जे त्रिपुरसुंदरीं ते हिमाचलास प्रार्थून तपोनिष्ठ जो परमेश्वर त्याचा सेवेसी योजितों तत्समईं तुवां स्वसामर्थ्यंवेचून ईश्वरास स्ववश करावें.

सू. एणेंरीती देवेन्द्राचें वाक्य ऐकून मन्मथानें अंगीकारकरितां समस्तदेवहिं स्व स्व स्थानाप्रती आल्यानंतर हिमाद्रिशिखरीं तपकरायाकारणें परमेश्वर येताहेत पहा.

प्रावेशिक दरु राग : सुरटी

परमेश्वर - त्रिभुवननायक येतसे पहा

त्रिनयन शंकर हा ॥ प ॥

प्रभु जो स्वानंद साम्राज्याचा

विभूतिविभूषित ईश्वर महा ॥ अ प ॥

मस्तजाटाजूटा मध्यें मिरवे

निस्तुल जान्हवी निर्मल बरवी

हस्तकीं साजति शूलपिनाक प्र-

शस्त कपालादिक तें आघवी ॥ १

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ओं महनीयगुणाचा सागर सोमचूड
प्रमथाधिपति भला
व्योमकेशहर निर्जर सार्वभौम भुजं-
गमभूषणीं शोभला -२

मू. एणेंरीती परमेश्वरानें येऊन तप आरंभिल्यानंतर एकेदिवसीं एकाएकींच कोटि विद्युल्लता लवल्याप्रमाणें वनप्रांतीं अत्यंतकांति फांकतांच कोंणकी हे स्वप्रकाशवल्ली येतेकीं म्हणून परमेश्वरानें आलोचना कारितां देवी येते पहा.

प्रावेशिक दरु राग : भैरवी

देवी - देवदेवी आली - देवी आली
महा दैवयोगें जवळी ॥ प ॥

मू. एणेंरीती येणार देवीस पाहून परमेश्वर बोलतो पहा.

दरु राग : आहिरी

परमेश्वर - येते कोंणकीं हे येथें रमणी ॥ प ॥
येणांकनिभानना, जे नारीशिरोमणी ॥ अ प ॥

जणु सकल रुचिरता
जाण जेथें
घन वटुनि थांबली
तनुकांति कर्शाजिव्ह
अनुपम लांबली
वनप्रांति सजले त्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

घनपंक्ति सम भली
जणु सकल रुचिरता -१

इंदिरा ह्मणून मी जरी
सुंदरी हे
इंदीवरश्यामळा
इंद्राणीसहि कैंची
सुंदर हे कळा
संदेह नसे स्वा-
नंदचि तो कळा -२

सू. - एणेंरीती परमेश्वराने वर्णनकरीतअसतां त्रिपुरसुंदरी येऊन, आपआपणांत बोलती- झालीकीं इन्द्रादिकदेवानी माझ्या जनकाची प्रार्थना केलीकां, हिमाचला तुझी कुमारी जो पार्वती तिला तपोनिष्ट जो महादेव त्याचा सेवाकार्यी योजावे याप्रमाणें देवाचोगोष्टी ऐकून माझ्या जनकानें ईश्वराचि शिश्रूषा करायास मज पाठविलें तरी तातवाक्यानुरूप वर्तणूककरीन ह्मणून निर्धारुन आपुलां मनोभाव देवी अनुवादते.

सेवा करावी परमेश्वराची
होता असा भाव मला वराची
तो अर्थ अप्रार्थित लाभला हो
घेईन मी सेवन भक्तिला हो

सू. - एणेंरीती बोलून परमेश्वर सन्निधां येऊन तन्मय भावनेने सेवेंत तत्पर होतां देवीच्या रंगांत काहीं गंगाधर मिळालाहे. अवलोकून वसंतमलयमारुता समेत मन्मथ येऊन पूजननिमित्तें पुष्पबाण प्रयोगकरितां निर्विकार देवाचें चित्तीं कामविकार उपजतां, हे कोणाचें कृत्य ह्मणून चहूंकडे विलोकितां

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कंदर्पास पाहून 'याचेचि कार्य असेल ह्मणून' तृतीयनेत्रानें त्याचा दर्प वारितां, इतक्यांत देवी देहावरि येतां तो एक सुंदरनारी आपणाकडें येणार ऐसी पाहून कोणकीं हे दिव्यस्त्री येते ह्मणून अलोचनाकरितां, रतीदेवी येते पहा.

प्रावेशिक दरु

राह : आहिरी.

रतीदेवी - येते पहा - रती देवी ॥ प ॥

सकल सद्गुणश्रेणी
सरस अलिकुलवेणी
प्रकटें लावण्यखाणी
परमकल्याणी -१

मधुर कोकिलवाणी
मदगजगामिनी
मृदुळपल्लवपाणी
मदनाची राणी[1] -२

सू. - एणेंरीती रतीदेवी येऊन देवीची प्रार्थनाकरिते पहा.

राग : पुन्नागमराळी – शापुताळ

दरु

रतीदेवी - देवी विनवीतसे मी
विनय करूनि ॥ प ॥

हे विश्वनाथदइते
केवळानन्दभरिते

---

1. वरयुवती जीचानखी - विवरीत तु कधीनकीं
परिपूर्ण चन्द्रमुखी - पद्मिनीची सून सखी.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

येवेळे रक्षि मज

ठेऊनि अभयदा मी ॥ अ प ॥

करऊं तुजसी नित्यनिरतें

मन्मथें पुष्पें हरतों

पूजितां कोपेंभरुनि - सुरुचि

नेत्रानळें संहारुनि - ठेला त्यावनी -१

पती जीवऊनि आतां वितरीं

चूडे दानहिं जगती

दुसरी मजला न गती - अतिशयें

जननी काकुलती येऊनि निगुतीं -२

मु. - एणेंरीती रतीचेंवाक्य ऐकून पार्वती दयेनें अर्द्रहृदय होऊन कामोज्जीवन करावेंह्मणून देवी परमेश्वराची प्रार्थना करिते पहा.

८६ राग : तोडी

सदया वांचवी जे आतां

मदनासी नाथा ॥ प ॥

पदर पसरूनि, पहा मी प्रार्थितें

पदपंकजहिं वंदूनि माथा -१

समरस आह्मा व्हावयासाटीं

सुमनी पूजिलें येणें तुजे न तथाटीं -२

शमितकेल्या तां तो विमलनेत्राग्नीनें

सम जे लागलाकीं शब्द मज सेवटीं -३

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दृष्टीस आड ह्मणुनि खुडुनी स्वहातेंकिं
टाकितां जगति बिल्वदळें पहातें

दैवेंकरूनि पडतां निजलिंग माथां
नेला पद शबर त्यास्तव लोकनाथा

प्रत्यक्ष मूर्ति तुझी लक्षुनियां स्मरानें
जी पूजितां सुमनी आपुलियां करानें

ते दुर्दशा पुरहरानें तयां घडावी
काहीं दयार्द दिली त्यास्तव हे पडावी

सू. एणेंरीती देवी प्रार्थितां परमेश्वर बोलतो पहा.

वचन - द्वापरीं रुक्मिणीचे पोटीं जन्मून मन्मथ सांग होईल सांप्रतहिं यथापूर्वक रूपवंत रतीचेदृष्टीस गोचरघडून उपभोगादिसकल सोहळेहिं देईल.

सू. एणेंरीती परमेश्वर बोलून रतीस मन्मथाची भेटे करवावी ह्मणून परमेश्वरानें चिंतितां यथापूर्वक मन्मथ येतो पहा.

प्रावेशिक दरु

मन्मथ - रती पति येतो पहा, अतिसुंदर ॥ प ॥

सू. एणेंरीती मन्मथ येतां त्याला विलोकून परमेश्वर बोलतो पहा.

दावि तूं जें पौरुष दुर्जनातें
सळूनको यावरि सज्जनातें

होऊनियां सांग मम प्रसादें
संतुष्ट कांतेसह नित्य दे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. यापरी मन्मथास वरप्रदानकरून परमेश्वर गुप्तहोतांच पार्वतीहिं रतीचें समाधान करून जनकमंदिरीं आल्यानंतर कुंभोदर नामक शिवगणासमेत हिमाचल येतो पहा.

'आला हिमाचला', हा —

सू. - एणेंरीती हिमाद्रि येऊन आकाशाकडें रोख देऊन शिवगणास पाहून बोलतो पहा.

हिमालय वचन - अगाये कुंभोदरा कोणकींहिं तेजः पुंजव्यक्ति व्योममंडलीं हूनि उतरते नारायणस्मरणमिश्रित वीणारव कानीपडतो यावरून बहुतेक नारद होईल सारखा दिसतो.

सू. - एणेंरीतीं हिमाचल बोलत असतां नारद येतो पहा.

सरस करसरोज वाजवी ब्रह्मवीणा
हरिगुणकथनी तेजीं भजाचीं प्रवीणां

धरिशिरिं हर तैसा जो जटाचा कलापा
सुरमुनि अजि यतो तो निधी जो कलापा

प्रावेशिक दरु राग : घंटारवं

नारद - येतां नारद हा येथेंचि पहा
हेतु जो कां कलहा ॥ प ॥

प्रीतीने हरीचें गुणगात स्वयें
मातुनि [1]हरीखे मानसी महा ॥ अ प ॥

वीणारसबरवा वामहस्तिं तो
वीणा शोभे बरवा

---

1. हारिखे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

श्रीनारायणध्यानारूढ जों

नानाविध घेत गानरस नवा

सू. एणेंरीती नारद येऊन स्वस्थलिं बोलताझालाकीं या तारकानें देव अवघे निर्वीर्य करून पदभ्रष्टकेल्यास्तव फारदिवसझाले युद्धाचा तमाषा दृष्टीसपडत नाहीतरि हरिहरासांच अन्योन्य भांडणे लावावें त्यास मूळ हेंच. जे हिमाचलाचें कन्यारत्न श्रीहरीसाटी मागावें त्यानें अंगीकारकेल्यां परमेश्वर कोपूनि विष्णूसि द्वंद्व घेईल नाहीतरि ईश्वरास अर्पिल्यां श्रीहरीस रागयेऊन (शिवासी) युद्धार्थ सिद्धहोईल ऐसीं तजविजकरीत हिमाचलापुढें उभाटाकला. जो नारद त्यालाविलोकून हिमाद्रि बोलतो पहा.

दरु राग : तोडी

हिमाचल - पाउलें देखतां आपुले - झालों
पावन दोषहिं लोपले ॥ प ॥

उगवला सोन्याचा दिवस - आजि
न गणवेचि सुख बहुवसे ॥ अ प ॥

पूर्वजवंशपरंपरा - शुद्ध
सर्वहिं झाला दयापरा
कासयासि येथे अहो व्रिज - केलें
ते सांगिजे कलहबीज -१

सू. एणेंरीती हिमाद्रीनें पुसतां नारद प्रत्युत्तर देतो पहा.

नारद - हिमाचला 'रत्नं समागच्छतु कांचनेन' ह्मणून चतुर बोलिले आहेतकिं तरि तुझे कन्यारत्न सुवर्ण जो श्रीहरी त्यासी मिळावें त्यास्तव मी आलों.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. ऐसें नारदवाक्य ऐकून हिमाचल बोलतो पहा.

हिमाचल - स्वामी आपण बोललेते यथार्थच परंतु म्या परमेश्वरास कन्यारत्न समर्पावें ऐसें निर्धारिलें आहे. कुमारीस तैसाच दृढनिश्चय आहे. यास्तव आपण दयाकरावी.

सू. ऐसें हिमाचलाचेंवाक्य ऐकून परमेश्वराचें हेळनकरीत नारद बोलतो पहा.

सदांच भिकारी कुदेशाधिकारी
विराजे विकारी तनू जे विकारी
विनाशप्रकारी जगद्विप्रकारी
रतध्वांतकारी न तूं अंगिकारी.

सू. एणेंरीती नारदानें परमेश्वराची निंदाकरितां कुंभोदर रागनें डोळेताऊन त्याला उत्तर देतो पहा.

ईशेशानमहेश जासि ह्मणती वेदांतशास्त्रांतरीं
जो भूनेश उमापती पशुपती सर्वज्ञ संज्ञाधरी
कामारी आणि कालकाल त्रिपुरद्वेषांधकारी महा
अध्यात्मा शिव भूतिभूषण नव्हे कैसा परंज्योति हा

सू. एणेंरीती कुंभोदराचेंवाक्य ऐकून विष्णूची प्रशंसापूर्वक नारद बोलतो पहा.

जो विश्वंभर विश्वरूपहिं हृषीकेशः स्वभू श्रीहरी
श्रीनारायण वासुदेव ह्मणुनि अन्वर्थनामें धरी
साक्षी जो पुरुषोत्तमाख्य परता चिच्चैत्यवर्गाहुनी
तोची ब्रह्मजगीं नसेचि दुसरा उत्कृष्टकिं त्याहुनी.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पाठांतर वचन - ('ईश्वर ईशहिं कांहि खरीनव्हेत तेहीं ऐक')

अलक्ष्मी कांताशी जगिच कैसी ऐश्वर्यपदवी
    ह्मणेधर्नी योगार्थी भवविषईं ईशपदवी
भ्रु्वयौ पृथ्वी हें श्रुतिवचन गौणार्थचि जसें
    महेशादी नामावळि तसी अमुख्यार्थचि असें.

दरु
राग : येरुकळकांबोदी – आदिताळ

नारद - काय वानिसी या कालकंठासी ॥ प ॥

काय वानिसी भूतनायक पशुपती-
    ला एक भावेसी अहर्निशी ॥ अ प ॥

माथां जटाजूटामाझी धरी लक्ष्मी
    नाथांघ्रि तीर्थ जो नामे गंगाधर
हे थोरेथोरां व तेथें कैसी - नमृषा
    गाथा ते कळूनिहिंगा फारसादर -१

कनकरत्नाचिया घनवस्ता नाहीत
    ह्मणूनि न काहीं मी ह्मणतसे ईशासी
फणिमयभूषणगणचि घालूनि देहीं
    अनुचित न वाटेचि ज्या अणुहिं ऐसासी -२

पालक ह्मणवी दिक्पालकांचा शंख
    पाल घेऊनि कपाल जो घरोघरीं
कालक्षेपासी गयाळ माचे भीक
    कालकाल जो सर्वकाल अघोरी -३

राजधानी ज्याची राजसखी जीये
    माझि गेल्या न फिरे हा जन एकहिं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वाजट हे असे आजि उद्याहीनी
लाजिरा ऐसा त्या साजिरा तूंहिं -४

वल्लभलक्ष्मीचा उल्हास लावण्य
वल्ली कंदप्रती मल्लरूपें सरा
उल्लंघूनि त्यासि भिल्लरूपी यावेड
दुली विषमाक्षासि उझितां बरा -५

सू. नारदाचेवाक्य ऐकून कुंभांदर बोलतो पहा.

राग : कापी

दरु

कुंभोदर - वामदेव भीकारी हा
ह्मणऊनि बोल ॥ प ॥

वामबुद्धीं तूं कुमती
सामर्थ्यं ठेविसी
वामनें तुझ्या पूर्ण

कामे बलीस भिक्षा
ते मागीतली असतां
कां मनी विसरसी -१

पुनः दरु

विश्वनाथा शंकरासी निंदूनकोंरे ॥ प ॥

विश्वासें प्रत्युत्तरासी - ऐक
निश्शेष दोषोद्धरासी सद्गुणराशी ॥ अ प ॥

भीकमागणें दीनलोकापरी दोघां
ठीक तो दोष लागे प्रकटचि महा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

देखन केली चन्द्रशेखरें चोरीपरी
स्वकीय पांटासाटी एकदोष हा -१

आणीक चोज एक आणि मानसी
पाणीपसरून शूलपाणीने त्यासी
ताणूनि मुमक्षा अधरस्थानी जाण तयासी
येणेंव लांटिलें ते उणीन यासी -२

रुद्रभूमीसी राहे रुद्र ह्मणूनियां
क्षुद्रा तां स्थापियेला दुर्धरदोष
चिद्रत्न तुझा हरी स्थिरला वृंदावनीहि
छिद्रें नेणूनियां चित्तां अशेष -३

छंद

परम चांगला श्रीहरी असें
सुरऋषी तुला लागलें पिसें
धरूनि मोहिनी वेष तांहि कां
निरत जाहला शंभूसीनि कां

हरि पद्मोद्भवा जान्हवी शिरां
धरिलीयासटीं नूतता हरीं
तरि शिवाचिया लिंगपूजना
परिस युक्त ते ऊस तूं जना

कुं व - तूं ह्मणसीलकां शिवलिंगपूजा बिष्णूने केली ते लटकीतरि याचें
प्रयुत्तर ऐक.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बिल्वोदकेश आणि शाश्वत रामलिंगा
श्रीमाधवें रघुवरें ध्रुतविष्णुलिंगा
कीं पूजिले ह्मणउनी बहुता पुराणी
तें बोलिला मुनि पराशरपुत्र वाणी

सू. - एणेंरीती उभयता भांडतां हरिहर दोघेहिं एक. तुह्मी कां व्यर्थ कंठशोष करितां ह्मणून हिमाचल बोलतो पहा.

दरु — राग : घंटरवं

हिमालय - एकच हे हरिहर लोकनायक ॥ प ॥
जें करिती भेदयासी
ते केवळ पापात्मक ॥ अ प ॥

गगन एकच जैसें द्विघटामाझि कोंदले
जगती भिन्नसें गमे प्रगटोपाधीनें -१

अगुण एकहिं तैसा चिद्घन गुणभेदानें
निगदि जे विष्णुशिव निगमी हे ह्मणऊन -२

घनाकार आनंद मोठा निशाचा
स्वयें घेतला वेष जो चिद्रसाचा
तया एकरूपें धरी नित्यकाळीं
ह्मणूनि गमें जाहली सत्यकाळीं

सू. - एणेंरीती हिमाचलाचेवाक्य ऐकून हे यथार्थ अमचे मनीहिं निर्धार असाच आहे. परंतु विनोदार्थ क्षणभरि वाक्यप्रसंग केला ह्मणून नारद कुंभोदर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

योलून आयुल्या ठिकाणास आल्यानंतर हिमाचलहिं समयास आल्यानंतर देवी येने पहा.

प्रावेशिक दरु

राग : आहिरीं

देवी - सुंदरी त्रिपुरसुंदरी येने पहा ॥ प ॥

मंदमंद मदसिंधूरगामिनी

नंदनंदिनी नित्यानंददायिनी जे ने -१

सू. - एणेंरीती देवी येऊन चित्तवृत्तीमंजरीप्रती विलोकून बोलतां पहा.

देवी - अवो प्रियसखे नारदानें येऊन शिवनिंदापूर्वक विष्णूचाउत्कर्ष सांगतां माय बापाचें चित्त डामाडोल होऊन गोविंदाकडेंच डोला दिल्हामारिखे दिसतो ह्मणून अंतःपुर दूतिकेनें मला वर्तमान सांगीतलें.

सू. - एणेंरीती देवी बोलून "इतःपर मला प्राणधारण करणें नाही" ह्मणतांच चित्तवृत्तिमंजरी बोलते पहा.

मंजरी - देवी आत्महत्या कारणे उक्तनव्हे तपोवनिं जाऊन परमेश्वराचि पूजा केल्याने तो प्रसन्न होऊन इष्टार्थसिद्धी करील

सू. - एणेंरीती चित्तवृत्तीमंजरीचेवाक्य ऐकून देवीने वनांत येऊन उपवास नियमपूर्वक संध्याकाळी परमेश्वरास पूजून रात्रीं चारीप्रहरहि जाऊन व्रतांगपारणें अनुसरून सखीसी बसली असतां. व्रतानुष्ठान माहात्म्येंकडून परमेश्वर संतोषाने देवीस दर्शन द्यावें तीचेंमनहिं शोधावें या अभिप्रायानें वृद्धब्राह्मणाचा वेषधरून येतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

राग : – सावेरी

प्रावेशिक दरु

परमेश्वर - आला श्रीकंठ तो हा आतां पहा ॥ प ॥

धरूनि जरटद्विज सोंगासी
चर्चूनि चंदन अंगासी
करीं कवळूनियां दंडासी
परमश्रांतीने गुणराशी -१

सू. - एणेंरीती अपर्णाकडें येणार वृद्धब्राह्मणास विलोकून देवी, सखीप्रती बोलते पहा.

अपर्णा दरु

राग : सौराष्ट्र

कवण येतोकीं अवलोकीं ॥ प ॥

नव सरसीरुहनिभ शुभनयनी
नवलाचा येथें ये कायकीं ॥ अ प ॥

कवलि लिहेजेणें उजव्याकरि ते
केवळ दृढतर काटी
लवलीसे अत्यंतचि ज्याची
शिवशिवा वार्धक्यें पाठीं -१

उरल्या असती देहिं शिराची
उघड वेंचूनि घेऊं येतसा
झुरळया पडल्या वदनावरि बहु
तरुणी कठीण बोलवेना दशा -२

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एणेंरीती देवीनें संवादकरीत असतां वृद्धब्राह्मण येऊन बोलतो पहा.

ब्राह्मण दरु

राग : मोहनं

कासया वनवास करिसी तूं
यासमई बाले ॥ प ॥

वासवमणिसम भासुरतनु उप-
वासानें शोषीं वृथा वेल्हाळे ॥ अ प ॥

राजस उपरींत राहुनियां नाना
राजभोग त्वां रात्रींदिसहिंयाजनिं भोगावे

यामिनीशमुखी काज हें
सोडूनि साजणि प्रत्यहिं -१

कवण तात तुझा कवण ते माऊली
कुवलयलोचने अवघें निरूपी
अवनीतळिं स्वर्गभुवनिं एकहिं
तवसम नसेचि युवती स्वरूपी -२

सू. एणेंरीती वृद्धब्राह्मणानें विचारितां देवीनें अर्घ्यपाद्यादिकिं पूजाकरून वर्तमान सांग ह्मणून सखीस खुणावितां ते बोलते पहा.

हिमाचलसुता द्विजा अनुपमान हे सुंदरी
कुमारिण उमा असी परमदिव्य संज्ञाधरी
हिमांशुकृतशेखरा पुरहरा वरूं निश्चयें
श्रमाप्रतिहिं सोसुनि तपनसे तपासि स्वयें.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एणेंरीती [1]देवीचे मैत्रिणीचे वाक्य ऐकून वृद्धब्राह्मण पार्वतीसी बोलतो पहा.

आश न करि विषाचेंशस्त्र झाला दिशांचें
वाहनतरि वृषाचें भृत्यभूतें पिशाचें
कनकमणि कुशाचें लागलें कां असाचें
तुजमनिं गिरिशाचें ध्यान मोटच्या पिशाचें.

दरु

तो भूतनाथ शंभु मानला तुज केविं
जो दिगंबर जो त्या जोगी नव्हेसि तूं
भोगी माझिया चित्त ठेविं ॥ प ॥ -१

वस्त्रभाव रत्नेयांचा अस्तमान जया पासी
विस्तू नेत्रीं धरी विषसेवी -२

पांढरापरीस बसवील त्या ढोरावरी तुज
धांडोरा हा पिटितो कळूनि ठेवी -३

रमणि भूतपिशाचें समुर्दि लागला तुज
धुमते बससील भूत तेविं -४

मंगळसूत्र सर्पाचें चांगले बांधील कंठी
वागांबर नेसवील देवी -५

सू. एणेंरीती वृद्धब्राह्मणाने बोलून आपुलेंसी पाणिग्रहणकरीं ह्मगतां सखीस पाहून देवी बोलते पहा.

---

1. सखीच

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु

राग : हुसेनी

न सुटेचि हे विषय आशा पहा ॥ प ॥

चोंचरें खिडी पडिली पिकली
याचि समस्त डोयी
लोचनयुगळ निकट पदार्थ जो
गोचर नव्हे तांहिं -१

खोंकितां वरिवरी कोंडती श्वास
थुंकी महीचे पाटीं
टेंकधरुनि पण तिष्ठला हे कसा
टेंकूनि दृढतर काठी -२

टवकीं व्रणाचि काढिली यास्तव
खंवदें पडिलीं देहिं
अवघीवेळ हिमाशावरी
अवलोकि स्थिति तेहिं -३

रोखुनिया दृष्ठी प्रतीनें
अवलोकनकरीता हे तें
चोखटें वाढुनि, केवल हासें
देख पुन्हा मज येतें -४

सू. एणेंरीती पार्वती बोलतां सखीस पाहून, आपला च उपहास करितक्षणून वृद्धब्राह्मण उत्तर देतो पहा.

शौर्यादिनामक महीपतीची सुकन्या ते
भार्गवें परिणतां सखी ये सुकन्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

योगें तिच्याच जाहल्या मुनि दिव्यदेहीं
देवें तुझ्या घडना तेवि युवाच मीहीं.

पंडेन मी सत्य तुझ्या कपालीं
नोहेची तो भिन्नमसी कपाली
देये सखे सादर अंक पाली
कामार्थ हा केवळ रंकपाली

कामाघ्न कामद नव्हेचि कपर्दि काहीं
हातीं नसे फुटकि ज्यास कपर्दि काहीं
जेणें स्वयें निवटिला जगिं धर्म जाजा
त्याचेनि लाभसि कसि त्रिपुमर्थ काजा

वचन - तुझ्या मनामध्यें जरि शिवासच वरावें ह्मणुनि आहेतरि सर्वात्मक शिव मन्मथ नव्हे काय

दरु राग : केदारगौळ

जगदधीश्वर एकजो तो
नगरनाथ कसा नव्हे ।। प ।।

जगतिमंडलधर कसा तो
नग विटपि धर्त्ता नव्हे ।। अ प ।।

निगम त्रित्रयीं वेद्म तो विभु
ऋग्यधिगम्य कसा नव्हे
निगदि कैसा अखिलमय शिव
प्रकटमन्मथ तो नव्हें
अशिव कां मज भाविसी तूं -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. - एणेंरीती वृद्धब्राह्मणाचेंवाक्य ऐकून देवी उत्तर देतो पहा.

दरु

राग : मोहनं

शिवशिवा असें अद्वैत तुजला
कवणें सांगीतली ॥ प ॥

व्यवहारदशेंतहिं अवघें येकच ह्मणसि
श्रवणि ऐकवेनाकिं तववाक्य चांगलें ॥ अ प ॥

हे वार्ता भेदाचि जेंव्हा झाली मृषा
वैवाहिककार्या ठाव कैंचा तैं
वांवुगी मी तुंहेचा उटि कळुनेगा
लाविमीं कां सूत्रहि मजमी -१

भाउनी मन्मय जीव किंवा निज
घे विप्रा रतिसुख यावरि प्रत्यहिं
तां वाट विपरीत ठेऊनि पुरती
भावाद्वैतें रत सावध निश्चयीं -२

तूं नेणसी फार सदाशिवाच्या
यालागि हे बोलसि फार वाचा
दुष्कर्म तें सर्वफलासि आलें
तुझें मला दर्शन आज़ि झालें

लाभावया वरमहेश्वर मी तपासी
विप्राकरिं नगणितां हिम आतपासी
माझी महाद्विपिनि व्रेत बरी तपासी
आलासि कोठुनि कधिं निजमातपासी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु राग : अनन्दभैरवी

कवणाचें मुख पाहिलें
आजि म्या नेणें
शिवशिवा नवचें साहिलें
दुःख हे मोठें ॥ प ॥

भव निंदावचनाचें
श्रवणाश्रवण जाहलें ॥ अ प ॥

कंटाळुनि घरदारा
कंबुकंठी स्वपरिवारा
कंठूं चारिं दिनवनीं आलें
कंजाक्षि बालें -१

कंटकरूप येथेंहिं
कोंटुनिकिं पाहिं
कुंठावयासि नील-
कंठ भक्तिपंथ उ-
त्कंठित भेटला महा
शुंठाग्रणी हा या ठायां -२

सू. - एणेंरीती सरवीसी बोलून वृद्धब्राह्मणानें ईश्वरास अधम अकिंचन ह्मणून जे निंदिलें होतें त्यास क्रमेंकरून उत्तरदेतो पहा.

ज्याला पूजुनि देवदेव हरितो चक्रायुधा पावला
गेला भूमि वराहहोऊनि पदा ज्याचा नझें पावला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पाहूं मस्तक हंसरूप गगनिं ब्रह्मा उडालापरी
त्यालाहिं शिरना कळे कवण त्या श्रीशंकरासी सरी.

तो शुद्धसत्व ह्मणुनी धवळांग झाला
तो सुंदरस्वर समूषण त्या कशाला
नाही जयासम दुजें जगिं साजतांकीं
आत्मस्वरूप सुखभोगुनि नाचतोकीं.

कनकरजतरत्नें कायरे त्यासि वाणी
द्विजकुलतिलका हें सांग मातें स्ववाणी
परंतु जगिं आजा शापाचगें भाग्य नेवो
त्वरित मज पुढारां सांगतेंचि ठेवी.

छंद

धरुनिया शिलासिंधु लंघने
वरुनि षंडकिं भोग्य योगणें
परंतुनि अनिशासि त्यापरी
परमसंपदा पाविजे वरी ॥

सू. - यापरी परमेश्वराची प्रशंसाकरून "ब्राह्मणा तूं दैत्य आहेस यास्तव निंदा करितोस ब्राह्मणवेष धरिल्यांस्तव निग्रहासहीं भोग्य नव्हेस. आह्मी येथून निघणें उत्तम दिसतें".

सू. - एणेंरीती देवीनें संवादतां ब्राह्मण उत्तर देतो पहा.

झाला समस्त सफळा तप पुण्यकोटी
माझी ह्मणूनि घडली तुज सत्यभेटी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मी नित्यनिर्मल शिवात्मक पूर्णमानी
तूतें कळेल मग हें अवघी निधानी.

सू. एणेंरीती ब्राह्मणाचेवचन ऐकून देवीनें माघे जायास उद्युक्तहोतांच दृष्टीपुढें तो ब्राह्मण गुप्तझाला तें पाहून देवी सखीसी बोलते पहा.

महाद्भुत तें कोण येऊन गेलें
अहो चित्तचा काढुनी फारठेलें
पिनाकि परीक्षुं आतां यामनातें
जणुं विप्रहांऊनि आला वनातें.

सू. एणेंरीती देवीनें बोलतां.

दक्षाचि ब्रलि घेतली मखक्रिया दक्षा तयाचि आणीं
अक्षामिकडुनी क्षणें अतनुचि रक्षाच केली वनीं
रक्षाया निजभक्तवृंद धरिली दीक्षा जयानें निकीं
साक्षात्तोचि मी दृश्य तुज जाहलों दाक्षायणीनाथकीं.

सू. - याप्रमाणें परोक्षच असून परमेश्वरानें उत्तर देतां, पार्वती पश्चात्ताप पाहून सखीसीं बोलते पहा.

दरु राग : येरुकलकांबोदी

मोह कैसा मतें आला
मोटाकि सयें ॥ प ॥

जो हर त्रैलोक्यनाथ
तो हा धि:कारिला सयें ॥ अ प ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वासर निशी येकाग्र
ज्यासाटि तपलें तप
म्या साजणि आव्हेरिला
तो साक्षात् चिद्गलदीप -१

सू. - एणेंरीती देवी बोलून सखीसि विनविते पद्य.

दरु

साहूं कैसी विरह नाथावीण
राहुनियां अहहा ॥ प ॥

जाऊनियां वेगी जाणवी प्राणेशा
पाउलें वंदूनि परमसुखावहा ॥ अ प ॥

सरसचंपक मालती, सुरुची पुष्प
भरित वातें हलतीं
वरि कीरकोकिल वल्गुहिं बोलती
निरखुनि हें गात्रें निरवधि [1]पोलती -१

निवउनि पुरमर्दना नेणूनि केलें
मनसिज अभिवर्धना
अनुपदीचें तेणें अनुपम कृतघ्नानें
आणुनि स्वशरिं केलें वर्नि याचित्तमर्दना -२

रतलें अरी चरणीं कोपूनी तेणें
सुतनु अंत:कणी

1. फुलती

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पतितधमाग्रणी पती तो दक्षिणेचा
अतिशयें स्वदिग्वातें सति करी जाचणीं -३

सुगीत हे शरशयन आपण गमे
सुपति ईश्वरा हीन खु-
पति चंदनकणरूपति सुमनगण
पति चन्द्रकिरण तपनकराहुन -४

सू. - एणेंरीती पार्वती विरहतापें कष्टीहोत असतां करुणानिधि शंकर वरप्रदान करायाकारणें निजरूपानें येताहेत पहा.

दरु

" त्रिभुवनदायक " ह्मणावे

सू. - ईश्वर प्रत्यक्षहोतां त्यास साष्टांगप्रणामकरून देवीयानें उभी ठाकलीं असतां तिला पाहून परमेश्वर बोलताहेत पहा.

ईश्वरश्लोकार्ध - तुझा मनिं वर अपेक्षित काय सांगे
झालों प्रसन्न तुजलागुनि शीघ्र मागें

पार्वतीश्लोकार्ध - तुंच स्वयंवर अपेक्षित जाण मातें
संप्रार्थितें आजि असें सुरसत्तमातें

सू. - एणेंरीती देवीचेंवाक्य ऐकून परमेश्वर बोलतो पहा.

मी कल्पद्रुम तुं लताजलद मी तुं दिव्यसौदामिनी
मी श्रीभास्कर तुं प्रभाजल(द)मी तुं वीचिकाभामिनी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मी तों निर्गुणपुरुषप्रकृति तुह्मी चंद्र तुं चंद्रिका
मी तात त्रिजगास तुंच जननी मी शंभु तुं अंबिका

सू. - याप्रमाणें अनन्यभाव असल्यानेंहि अन्योन्य सम्मतीनें पाणिग्रहण केल्यानें लौकिक बरा दिसणारनाही यास्तव सप्तऋषीस हिमाचलापासीं पाठऊन त्यांच्यामुखें निश्चयकरूनि तुला परिणितों, आतां संतोषरूप तातमंदिरास चलावें ह्मणून ईश्वर ह्मणतांच, याप्रमाणें ईश्वरवाक्य ऐकून 'आज्ञा प्रमाण ह्मणून' देवीनें चित्तवृत्ति-मंजरीस ईश्वरासमीप ठेऊन निघाल्यानंतर गौरीचा वियोग न सहता परमेश्वर बोलतो पहा.

दरु — राग : हुशेनी

थोर जाहला दगा मज - कसा मज ॥ प ॥

नीरजाक्षि प्रार्थितांहिं
नेणूनियां त्याग केला ॥ अ प ॥

नसती घातली अड्डी
असुख असें भोगाया
निस्सुरतैंच निरसलियां
न सिणतों मी वायां -१

ऋषिजन कधीं करितीलकिं
कुशल संविधानाया
दिसयेक आजि मज
दिसत युगापरि तया -२

गंधर्व विवाहेंचि सुंदरी
प्रणिली असती

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कंदर्पबाधेंचि या
गंधर्व वार्ता नसती -३

अंधकारिचिहिं माझी
अंध जाहली मती
द्वंधन केल्यां न सुटे
बंध प्रेमाचा अती -४

सू. - एणेंरीती बोलून परमेश्वरानें विदूषकांचे स्मरणकरितांच तो येतां पहा.

प्रावेशिक दरु

कुंडली कुंडलीकृत-
कुंडल जो विराजित
गुंडूनि गुंडी पगडी
गुंडोदर आला गडी -१

सू. - एणेंरीती गुंडोदर येऊन ईश्वरास पाहून बोलतां पहा.

काले पर्वत सर्वमेरुप्रभृति तां शर्व देश वृथा
किं नीरेंभरितां अखंडसरित या निर्मिल्याहि तथा
मांडे ते लवऱ्या पुऱ्या गुलवऱ्या यांचे गिरि गांरसें
सिंधुहि रचितासकिं द्विकरितैं मी भक्षितों वोरसें ॥

सू. एणेंरीती गुंडोदर बोलतां परमेश्वर बोलिला जें तुला सर्वदा पोटाचेंच ध्यान दुसरांचिंता नाहा - गुंडादर - व - स्वामी आपणास स्त्रियेंचें व्यसन मला पोटाचें व्यसन दोघासहीं दोनी व्यसन समान परंतू मी निज अवगुण झांकून परा व्यासस्वामीसारिखा लटका उपदेशकरितानाही तेचि एकावें.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आशेनें कनकाद्रिवाहसि भला भरा गळा तूं करीं
माथां घेऊनि कामिनीहि श्रमसा गौरीवियोगें तऱ्हीं
त्यागा स्त्रीधनसंग सांगसिपरी याप्रर्वे विश्वासरे
मोठा तूं परदुःख शीतल तुझ्या वाटे न विश्वासरे.

दरु

राग : आनन्दभैरवी

कळुनी अजिंक काम हा
यावरि तऱ्ही ॥ प ॥

सळूनकी आह्मासि महा
तुजमम ऊर्ध्वरेताही ॥ अ प ॥

हे जगन्नाथा अजितेंद्रियापरि पाही
आपण आतां मज्जल्यां कामप्रवाही
गजमुख ताता अमुचा अन्याय काथी -१

सू. एणेंरीती गुंडोदराचेंवाक्य ऐकून परमेश्वर हासून चित्तवृत्तिमंजरीस लक्षून बोलतो पहा.

दरु

राग : कल्याणी

केंधवा मी देखेन नयनी
तें धणीवरि रमणी ॥ प ॥

जे धराधरेंद्र प्रियानंदिनी
वेद तीचाची जडला निजमनीं ॥ अ प ॥

विसरपडत नाहीच क्षणभरी
न सूचत सहसा गोष्टी दुसरी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विषयविविध हे विषमचि गमती
विषवल्लीचेपरी -१
दिसे ते मूर्ति तीचीच हे रात्रीं
दिसही दशदिशामंडलांतरी
असिततनु नीलोत्पलसमव्हरी
भासमानभूषणगणि साजिरी -२

सू. एणेंरीती परमेश्वराचेंवाक्य ऐकून चित्तवृत्तिमंजरी बोलते पहा.

आहें जंव्हरि येकनिष्ठ सदया मी त्वत्पदा सन्निधीं
पाहेंना दुसरीकडें गिरिसुता तों हो हरीकीं विधी
राहें निश्चलचित्त चित्तजहरा चिंता गिळुनी बळें
पाहें तुजचिगा वरील नव्हरी गौरीगणी हे भलें.

सू. एणेंरीती चित्तवृत्तिमंजरीचेंवाक्य ऐकून परमेश्वर निजधामास आल्यनंतर सपरिवार कांतेसीसह हिमाचल येतो पहा.

दरु राग : केदारगौळ

आला हिमाचल रमणीसमेत तों
शैलाधिराज महा ॥ प ॥
कैलासादि भोंव्हताळें नगोत्तम
कैलास तिष्ठति त्रिनयाने महा ॥ अ प ॥

सू. एणेंरीती हिमाचल आल्यानंतर सभेमध्यें येकायेकीच सप्तसूर्य उगवल्याप्रमाणें कांतिफांकतांच हे कायह्मणून कौतुक विलोकितां सप्तऋषि येताहेत पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु

राग : सौराष्ट्र

मात जणहि सप्तऋषि
गणनाथ आले पहा ॥ प ॥

पातकी यासहि पावनकरणार
जातवेदासम ज्वलितरूपें महा ॥ अ प ॥

सू. एणेंरीती सप्तऋषी आल्यानंतर त्यांस यथोक्त पूजून विनयपूर्वक हिमाचल बोलतो पहा.

येणें अपूर्व आपुलें घडि पुण्य सांगा
कि लोटलीच आलस्यावरि काय सांगा
विज्ञापना सरस येकचि आयिकीं जे
आज्ञाकरूनि मजलागि कृतार्थ कीजे.

सू. असें हिमाचलाचेंवाक्य ऐकून वसिष्ठ बोलतो पहा.

जो आज्ञेवरि आपुल्या हरिहर ब्रह्मादिकां वर्तवी
संकल्पेंचि विचित्र जीवपुतल्या नानाविधा नर्तवी
वेदांतप्रतिपाद्य अद्वयचिदानंदांबुधि निश्चये
तो तुझ्या प्रियकन्यकेप्रति वरूं प्रार्थि महेश स्वयें.

सू. ऐसें वसिष्ठाचेंवाक्य ऐकून हिमाचल बोलतो पहा.

राग : कापी

दरु

धन्यधन्य मी येकधात्रीधरेंद्रा ॥ प ॥

धन्य मी सुकृति मूर्धन्य नसे सम
अन्य न वाक्य हे अन्यथा देख ॥ अ प ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

निगमगोचर जोकीं नित्यानंद
सुगुणमंदिरा अवलोकीं
सुगम जांवांयी तो जोडतां माझी
निगंदु भाग्यता किती तऱ्हीं यालोकीं -१

जामाता परमेश्वरप्रभु तुझ्या पुण्योत्करें जोडतो
जामाता कथितां यथार्थ आजि त्या कन्येसहीं जोडतो
सांगातीत्र परंतु तातजननी भावुसखे कोणते
सांगाती कुल शीलवित्तवयहि याचें तुह्मी जाणते.

सू. एणेंरीती पर्वतेंद्रे प्रश्नकरितां सर्वज्ञहि सप्तऋषी मौनमुद्रेनें राहतां हिमाचल आप आपणांत बोलतां पहा.

नाही जया जन्म जरादिकांहिं
कीं नेणिजे वेद सुरादिकांहिं
जे व्याप्त भूमितळिं अंतरिक्षि
ते ब्रह्म शंभु मनहें परिक्षि.

सू. एणेंरीती विचारून हे गोष्टी मला मानली, परंतु अरुंधतीस पाठऊन मेनेचिमात्र संमति करावें ऐसें हिमाचलानें बोलतां वसिष्ठानें अरुंधतीचें स्मरणकरितां ते येते पहा.

दरु

राग : कल्याणी

सकलपतिव्रता, प्रकारामध्यें जें
अकलंक केवल, साध्वी शिरोमणी ॥ प ॥
विकचनेत्री विश्वविदित अरुंधती
निकट येतसे ते, निरुपमगुणश्रेणी -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. येणेंरीती अरुंधती येऊन मेनेसमीप जाऊन बोलते पहा.

नेणों तुंवा कवण उत्कटधर्म केला
जोडे महेश समवल्लभ कन्यकेला
आतां नकित सखि अंतरीं तां धरावा
वाङ्निश्चयो स्वजन संमतिनें करावा.

सू. येणेंरीती अरुंधतीचेवाक्य ऐकून मेनादेवी बोलते पहा.

मे. वचन - देवि तुझीगोष्टी मी मोडितनाही परंतु ईश्वराचि मोटीं तामसप्रकृति, तदनुसार त्याची चर्याहि लोक विलक्षण आहे.

दरु राग : मुखारी

सांगतसें तुज बाई
गिरीशाचरणा ॥ प ॥

राग नको करूं कांहिं
लागतसें तवचरणा ॥ अ प ॥

श्वशुराचा यज्ञ येणें
शशिमुखि भंगियेला
तिसऱ्या लोंचनानलें
प्रशमित स्मर केला -१

त्र्या सुर अंतक जो
आसिला तो अवलीला
जोडलीसें सायासें हे
मूलिकरूनि तप फार -२

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जोडी नाही ई समान
दुसरो साचार
गोड ईर्णे करितां अमुचा
अवघा सत्य संसार -३

सू. एणेरीती मेनेंचेवाक्य ऐकून अरुंधती बोलते पहा.

राग : कांबोदी

दरु

इंदुशेखर करुणसागर सर्वथा
निंदूनको सखिये ॥ प ॥

सुंदरी यासम सत्य भक्तजन
बंधू नसे दुसरा ॥ अ प ॥

मन्मथें विंधूनि सुमशरिं चित्त
उन्माथिलें ध्यानावसरीं
चिन्मयें यास्तव नेत्रानलें
उन्मत्त शमविला तो क्षणांतरीं -२

शरण येतां मुनिनंदनें
परिसें मार्कंडेय भक्तमंडन
चिरंजीवी केला तो आपणें
हरुनि तरणिसुताचें मी पण -३

सू. अरुंधतीचेवाक्य ऐकून मेनादेवी नें अंगीकारकरितां ऋषींश्वरानी हिमाचला निकटिं येऊन ते वर्तमान सांगतां त्यानें वाङ्निश्चयकरितां कुंभोदर विवाहमंटप सिद्धझाला ह्मणूनि हिमाद्रिसमीप येऊन बोलतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु

राग : धन्यासी

विवाहदिव्यमंटप तो सिद्ध जाहला
तिहि लोकीं उपमा नाही झाला ॥ प ॥

शांत कुंभाचेस्तंभ उभेकेले
जांत पुतल्यचेंवृंद कोरियेले -१

मोतियांचेच झलकती झेले
ज्योतिपाहूनि जन थक ठेले -२

चंद्रसमाना चांदवे वरी
भोंवते भोंवले झल्लरभर जरी -३

रत्नखचितवेदिका साजे वरी
शोभतां ती तोरणें परोपरी -४

सू. एणेंरीती कुंभोदरांचेंवाक्य ऐकून हिमाचल संतोषानें बसला असतां परमेश्वर येतो ह्मणून तों पडद्यांतून वैताळक बोलतो पहा,

नीवारद्युतिकंबुकंठ जलजा वाणी तनूची बरी
वानी ते झलकेतितें कवण तो वानील सांगातऱ्हीं
वाणीशादिक प्रार्थिती मनिं जडावा नीट जोकिं असें
वाणी नित्यसुखा न जेथ करुणा वानीश तो येतसें.

राग : अठाणा

दरु.

चन्द्रमौळीश येतो सुधी
सान्द्रदयांबुधी ॥ प ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

इन्द्रादिक देव अगदि

वंदितिं ज्या पदोपदिं ॥ अ प ॥

शिशिर भानुदीप्ति धरी जो

वसु नित्य वृषभावरी

स्वसुखाचानिधि मनोहारी

असितकंठ भक्त सहकारी -१

सू. एगेंरीती चन्द्रमौळीश आल्यानंतर ब्रह्मादिक देवांसहित महाविष्णु एताहेत पहा.

दरु राग : – शंकराभरण

येतो तो पुरुष लक्ष्मीयेच विसावा ॥ प ॥

चेतोधामवासी पाम(र)हा

येतचि तो संविसरवा ॥ अ प ॥

मस्तकिं मकुटझलालि

कस्तूरि रेखिली भालीं

कौस्तुभमणि नेणो

कोट अंशुमाली -१

हस्तकिं दरसरसिज कौमोदकीं

निस्तुल जाप्रति तेजो माली

वस्तभाववरि सकलहि लेऊनी

वस्तुतमः पर जो वनमाली -२

सू. एणेंरीती महाविष्णु आल्यानंतर लग्नघटिका समीपउरली म्हणून जोश्यानें तांतडि करितांच,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जो व्यापुनि सर्वजगासि राहे
ज्या विश्वसाक्षि श्रुति बोलताहे
ज्याचें दिसेना शिरधा तयासि
अष्टादितीशान पठें तयासी

नामें रूपगुणें करूनि शिव जो ज्या शंकराख्यावरी
जे देवी आजि सर्वमंगळमयी चिद्रूपिणी सुंदरी
ज्याच्या आठवणें घडे सकलिका कल्याण तें चांगलें
त्यांतुह्मा शिवशक्तिरूप उभयां भूयात्सदां मंगळ

भाग्यश्री धनधान्य संतति चिरंजीवित्व तें चांगलें
अष्टैश्वर्य विशिष्टधैर्य सकल श्रेष्ठत्वलोकागळें

ऐसें सर्व समर्पूनि घनकृपापैसें शिव निश्चयें
भक्ताचा निजरक्षणीच असी जे जातां सावधान स्वयें

धान्यासिं वसनें धनें नवनिधी मान्यांतहि मान्यता
कन्याहिं पुत्रकळत्रमित्र बरवे सन्याय निष्ठा तथा
अन्याहिं वरसंपदा वितरुनि अन्यादृशा येक्षणी
धन्या तां बहु सावधान असि जे पुण्याढचसंरक्षणी

मंगळ दरु

जयमंगळ नित्य शुभमंगळ ॥ प ॥

चन्द्रमौळीशाय मंगळ
सान्द्रसुखनंदीशाय मंगळ ॥ अ प ॥

कल्याणाद्रिकार्मुकाय, कल्याणी हृत्कामुकाय
कल्याणविधायकाय जयमंगळ

दर्पकप्रहराय, सर्पादिराजहाराय
कर्पूरकुंदगौराय जयमंगळ

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रथितचिद्वैभवाय प्रणतकंजभवाय
प्रतापेन्द्रकुलदैवाय जयमंगळ

सू. - एणेंरीती हिमाचलानें परमेश्वरास कन्यारत्न समर्पून बोलतो पहा.

धर्मिष्ठासि कदाविपत्ति नलगो स्वाप्नांतही येकदा
लाभो नित्य सदाशिवप्रभु दये सद्बोध लोका सदा
श्रीमद्रामपदारविंदयुगळिं कल्याणभाग्यप्रदा
जोडो भक्ति उदारते अनुदिनिं स्वानंदराज्यास्पदा

सू. - याप्रकारें हिमाचलाने प्रर्थितां त्याचे मनोरथ परिपूर्ण करून सपरिवार परमेश्वर नित्यानंदमंदिरास आले पहा.

॥ श्रीपार्वतीपरिणय नाटक संपूर्ण ॥

*

श्रीमालोजि नरेन्द्रनंदन शाहेन्द्रनामाथिला
पुण्यश्लोक ह्मणूनि लोक निगदी ज्याला प्रपंचा तिला
त्याचापुत्रक सच्चरित्र जगती एकेंद्र भाग्या गळा
त्यापासूनि शिवस्वरूप तुळजाराजेंद्र जो जन्मला.

प्रतापसिंहेंद्रकुमार त्याचा जो अंशि श्रीविष्णु जगत्पिताचा
उमासतीची सुकृतैकराशी कल्पद्रुमाचा न तुलेकराशी.

जो कां त्रिवर्णगुरुची अपुरूपकाशी
आधार थोर आजि अत्मनिरूपकाशी
तेणेंचिया गिरिसुता शिवरूपकाशी
केलें पहा निरूपमाद्भुत रूपकाशी.

॥ श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु ॥

*

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

॥ ५. श्रीमीनाक्षीपरिणय नाटक ॥

ग्रंथनिर्माता : श्रीशरभेन्द्र भूपाल

ग्रंथकर्ता : श्रीरंगनाथ कवी

तोडयमंगळ दरु — राग : नाट – झंपताळ

जय सुमुखगुहजनक, जय सकलसुरतिलक
जय सरीनृपकटक, जय सृष्टिलोक ॥ प ॥

जय शिवा रतिरसिक, जय सुखितनतलोक
जय शीर्षगशशाङ्क जय शमितशोक -१

जय चरणहतशामन, जय चंडकृतकरुण
जय चमत्कृतिसदन, जय चारुवदन -२

जय शर्व जितमदन, जय यशः कलितहरिण
जय शस्त्रगुणपूर्ण, जय शरभशरण -३

मंगळ दरु — राग : केदारगौळ – त्रिपुटताळ

शृंगारशेखराय जयमंगळ
शशिखंडधराय शुभमंगळ ॥ प ॥

गंगाशोभितमस्तकाय, तुंगाद्रीशनिवासकाय
रंगस्थळाश्रित शुभनटनाय, मंगळदायकनिजचरणाय -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

नागपणामणिभूषिताय, नारदमुख मुनिसेविताय
नगतनयसंतोषिताय, नवनवसद्गुणशोभिताय -२

सू. - एणेंरीती नाट्यारंभ झाल्यानंतर सूत्रधार सरस भूमींत सरसकवि विरचित श्रीमीनाक्षी-कल्याणाभिधान शृंगारवीररसप्रधान नवीन नाटकानुसंधानें चतुरवर सभासद-निकर मनोरंजन करावयाकारणें विघ्नहराचीप्रार्थना करितो निरखा.

प्रसन्नवदन प्रभो प्रथम आठवितों तुला
प्रसन्न मज हो करीं प्रबल सत्कृपा निस्तुला
प्रसाद करिसी जरीं प्रथितकीर्ति वाढे जनी
प्रणाम करितों म्हणीं प्रकट हो सभारंजनी -१

सू. - एणेंरीती गणेशाची प्रार्थना करूनि निजवाणी नवरसगुणखाणी नवनवोन्मेषणी व्हावयाकारणें वाणीचेंस्तोत्र करितो पहा.

श्रीभारती प्रबळ देवत तूं प्रवीणा
साजें करी सरसपुस्तक माळ वीणा
ध्यात्यासिहिं रिझविसी बहु अंतरंगी
ते तूं प्रसन्न म्हणि हें मज भव्यरंगी

सू. - एणेंरीती वाणीची प्रार्थनाकरून अज्ञानतमोगुण निवारणी वासरमणी ऐसा श्रीगुरूचें स्तवन करितो निरखा.

बोधें भवभय हरितो, विमलब्रह्माचि निजाश्रितां करिसो
त्या तुज नमितो भावें, शुभनाटक हें सभेंत शोभावें.

सदाशिवा भूति विभूषितांगा
सदाशिवालिंगित वामभागा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सदास तूं येऊनि चन्द्रमौळी
सदासया दे शिव सर्वकाळी.

सू. - एणेंरीतीं श्रीचन्द्रमौळीश्वराची प्रर्थनाकरून नाटकार्थसंग्रह नांदीश्लोक वदतों परिसा.

देवी संपत्ति द्यावी, निखिल निज विभूलागी ऐसें स्वजली
भावी तै स्वप्रभावीं, अवतरुनी जयालाहुनी सर्वदेवी
गेवी शंभुसीमावी, झषनयन लसत्प्रांतभागे सुखावी
सेवीतत्पाणिभावीं, सततहिं सुख वो याजनातें सुदेवी.

सू. - एणेंरीती नाटकार्थसंग्रह नांदीश्लोक वदल्यानंतर नाटकरंभी विघ्नेश्वराची प्रार्थना केल्यास्तव तो दयाकर विघ्नतमस्तोम दिवाकर प्रत्यक्ष येतो ह्मणून सभासदास सावधकराया कारणें दौव्वरिक येतां निरखा.

प्रावेशिक दरु — राग : शंकराभरण – मिश्रताळ

दौव्वारिक - दौव्वारिक येतसे पहा
शैवाग्रेसर भूतिभासुर हा ॥ प ॥

तांवदेत [1]मिषि यापरि महा
ताकीदकरि जो सभ्यासमूहा ॥ अ प ॥

हाती लांकी बहु जयवंत
हावभावें मान हलवीत
हाती घेऊनि रौप्यविलसित
हर्षें गायतो नाचतनाचत -१

1. मिशि

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. - यापरी दौवारिक येऊन सभासदास सावध केल्यानंतर गणपति प्रत्यक्ष येतो निरखा.

राग : बेगडा - आदिताळ

प्रावेशिक दरु.

विघ्नेश्वर - गणराज येतो पाहीं गजरें
उल्हासें शुभदेहीं ॥ प ॥

शिणहारक जो लवलाहीं
शिवतनय वन्द्य सुराहीं ॥ अ प ॥

मूषिकावरि वळघला
मोटा मोदकीं पोसला
तोषावया सर्व जनाला
थोर प्रीतीं सभे अला ॥ १ ॥

सू. - यापरी गणपति येऊन सकलविघ्ननिरसिल्यानंतर सूत्रधार चहूंकडें पाहून अहो सिद्ध आहे रंगमंगळवीथीं

सुषिरसुषिरांचा ज्या स्थळीं नादसुनादें
अतिविततसुख स्वानद्धघोषूं जानदें
सुघनघनानिनादें शोभिता सर्वलक्ष्मी
सततसतत नाचें कौतुकें रंगलक्ष्मी

वचन - अणीक कैसें ह्मणिजे

नानादेशनिवास भूसुर महाविद्वांस हे राजती
वीणावेणुमृदंगटाळ बरवें मोर्चंगहीं वाजती

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जेथें गानकळाप्रवीण हरिखें गातां भले गाजती
त्यागानें सकलाप्सरा कुशलते गन्धर्वहीं लाजती.

नेपथ्यामध्यें :—

सू. - अगाये पारिपार्श्वका सकलजन मनः श्रवणनायनानन्द करावया विषईं मी आज्ञापिजेलों. पारि - व - कोण ते सभासद.

सू. - येथें श्रीमद्भोसलकुलतिलक राजादिराज श्रीशरभेन्द्रमहाराजे प्रतिवर्षी क्रियमाण गणेशमहोत्सव विलोकून संतोषभरभरित शंकरः किंकर चतुरवरनर मिळाले आहेत ते कैसे ह्मणिजे.

काव्यालंकृति नीतिनाटक महा वेदांतवेत्ते भले
तर्कव्याकरण श्रुतिस्मृतिगणीं निष्णात जे चांगले
सत्साहित्यकळानिधी परगुणा जे श्लाघितीकां महा
मात्सर्यादिकदोषहीन कुतुकें येथें मिळालें पहा

सू. - आणीक कैसे ह्मणिजे सांगतों ऐक.

वाचस्पतीहूनि विशेष वक्ते
जेकां चतुःषष्टिकळेसि धन्ते
कवी सुनेत्रीलसताति पाहीं
अत्यंत जे आवडते नृपा हीं

वचन - ऐसाचा अलभ्ययेगघडला आहे त्यास्तव यासभेस उचित श्रीमीनाक्षी-परिणयाभिधान शृंगारवीररसप्रधान अभिनवनाटक नाचऊन सभ्यास रंजन करऊन आत्म्याते कृतार्थ करूं इच्छितों - पारि. व - त्या रसालग्रंथाचा निर्माता कोण –

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. व. - अरे पारिपार्श्वका त्या ऐकिले नाही काय. या कलियुगीं अतिप्रख्यात भोंसलकुल ते परंपरा सांगतों ऐका.

आर्या -

श्रीशंभू एकोजी शरभाजी राजतो महासेन
एक शिवाजीराज नृपती भला रामचन्द्रगुणमदन

भीममहिपति येकक्षितिपति सुगुणी वराह येकोजी
विख्यात ब्रह्माभिध नृप शाहूजी तसाचि अंबाजी

परशुनृपवीर बाबा माळोजी शाहजी महा ज्ञाता
सांबाजी तद्भ्राता भूपशिवाजी चंडरिपु हर्ता

तुक्कोजी तत्तनय प्रतापसिंहेन्द्र तज्जनित तनय
तत्सुत तो तुळजेन्द्र प्रथितमहीपाल भव्यगुणसांद्र.

सू. - अगाये पारिपार्श्वका बाबाजीराजेंचे ज्येष्ठपुत्र माळोजीराजे त्यापासून साहवे पुरुष तुळजामहाराजाने त्या बाबाजीराजाचे कनिष्ठपुत्र विठोजीराजापासून आठवे पुरुष शरभेन्द्रमहाराजास स्वीकारकरून घेतलें ते परंपराही सांगतो ऐका

बाबाजीराजाचापुत्र विठोजी द्वितीय बहु सुगुणी
त्र्यंबकपुत्र तयाचा गंगाजी तो तदीय सुत मानी

तत्सुत तो बुक्काजी निपजे त्याहूनि चतुर गंगजी
त्याचा सुभानुजी सुत तत्सुत तो शाहजी जगीं प्रथित

मग तत्तनय वसुमती पाळूं तुळजेन्द्र दत्त घे सुमती
त्याशरभेन्द्रास पदीं स्थापीं मोदें रिझोनि राज्यापदीं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वचन - श्रीशंकर सकलजन परिपालन करावया कारणें विषमदृष्टी सोडून समदृष्टी होऊन श्रीशरभेन्द्रभूपरूपें अवतरला, असे हे कायविचित्र महाविष्णूचेंकृत्य श्रीशंकर अवलंबिलें –

सू. व. - त्यास कारणे सांगतो ऐक

ब्रह्मा सृष्टि करी परी जगतया पाळू असी धी नसे
पाता विष्णुपरंतु तो कलिभयें जो बुद्ध झाला असे
यासाठी शिवदेववर्य करूणासिंधू जनालागुनी
पाळाया शरभेन्द्र होऊनि असे जो राजराजाग्रणी.

पारि. व. - "एतादृश गुणग्रामणी चोळदेशधणी याग्रंथाचा निर्माता"

सू. व. - हे ऐकोनि पारिपार्श्वक बोलतो पहा.

पारि. व. - अगाये सूत्रधारा चतुःषष्टिकळाप्रवीण दिग्विजयकर्ता जगत्प्रसिद्ध चोळदेशाधिप शरभेन्द्रभूपाळ याग्रंथाचा निर्माता काय. तरी सभासदांचे. तृप्तीहिं मनोरथ सफल होतील.

सू. - चहूंकडें पाहून, अगाये पारिपार्श्वका दंपती मनःसंतोषकारक वर्षाकाल शोभतो पहा.

कांतार्थ देव शिव एक ह्मणोनि लोकीं
होती प्रसिद्धजन सर्व तसे विलोकीं
सद्यौवना झणी जरी नवरी पतीसी
तो वर्षवोनि शरभराज इन्द्र तीसी

सू. अहो नेपथ्या मध्यें, असा कोण शूर आहे. अगाये परिपार्श्वका म्या गाईल्या श्लोकाचा अर्थ अन्यथा कल्पून मीनाक्षीचीं दूतिका चपलाक्षी येतसी दिसते. आह्मी अनंतरकरणीयास जाऊं ह्मणून दोघेहीं निघून गेले असतां चपलाक्षी येते निरखा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

राग : सावेरी – आदिताळ

प्रावेशिक दरु

चपलाक्षी येते पाहीं
चमकत जन मोहीं ॥ १ ॥

चपलेहूनि भावबहु देहीं
चारुसुरूपा जी समनाहीं ॥ अ १ ॥

कमठातीरहिं विलसति हाती
कचकुचदृढतर कसिले निगुती
सुमशर करितो नयनी वस्तीं
शूरहीं पाहू साडी मस्ती -१

सू. एणेंरीतीं चपलाक्षी येऊन फिरून पाहून त्रिभुवनरक्षाणीं दक्ष ऐसा मीनाक्षीस जाणणार कोण आहे, ह्मणून आप आपणांत बोलते निरखा

मीनाक्षी सत्काटाक्षी त्रिभुवनजन संरक्षणी दीक्षित जे
साक्षात लक्ष्मीपतीची बहिण घन जीचें त्रिस्तनी वक्षासा जे
यक्षा रक्षा ऋभुक्षा पतिसहि समरीं मक्षिकातुल्य पाहे
जेता लक्षानुलक्ष सद्दशवर इला दक्षसा कोणलाहे

सू. चपलक्षी येऊन मीनाक्षीस अतिचतुरतर वीरवरसंघट्टनी आलोचना करीत असतां सूत्रधार साटोप फिरून पाहून आकाशी कान देऊन झेंकारशब्द ऐकून शंकर पदारविंद भ्रमरीभुत भृंगिरीटी येतोसा दिसतो ह्मणतांचि भृंगिरीटी येतो निरखा

प्रावेशिक दरु

राग : सुरटी – मिश्रताळ

भृंगिरीटि येतां पाहीं
भृत्यशंभूचा नतदेहीं ॥ १ ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

रंगी नाचत जो सकळाही
रंजवीतसे लवलाहीं ॥ अ प ॥

चारुरुद्राक्षमाळा गळा
चांगला जो अस्थीचा पुतळा
चिरव्याघ्राजिन नेसला
चिंतीतसे मनीं शिव भोळा -१

तीनीं पायीं झोटिंग चाले
मान हालवीत फारचि डोळे
आनशंभूवीण न बोले
अवघे जणजा लक्षिती त्याहर्षमेळें -२

सू. एणेंरीती भृंगिरीटि येतांचि चपलाक्षि हातीं धरिल्यां काठीसहित चतुष्पाद सुपुच्छ व्याघ्रांबरधारी आणी लवला ऐसा ते पाहून धनुष्यसज्जून ठाण मान उभीराहातांचि श्रीशिवसरण ऐकून चपलाक्षी बोलते.

चपलाक्षी व. - "यावें यावें मुनीव्याघ्र हो आपण कोण आहां, द्विपाद मानवहीं नव्हेत चतुष्पादमृगहीं नव्हेत माझ्या कोंव्रडयास तीनेच पाय", ह्मण त्या सारिख काय विचित्ररूप.

भृंगिरीटी व. - सहाय बोलतां, अवो ये पोटाळाले आपुल्या ढोळयांत मुसळ लोंबत असतां, पराव्या डोळयांत कुसळ आहे, ह्मणून हामणें हा जनाचा स्वभावच, तूं ताटंकादि भव्यभूषणी विराजमान असल्यामुळें, पुरुष नव्हेसी, वीरापरी धनुर्बाण धरिल्यांमुळें, तुजला स्त्रीह्मणूनहीं भावितानये हे काय विचित्र नीट तूंचि समजून पहा. असो तूं यियेवनी किमर्थ फिरतेस ते ऐकूं इच्छितों, ह्मणतांच चपलाक्षी बोलते पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जे शौर्यसागरसुता मलयध्वजाची
अत्यंतसुंदरतनू तिज मारच्याची
कोठें मिळे वर तिला अनुरूपलोकीं
ऐसा विचार करिते फिरते विलोकीं.

वचन - आणीक तीची अवस्था काय ह्मणून सांगू.

सीसपद्य

राजराजेश्वरी राकेन्दुनिभमुखी
मुकुरांत आपुलें मुख न पाहे
कोमलांगी सरसकोकिलालापिनी
चतुरपरिभाषिणी चकित पाहे
कनकभासुरतनू कमलसन्निभपाणी
कर न लक्षी सुरसिकाभयेंहिं
शृंगारशेखरा भृंगालकाकेश
पाशा कसी चांग पालवी हे

गीतपद्य - मार करितो ईस शर मार देहीं
फार कुशलाकरी राज्यभार तोहीं
धीर इजसी तुल्य नरवीर [1]नमहीं
शूर वर धुंडिते तिज कीर पाहीं.

सू. अगाये भृंगिऋषि श्रीसदाशिवचरणारविंदमकरंद यानें तूं तुंदिले न होतां, निजांगें कृश झालासी, परंतु तुजला वार्यानें नेईना असे, तिसरा पायें कां संपादिलास ते फार विचित्र ते कारण इच्छित्तें, अस ह्मणतां भृंगिरीटि बोलतो पहा.

1. समही.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

भृंगी. वृ - अवो ये चपलेक्षणे तूं अवला, परंतु तुजला प्रवलानीं बलात्कारकरीन असे कृत्रिमेंकडून वीरवेष घेऊन वीराधिवीरासहिं भेडसावितीस, ते अपेक्षा विचित्रनव्हें काय, वरे, ते असो, म्या आलेकार्य सांगतों ऐक.

द्विपदें

मुख्य मानूनि म्या मूर्ति ईशाची
अंबिकेवीणपैं अर्चितां साची
अर्ध शिवमूर्ति तवें आर्यासी झाली
अंतरी माझीया चिंता उदेली
भव शीण वारितां तो भव हा स्वामी
शिववीण कवणासि सेवीना कदों मी
धरूनि असा भाव दक्षिणामूर्ति
पूतचित्तें यियां पूजिली निगुती
केल्यां प्रदिक्षिणा कीर दोघासी
घडतील ह्मणूनिया घाविर्या मतीसी
[1]अणुरूप धरूनि उभयांतरी रिघुनी
भव भाग भोंवतां भ्रमतां भवानी
शक्ति हरितां काय शत जीर्णझाला
पाय टेंका तिजा पावनें दीधला
पाहुनि अप्रीति पतीचि विराळी
प्रणयकलहें शिवा प्रत्येक झाली
संधी असा बाण संधान करूनी
मारा मारीतसे शूर होउनी

1. अळिरूप

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मदनहर मी असा मदहिं जिराला
रदन विचकों वरूं मदशालिनीला

असें शीणपैं भोगितां शंकरानें
कसे पाहिजे संग म्या किंकरानें
ह्मणोनि फिरे मी जनी आणि राणी
विवाहीं तयाचा धरूनि निशि राणी.

सू. एणेंरीती भृंगिरिटी बोलतांच चपलाक्षी अत्यंतहर्षें हाहावरी हात मारून बोलते पहा.

चपलाक्षी वचन - फारसंतोष फारसंतोष, देवी विचित्रागतिः

आर्या - हृदयविकारहर्ता, होईल जो जाणतां तिचा भर्ता तां कैं [1]पर्णी तिजला, कोण उपाया रचूं फथी मजला.

सू. याप्रकारें चपलाक्षी बोलतांचि भृंगिरीटि बोलतो पहा.

भृंगि व - अवो ये चपलाक्षी मीनाक्षी वक्षोज विषमता विघटनी विषमाक्षदक्ष यासी ऐसा उपाय करावां.

सू. व - एणेंरीतीं परस्पर एकांत करीत असतां नेपथ्यामध्यें वीणाझणत्कार ऐकून चपलाक्षी माझ्या विलंब न सहतां मीनाक्षीनें मजला हुडकणे विषईं [2]प्रेरिली ऐसी कनकांगी येतेसी दिसतें. आतां मी त्वरेनें मीनाक्षीजवळी जातें, [3]तूंहीं श्रीशिवासमीप जाऊन याकार्य संघट्टनी उद्युक्त असावें.

सू. व - याप्रकार दोघेहीं बोलून निघून गेल्यानंतरें मीनाक्षीची दुसरीसखि कनकांगी येते निरखा.

---

1. पाहीं 2. प्रक्षिली 3. तांही

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रावेशिक दरु

राग : कामास – अदिताळ

कनकांगी येते पहा
मनमोहनरूपा हे ॥ प ॥

वनतेज शोभविता हे
वचनचातुर्ये गुरुहीं मोहे ॥ अ प ॥

झुना नेसली पैटणी
चोळीग तटीतट स्तनी
वीणा वाजी मधुरध्वनी
वीरवेषा विनटे गानीं -१

सू. एणेंरीती कनकांगी येऊन वन पाहून बोलते पहा.

कनकांगी व - ऐसा वनांत मीनाक्षी गूढून कैं विहारेल, बरे चपलाक्षी कोठे असेल पाहूं ह्मणून धुंडीत वन वर्णिते निरखा.

दरु

राग : नीलांबरी – आदिताळ

नन्दना सम, हे नव शुभवन पाहे ॥ प ॥

मन्दपवन आनन्दप्रद अर-
विन्द जे बहुमकरन्द सेऊनी
तुन्दिल सरसे मिळिन्द भ्रमरी-
बृन्दसहित स्वछन्दे गुञ्जती -१

चन्दन मधुमन्दार बिल्व पिच्चु
मन्द सरळ आणि कन्दराळहीं
स्यन्दन घनमाकन्द कदम्बकों
कुन्दलता अतिसुन्दर नटती -२

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एणेंरीती कनकांगी वनवर्णन करीत असतां चारुलाक्षीने सांगीतले वर्तमान ऐकून मीनाक्षी निजहृदयजविकार हरण विचक्षणरणदक्षगवर परीक्षावयास दिग्विजय व्याजें अक्षोहिणीसेनासहित येते म्हणून सभेस सावध करावयास दौवारिक येतो निरखा.

दरु

"दौवारिक येतसे पहा"

सू. एणेंरीती दौवारिक येऊन सभेस सावध केल्यानंतर मीनाक्षी येते निरखा

प्रावेशिक दरु राग : [1]आनन्दभैरवी – आदिताळ

मीनाक्षी येते जयसंकल्पे
मीनध्वज तळपे ॥ प ॥

सेनासंगे विलसते अमूपे
सिद्धा शरचापे ॥ अ प ॥

हे ना गणी सुरवर किन्नर
कोणासहिं स्थिरचरांत रूपें
मतिमोहक रूपा हे शर्वाणी
गतिनिर्जित करणी -१

प्रतिनाही तिजला पाहतां भुवनी
प्रथिता कल्याणी
रतिसम मानी रतीसी निजमानी
नुतिकरिती सुरपति तिज लागुनी -२

सू. एणेंरीती मीनाक्षी येऊन निजपराक्रमें बोलते निरखा

1. समही

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आर्या -

जा भूपति शिव दाता
सुजना प्रत्यर्थिसिंह शरभ मही
मत्प्रिय दिग्विजय करा
दिक्पति विजया करीन निज बाही

सू. - याप्रकारें बोलतां इन्द्रदिशेस अभिमुख होतांचि पुरन्दर इन्द्र येतां निरखा.

प्रावेशिक दरु

राग : वृंदावनसारंगा - आदिताळ

पुरंदर येतां पाहें
पूर्णगर्वे सुरसमूहें
पुरंध्रीच्या तेजें मोहे
पुनहा जूंझू उभाराहे

सू. - एणेंरीती इन्द्र येऊन आपुल्या देवसेनेप्रति बोलतो निरखा.

विश्वामित्र पराशराधिक महाज्ञाते तपस्वी भले
नारी भव्यकटाक्ष वीक्षणगुणें मोहासिपैं लाभले
आतां धैर्य रणांगणी निरखुनी नारीन सांडी कदां
सज्जोनि कमठासि बाण निकटा वर्षा तुह्मी येकदां

सू. - एणेंरीती देवास इन्द्रानें सांगतांचि मीनाक्षी आपुल्या सखीप्रति बोलते निरखा

सहस्राक्ष हा लक्षुनी बाण मारी
तया तें निवारा तुह्मीहिं सुमारी
न तो हालवीकीं जसा पापण्यातें
करावें तसे त्या सुराचा धण्यातें

सू. - एणेंरीती मीनाक्षीचेवचन ऐकून उभय सेनावीर शरवर्षी अतिक्रूरसमर करीत असतां सुरराज पराजय पाऊन हे राजराजेश्वरीस पाहून बोलतो निरखा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ध्यावें यथाकरातें, साङ्गुनियां मानसीक निकुरातें
तुष्टेनि लेंकरातें, पाळी देऊनि अभीष्ट वरातें.

सू. - एणेंरीती इन्द्रानें कामधेनु कल्पवृक्ष चिंतामणि प्रभृति अमूल्यवस्तु अर्पून प्रार्थितांचि मीनाक्षी त्यासी अभयदेऊन अग्निदिशेस अभिमुख चाली करितांचि तो हव्यवाह येतो निरखा.

प्रावेशिक दरु राग : पूर्वकल्याणी – मिश्रताळ

हव्यवाह येतो पाहे
गव्यपात्र व्रिजणावाहे
सव्य तोमर शक्ति लाहे
हव्यवासें भिडुं उभाराहे -१

सू. - एणेंरीती हव्यवाह येऊन तरुणीच्या कांतीकडून मोहीत होऊन निजवीरास आज्ञापिजेतो निरका.

तरुणी मदनज्वाला, धैर्य घृताने तयातना घाला
वर्षाशर एकसरें, मागें प्रमदासमूहा जें विसरें.

सू. - एणेंरीती निजभटासी तिखटवचनें आज्ञापितांचि मीनाक्षी सख्याप्रति बोलते निरखा.

वर्षाकों शरधारा, लोहेन जसा रणांग आधारा
जुंझाया मजदावा, कोणीं त्या आश्रयासहित दावा.

सू. - एणेंरीती आज्ञापितांचि परस्पर बाणाबाणीं युद्धहोतांचि हव्यवाह पराजय पाऊन हे श्रीराजराजेश्वरीस अमूल्यपदार्थ देवून प्रार्थितो निरखा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ध्यावें याथाकरातें, सांडूनिया मानमीक निकुरातें
तुष्टेनि लेंकरातें, पाळी देऊनि अभीष्ट वरातें.

सू. - एणेंरीती मीनाक्षी दिग्विजयकरून दक्षिणाभिमुख फ़िरून क्षणमात्र उभीराहतांच चपलाक्षी बोलते पहा. चपलाक्षी - व - अवो ये स्वामिणी तुज समोर यम सर्वथा येणार नाहीं, राजराजसख्यानें ज्याचा मज भोडिला तो राजराजेश्वरी समोर मज केविं धरील.

मीनाक्षी वचन - "वृश्चिक लाल्यानेंहीं त्याला धुंडूनि नांगो दंड करावो"

आर्यार्ध -

मीनाक्षी - "भानुज लोकां दंडी, तयासि चपलेक्षणे क्षणें दंडी"

चपलाक्षी वचन - यावचनमातें यम तुर्याश्रम घेतला म्हणून चपलाक्षी बोलते.

आर्यार्ध -

चपलाक्षी - "धाकें झाला दंडी, वधींत यालागी कोण कोदंडी"

सू. - एणेंरीती चपलाक्षीने बोलिले वर्तमान वैवस्वत चारुमुखें ऐकून समोर न येतां अमूल्यपदार्थ पाठवितांच मीनाक्षी तेपदार्थ घेऊन नैरृतिकोणाभिमुख होतांचि नैरृत येतो निरखा.

राग : अठाणा – आदिताळ

प्रावेशिक दरु

नैरृत येतो निरखा
शरचापासिधर जो सदाहीं
सुरवैरि भासुरदेहीं
क्रूरसेनेसी लवलाहीं ~१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. - एणेंरीती नैऋत येऊन आपुल्या निजभटासी पाहून बोलतो निरखा.

आर्य -

या तो नव्हेति अबला, अतिमोहक भासती महा प्रबळा
न बुडवया उपायीं, जंझाटें यस करूं कसें उपाईं.

सू. - एणेंरीती नैऋती बोलतांचि मीनाक्षी आपुल्यां सखीप्रती बोलते निरखा.

आर्या -

रविभासुर तार्टकें, जुंझा रात्रिचरपुभु शुकें
जो लागे पायां ते वधील मग कोण पायां ते.

सू. - एणेंरीती त्यासी उपेक्षितांचि नैऋती पादाक्रांतहोऊन मीनाक्षीस बोलतो निरखा.

घ्यावें ययाकरातें, सांडूनिया मानसीक निकुरांतें
तुष्टेनि लेंकरातें, पाळी देऊनि अभीष्ट करातें.

सू. - एणेंरीती मीनाक्षी दिग्विजयकरून वरुणदिशेस सन्मुखहोतांचि तो वरुण येतसे पहा.

प्रावेशिक दरु

राग : फरजु – आदिताळ

वरुण येतसे पहा
वरुणा मदन अंगी महा
धरूनि पाशें सव्यकरीं हा
आर्भट जषवाहा

सू. - एणेंरीती वरुण येऊन उजृंभला, ऐसा वधूसिधूतें पाहून चकितहोऊन बोलतो परिसा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लावण्यामृतपत्र थोरमकरें दृङ्मस्य जेथें पहा
ग्रीवाशंखकटाक्षलोललहरी धम्मिल्लशैवाल हा
धर्मांबाकणमौक्तिके कुचगिरी जे थोरसा मावले
पाऊं फार कसे वधू जलनिधी पासोनि आम्ही बळें

सू. एणेंरीती वरुणाचेंवचन ऐकून मीनाक्षी बोलते निरखा.

आर्या -

शूर नव्हेसी पाशी, कैसा जुंझुसके आम्हापाशीं
हा केवलेंचि जडपती, तत्सैनिक नाकसे रणीखपती

सू. याप्रकारें मीनाक्षी बोलतांचि हितकरसैनिक वरुणाप्रती बोलती निरखा

अगस्त्याच्याची अतिकुशल आजी विलसती
तुह्माला नाराजीतरिं तवधराजी गवसिती
असें माना तुह्मी न कहें असमाना ह्मणूनियां
बरें राखा माना त्वरित बहुमाना करूनियां.

सू. एणेंरीती सेवकजनाचेंवचन ऐकून वरुणराज राजराजेश्वरीस विनवितो निरखा.

आर्या -

घ्यावें यथाकरातें, सांडूनिया मानसीक निकुरांतें
तुष्टोनि लेंकरातें, पाळी देऊनि अभीष्टद वरातें

सू. याप्रकारें मीनाक्षी दिग्विजयकरून पवनदिशेस अभिमुख होतांचि पवन येतसे निरखा.

राग : भैरवी – आदिताळ

प्रावेशिक दरु

पवन येतसे पहा
नवल लाहुनि देहा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जवशाली शोभे महा
प्रवर लोकपाली हा -१

सू. एणेंरीती पवन येऊन निजभटास आज्ञापितां निरखा

मनाचा आह्माहूनि हीं वेग भारी
तया कारणें थोरहूं शक्तनारी
गळें शस्त्र ज्या देखुनी वीरहस्तीं
जाणावें तया पाऊनी फारखस्तां.

सू. येणेंरीती वायूचेंवचन ऐकून त्याचे चतुरवरवीर बोलताती निरखा.

निजायुधें गळालियां स्वसखरीं तयाच्या उरी
गिरूं मग कसूखळें भुजलता गुणें सत्वरीं
डसूं कठिणमानसें मृदुळ भव्य बिंबाधरीं
अह्मी विजय लाहते भटतुझे भयाना धरीं.

सू. याप्रकारें वायुभटाचेंवचन ऐकून मीनाक्षीच्या सख्या बोलताती निरखा.

आर्या - भव्य कटाक्ष प्रसरें, बांधूं तुह्मा क्षणेंचि एकशरें
अथवा शस्त्रास्त्रशरी जुंझायाची रणी पहा कुसरीं.

सू, याप्रकारें मीनाक्षीच्या सख्यचेंवचन ऐकून पवन बोलतो पहा.

आर्यार्ध - तुह्मी अबला कदळी, कांपवितो निजगुणे तुह्मासि दळीं

सू. एणेंरीती पवनवचन परिसून प्रमदा बोलताती निरखा

आर्यार्ध - गिरिधर आह्मी प्रमदा, तवबळें चालें कसें त्याजी स्वमदा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एणेंरीती प्रमदाचेवचन ऐकून पराजित ऐसा पवमानराज राजराजेश्वरीस प्रार्तितो निरखा

आर्या -

ध्यावें ययाकरातें, सांडूनिया मानसीक निकुरातें
तुष्टेनि लेंकरातें, पाळी देऊनि अभीष्ट वरातें

सू. एणेंरीती मीनाक्षी दिग्विजयकरून कुबेरदिशासि अभिमुख होतांचि तो यक्षराज येतो पहा

प्रावेशिक दरु

राग : तोडी – आदिताळ

यक्षराज येतो पाहीं
दक्ष कपट विग्रहीं
लक्ष नसे धनसंग्रहीं
यक्षसखा जो नरवाहीं

सू. येणेंरीती राजराज येऊन राजराजेश्वरीस पाहून मनी वचकून सावधपणें बाह्य शौर्य बोलतो निरखा

उणें काय आह्मासी ध्या द्रव्यराशी
न झाझा तुह्मासी आह्मी ज्याघरासी
कसी कीर्ति ये जिंकिल्या बायकातें
करावें तुह्मासी वृधायुद्ध कांते

सू. एणेंरीती कुबेराचेवचन ऐकून मीनाक्षी बोंलते निरखा

जगीं जिंकिला काय थोरी कुबेरा
न जिंकू तु तें सर्वथां जा कुबेरा
तुवां अर्पिल्या घेउनी द्रव्यराशी
भीऊं सज्जतां हे कुबेरां पराशी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एगेंरीती मीनाक्षी बोलतांचि कुबेरराज राजराजेश्वरीप्रति बोलतां निरखा.
ध्यावें यथाकरातें सांडूनिया मानसिक निकुरांते

सू. एणेंरीती दिग्विजय करून ईशान्यदिशेस अभिमुख होतांचि श्रीशिवबंदी जनाग्रेसर नंदकेश्वर येतसे निरखा

प्रावेशिक दरु राग : कल्याणी – आदिताळ

नंदिकेश्वर येतां पहा
नंदनीयगुण हा ॥ प ॥

बंदी शंभूचा महा
छंदी घेऊनि भूतसमूहा ॥ अ प ॥

सू. एगेंरीती नंदिकेश्वर येऊन शूरनेषश्वर प्रमदासमूहास पाहून बोलतो परिसा

आर्या - जितकामाचा बंदा, नंदिकेश्वर मी पाहणार नंदी
जितरतिरूप ललना, तुह्मासी पाहोनियां कदां भुलना

सू. एणेंरीती नंदिकेश्वर बोलतांचि प्रमदाजन बोलतो निरखा

आर्या - कैसा शंभु विलासी, निजसेना याजमान्य कैलासी
देऊनि झाला परता, ह्मणूनी आली तया दिगंबराता

सू. एणेंरीती प्रमदाजन बोलतांचि मीनाक्षी आपुल्या भटावरी संतुष्ट होऊन सख्यासी आज्ञापिते निरखा

सीसपद्य

पद्माक्षि ऐकगे प्रथितवीरांप्रती
पांडरें छत्र रवि पानहीं दे
चपलाक्षि ऐकगे चतुरवीरांप्रती
चांगली भूषणें चामरें दे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कनकांगी ऐकगे कर्कशा वीरांसी
कनकशशिमालिकाकटकेंही दे
मुदितवदने ऐक मुख्यवीरांप्रती
मकुटरत्नीं खचित मुद्रिकाहीं दे

सू. एणेंरीती निजभटासी विरुदे आणी भूषणें देऊन बोलते निरखा

सज्जोनियां कार्मुख शीघ्र अवघ्या
नंदीश्वराचा समरांत अवग्या
जुंजावयसी ये मजसीं पुरारी
तरी क्षणेंत होईल तो फरारी

सू. एणेंरीती मीनाक्षीने आज्ञापितांचि परस्पर बाणाबाणींत नंदीश्वर पराजय पाऊन श्रीशंकराचेस्मरण करितांचि तो श्रीसुन्दरेश्वर येतो निरखा

प्रावेशिक दरु राग : शहाना – आदिताळ

सुन्दरेश्वर येतो पाहीं
वन्दनीय सुरवर्याहीं ॥ प ॥

चन्द्रशेखर जो जनमोहीं
चारुरूपजनि ज्यासमा नाहीं ॥ अ प ॥

सू. श्री सुंदरेश्वर येतांचि नंदीश्वर साष्टांगप्रणामकरून "स्वामी रक्षा रक्षा" ह्मणतांचि सुन्दरेश्वर बोलतो पहा

सुंद. व - अगाये नंदीश्वरा तुझे भूतगणे असतां याप्रमदांस पाहून घाबिरां झालासीं हे काय आश्चर्य. सू. व - ऐसे ह्मणतांचि नंदिकेश्वर बोलतो पहा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आर्या - घुमविती इतरां भूते, त्यासहिं खेदें पराजयोद्भुतें
भ्रमवी ऐसा प्रमदा, भुलसी माझी जसी प्रसूनमदा

सू. एणेंरीती नंदीश्वराने बोलतांचि श्रीशंकर हासून त्याप्रती आश्वासनकरून मीनाक्षीचा विषमवक्षोज पाहून बोलतो पहा

इन्द्रादिकांसी रणी जिंकूनि गर्व भारी
तां लाधला विपमरूप उरीं धरावी
वक्षोज भव्ययुगळीहुनि गोळ मोटा
त्यातें क्षणें हरि सुंदर तेसि कांटा

सू. एणेंरीती श्रीशिवानें बोलतांचि कनकांगी अन्यापदेशें चपलक्षीप्रती बोलते परिसा

हृदयजतनु त्यालाहुनी अद्रिसंधी
तपुनि शुचिमहत्व बोहटूं लक्षसाधी
मग शुचिनयनानें पाहतां तो न भासे
सुचपलनयनें तूं हे पाहगे तमासे

सू. आणीक एक आश्चर्य !

सोन्याचा नग पाहुनी पृथुलसा त्या भोंवतें भोंवती
मी साधीन तथा नवग्रह असे ते संधिपैं लक्षिती
त्यामध्यें मग पुष्पवंत शिवभ्रूवोनि पूजाफळें
हेमाचे नग ज्याकडें बहुत त्यामेरुद्वया लाधले

सू. एणेंरीती सख्या परस्परें बोलत असतां मीनाक्षी आपला रजशांति पाहून आश्चर्य मानितांचि, चपलाक्षी येऊन हाच तुझा भर्तार क्षणून कर्णी सांगतांचि धनुर्भाण घेऊन फार लज्जा होऊन मेदिनी अवलोकित उभीराहतां थोर सुंदरेश्वर तिजला मोहून बोलतो परिसा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जन्यांगणी चतुर केवळ राजकन्या
वन्या मृगा मृगपतीपरि वीरमान्या
सन्यासि या भुलविसी दिटि कामशून्या
अन्यासि ना वरि करी मजलागि धन्या

सू. याप्रकारें शिववचन ऐकून लज्जावती, ऐसी मीनाक्षी बोलने परिसा

मीनाक्षी वचन - पाणिग्रहणविषईं कांचनमालिकेचे आज्ञाविना मी स्वतन्त्र नव्हे

सू. व. - एसे ह्मणून शिवाप्रति सांगून मंदहासे निजप्रेम जाणऊन आपुल्या नगराप्रति येतांचि श्रीसुंदरेश्वर तीचा वियोगें निजनयनविजित मनसिजशर पराजित होऊन अत्यंत शिणत होतां नंदिकेश्वराप्रती बोलतो पहा.

दरु — राग : घंटा – आदिताळ

भुललो मी निज मनीं ॥ प ॥

ललनामपि निजमानसी रिझुनी
कलभाषिणी निजहृदयहीं कळउनी
भल त्यामिसे टकवी मजलागुनी
कळना कवणा प्रमदा करणी -१

लजविज केलीलाहीं पुरती
गजगामिनी पाठविलीं निगुती
गजबज तेणें होतसें चित्तीं
तिज पाहीन कैं सखया हें कधीं -२

सू. एणेंरीती श्रीसदाशिव मीनाक्षीचो घटन कोण करवील ह्मणून आलोचन करीत असतां नारद येता निरखा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आर्या - घुमविती इतरां भूते, त्यासहिं खेदें पराजयोद्भुतें
भ्रमवी ऐसा प्रमदा, भुलसी माझी जसी प्रसूनमदा

सू. एणेंरीती नंदीश्वराने बोलतांचि श्रीशंकर हासून त्याप्रती आश्वासनकरून मीनाक्षीचा विषमवक्षोज पाहून बोलतो पहा

इन्द्रादिकांसी रणी जिंकूनि गर्व भारी
तां लाधला विषमरूप उरीं धरावी
वक्षोज भव्ययुगळीहुनि गोळ मोटा
त्यातें क्षणें हरि सुंदर तेसि कांटा

सू. एणेंरीती श्रीशिवानें बोलतांचि कनकांगी अन्यापदेशें चपलक्षीप्रती बोलते परिसा

हृदयजतनु त्यालाहुनी अद्रिसंधी
तपुनि शुचिमहत्व बोहटूं लक्षसाधी
मग शुचिनयनानें पाहतां तो न भासे
सुचपलनयनें तूं हे पाहगे तमासे

सू. आणीक एक आश्चर्य !

सोन्याचा नग पाहुनी पृथुलसा त्या भोंवतें भोंवती
मी साधीन तथा नवग्रह असे ते संधिपैं लक्षिती
त्यामध्यें मग पुष्पवंत शिवध्रुवोनि पूजाफळें
हेमाचे नग ज्याकडें बहुत त्यामेरुद्वया लाधले

सू. एणेंरीती सख्या परस्परें बोलत असतां मीनाक्षी आपला रजशांति पाहून आश्चर्य मानितांचि, चपलाक्षी येऊन हाच तुझा भर्तार ह्मणून कर्णी सांगतांचि धनुर्भाण घेऊन फार लज्जा होऊन मेदिनी अवलोकित उभीराहतां थोर सुंदरेश्वर तिजला मोहून बोलतो परिसा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जन्यांगणी चतुर केवळ राजकन्या
वन्या मृगा मृगपतीपरि वीरमान्या
सन्यासि या भुलविसी दिटि कामशून्या
अन्यासि ना वरि करी मजलागि धन्या

सू. याप्रकारें शिववचन ऐकून लज्जावती, ऐसी मीनाक्षी बोलने परिसा

मीनाक्षी वचन - पाणिग्रहणविषईं कांचनमालिकेचे आज्ञाविना मी स्वतन्त्र नव्हे

सू. व. - एसे ह्मगून शिवाप्रति सांगून मंदहासे निजप्रेम जाणऊन आपुल्या नगराप्रति येतांचि श्रीसुंदरेश्वर तीचा वियोगें निजनयनविजित मनसिजशर पराजित होऊन अत्यंत शिणत होतां नंदिकेश्वराप्रती बोलतो पहा.

दरु — राग : घंटा – आदिताळ

भुललो मी निज मनीं ॥ प ॥

ललनामपि निजमानसी रिझुनी
कलभाषिणी निजहृदयहीं कळउनी
भल त्यामिसे टकवी मजलागुनी
कळ्ना कवणा प्रमदा करणी -१

तजविज केलीलाहीं पुरती
गजगामिनी पाठविलीं निगुती
गजबज तेणें होतसें चित्तीं
तिज पाहीन कैं सखया हें कधीं -२

सू. एणेंरीती श्रीसदाशिव मीनाक्षीची घटन कोण करवील ह्मणून आलोचन करीत असतां नारद येतो निरखा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु — राग : मोहन – मिश्रताळ

सुरमुनीं येतो पाहीं
सुमति भूतिभूषित शुभदेहीं ॥ १ ॥

परम मंजुळवीणा धरूनियां पाहीं
हर नामावळी वाजवी गायहीं ॥ अ १ ॥

माझीं शोभे व्याघ्रांजिनवसन
माथां जटाजूट भासुर पूर्ण
हे जीवीं करी सकलाचि आपण
हर्षें नाचत तकतधिंगिण -१

सू. एणेंरीती नारद येऊन, श्रीशंकरास नमनकरून बोलतो पहा. नारद - व - अगायें परमेश्वरा तूं जितकाम होऊनहीं प्राकृतजनापरीं मन्मथवेदनेने कां शिणतोस. नारदाची वचन ऐकून शंकर बोलतो पहा.

म्या जितिला मदन मीसदशापदासीं
सेवोनि तत्कुचगिरीन्द्र महापदासीं
लाहोनि जो वितरितो मज आपदासीं
तो गुप्तभिल्लवनि जेविं चतुष्पदांसी

सू. एणेंरीती शंकराचेवचन ऐकून नारद सहास्य बोलतो निरखा - नारद - अगाये परमेश्वरा तूंहीं मीनाक्षीचा सुखकर सत्वर अवलंबून अपारसुखातें पाव. सू - व - ऐसें ह्मणतांचि सुंदरेश्वर बोलतो पहा. शि - व - अगाये नारदा तूं अघटितघटनाचतुर चतुराननकुमार जाहल्या करितांच हे घटना करावी. सू - व - ऐसें ह्मणतांचि नारद बोलतो पहा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

भूता सर्वे संचारितो कपाळी
वस्त्रादिकीं केविं कळल पाळी
एसें न बोलो जन त्या नृपाळीं
घे दिव्यवेषा ममवाक्य पाळीं.

सू. एणेंरीती नारद बोलून श्रीसुंदरेश्वराची आज्ञा घेऊन कदंबवनाप्रति जातांचि पुन्हा शंकर विरहभरें बोलतो परिसा.

दरु

राग : गोळिपन्तु – आदिताळ

कीरवाणी ते वेल्हाळी
केव्हां भेटले आनंदमेळीं ॥ प ॥

धीर धरवेना यावेळीं
कीरमानस बहु तळमळी ॥ अ प ॥

मंद गंधवाह वाहे
मैंदसा चरतो भासतां हे
चांदहीं निजकरें पोळविता हे
चदनाची उटीहीं न साहे -१

सरून पूर्वील वैरासी
स्मर वर्षिति जट शरांसी
परम शिण केविं कथिजे पराशी
कर देईल कैं सुखराशी -२

सू. याप्रकारें विरहभरें सुंदरेश्वर वनोवनीं फिरत असतां मीनाक्षी कांचनमालिकेस आपण दिग्विजयकेला वृत्तांत कथून आणी सुंदरेश्वराचे कृपाकटाक्षें विषमस्तन लोपला वृत्तांत निवेदून विरह सोसवेना असें अंतरंग सखीजना समवेत निजाराम-वाटीकेस येतो निरखा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु

राग : जुजावंती – आदिताळ

देवी मीनाक्षी महा

दिव्यरूपा येते पहा ॥ प ॥

देवी बर जो त्यास्मर हा

सेऊं करितचि ऊहापोहा ॥ अ प ॥

सू. एणेंरीतीं मीनाक्षी येऊन विरहभरें बोलते निरखा.

दरु

राग : फरजु – आदिताळ

मी काय करूं गजगमने

मी कैसें करूं शशिवदने ॥ प ॥

तो कां नये सुमरदने

तूं सांगावो शुभवचने ॥ अ प ॥

अदय मदन करी, हृदयविदारण

हृदयजमदहर, सदय नये कां ॥ चरण ॥ -१

मीनाक्षी वचन - अवो ये सखी माझा प्राणसखा कोठें गुंतलाकीं कळेना.

दरु

राग : श्रीराग – आदिताळ

सोमसुंदर कां नये अझुणी

सोय ना धरी कां निजमनी

प्रेम दावोनि मज भुलवोनी

प्रीती गुंतला कवणेचे सदनी -१

सू. एणेंरीती मीनाक्षी शिणत असतां मन्मथ प्रत्यक्ष आला असे भासुनी घाबिरी होऊनी बोलते परिसा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मी. व - अगाये सना प्रहरूं नकां. मी सरहर नव्हें नीट पहा.

दरु

राग : देवगांधारी – आदिताळ

भुललासी मदना भुललासी

अलक जटा माना जाणसी ॥ प ॥

सू. याप्रकारें मन्मथ प्रत्यक्ष येऊन ताडित्यासारिखें भाऊन रोमांच स्वेदभय कंपादिका तें पाऊन ज्वाला ऐसा मीनाक्षी सख्यानां शीतलोपचार जाग करितांचि कोण येकसखी पटाक्षेप येऊन बोलते पहा.

सखीवचन - अगे ये स्वामिणी, नारदें तुझ्या वराडयाचे बोलणे कांचनमालिकेजवळी बोलतां, त्यावरून मदनमदहर सत्वर येईल चिंता करूं नकां - सू - व - ऐसा पटाक्षेप दूतिकाने सांगतांचि मीनाक्षी सख्यसी बोलते पहा.

दरु

राग : यमुनाकल्याणी – आदिताळ

साजणी कैं पाहीन प्राण विसावा

सत्वर त्या दावा ॥ प ॥

सजला स्मर मिळउनी समुदावा

मजसी करी दावा

गजगामिनी गजबिज ते मम मनें

तजविज करूनी ममशिव भजावा -१

सू. एणेंरीतीं मीनाक्षी विवांहार्थ निजसमुदायासीसहित सुमंत्री येतो निरखा.

दरु

राग : नायकी – आदिताळ

मंत्री मांदें येतसे पहा

मन सुवेदार महा ॥ प ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तंत्रीवर फार कुशल हा
ताकीद करी जन समूहा ॥ अ प ॥

सू. एणेंरीती मंत्री येऊन चारास पाहून ताकीद करितां निरखा.

दरु

राग : मणिरंग – आदिताळ

मणिमय तेजो कलामंटप चांगला
झणि रचवोनि भूपाळां जवें आणावा सकळा -१

सू. एणेंरीती चारास ताकीद केल्यानंतर कल्याणमंटप निर्माण करावयाकारणें विश्वकर्मा ताकीद करितांचि स्वसेवकासहित विश्वकर्मा येतो निरखा.

विश्वकर्मा येतो पाहीं
वेगें निज शिल्पीं समूहीं
विश्वा प्रतिकल्पीं लवलाहीं
विवाहमंटप विरचूं महीं -१

सू. एणेंरीती विश्वकर्मा येऊन विवाहमंटप निर्माण केल्यानंतर जोशी येतो पहा.

दरु

राग : पुन्नागवराळी – आदिताळ

जोशी मोदें येतसे पाहीं
जो मे बहु भव्यदेहीं
राशी ग्रहफळ जाणे सकलहीं
ज्यासी समान न दिसे महीं

सू. एणेंरीती जोशी येऊन मुहूर्त सांगीतल्यानंतरेंचि सचिवानें चारुमुखें, अंगवंग कळिंगादिदेशा पाहून सकल भूपालासी बोलाऊन पाठवितां ते राजे सकळ येताती निरखा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दरु

राग : आसावरी – आदिताळ

राजे येताती मांदें पाहीं
रतशिवा विवाहीं ॥ प ॥

लाजे ज्या देखुनी तो रतिपतिहीं
लावण्य समूहीं
राजराज शिरताजे सुदेहीं
भोज गाजविती भ्राजमानमहीं -१

सू. एणेंरीती राजे सकळ आल्यानंतर नारदवाक्य अनुसरून सुंदरेश्वर विवाहार्थ गुंडोधर नंदिकेश्वरादीकाशींसहित येतो निरखा.

दरु.

राग : पंतुवराळी – आदिताळ

सोम येतसे सुंदरसें ॥ प ॥

उल्हास सोमसुरवरस्तोम मान्ये
निष्काममूर्ति जितकाम ह्मणवितां
कामजत्राण प्रकामविरहें
वामलोचना काममानसें -१

सू. एणेंरीती सुंदरेश्वर येतांचि ब्रह्मादिसकल देवऋषिगणासींसहित येताती निरखा.

दरु

राग : जंजोटी – मिश्रताळ

केशवादिक लोकाधीश येताती पहा
व्यासादिकमुनीहीं हव्यसा धरोनि विवाहीं -१

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सू. एणेंरीती सर्वत्रदेव आणि ऋषीश्वर येऊन हेच मुहूर्त ह्मणून मीनाक्षीसुंदरेश्वरास दिव्यासनी बसऊनी अंतर्पाट धरून मंगळाष्टक वदताती निरखा.

मंगळाष्टक

श्रीमत्सुंदरनाथ दिव्यनवरा मीनेक्षणानोवरी
जोडी निस्तुल चांगली विलसते तेजोगळी भूवरी
त्याकल्याणमहोत्सवासी निरखूं आली नृपाची फुलें
देवश्रेष्ठहीं ते करीत कुतुकें यादंपती मंगळें

सू. एणेंरीती मंगळाष्टक वदल्यानंतर अंतर्पाटसोडून लग्न लाविलानंतर सुरवधू गाताती निरखा.

श्रीशंभो जयजयाश्रितपालाकृतविजया
हे सर्वाणीप्रिया हेमाद्रीशशया
भूतिविभूषितदेहा भुवनाधारा सुमहा
भूतिप्रदा रक्षीं हा भोशिव वोक्षावाहा.

सू. यापरी चारीदिवस सुखसोहळे करून सर्वत्रांस वस्त्राभरणदेऊन रिसभोगसाडें सकलसन्नाह निशी मिरविणी आणी लक्ष्मीपूजाहीं होतांचि श्रीसुंदरेश्वराप्रति नारद बोलतो परिसा.

वरी सदर्थातरि तेचि वाणी
अर्थेंविणें केवल दीनवाणी
वाणीविना अर्थकसा विकासें
तैसीच जोडी तुमची प्रकाशें

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

देवी जिणेसी अमरेंदुमुखा करातें
घेवोनि सर्ववितरीं तुजशंकरातें
घेई पदातरथ अश्वकनेक पाळीं
मांदें शिवा निजसुभक्त अनेकपाळी

सू. याप्रकारें नारदानें प्रार्थितांचि त्याचेमनोरथ पूर्णकरून सुंदरेश्वरें यापरिवारें नित्यानंदमंदिरास चालिले निरखा.

दरु

नित्यनंदमंदिरासी
निगमस्तु जो निखिलवासी
अत्यानंदें मीनाक्षीसी आला
अद्भुतगण सुखराशी -१

स्वशक्ती नेलाकीं जणुनि सकळां देवनिकरा
करातें लाहोनि धन वसन भूषा परिकरा
कराया क्षेमातें निजजनसमूहाप्रति महा
महादेव प्रेमे डुलत विलसें निस्तुलमहा.

श्रीमद्भोसलसुंदरवारिधि भवप्रख्यत जो चन्द्रमा
चन्द्रोत्तंसकृपाकटाक्षलहरी ज्यालाभली सांद्रमा
ज्ञातृत्वें जनकापरीच जगती पाळी महाराज तो
ऐसा श्रीतुळजेन्द्रनंदनविभू सिंहासनी राजतो.

सू. ऐसा नवरसज्ञशिखामणी राजराजाग्रणी चोळदेशधणी श्रीशरभेन्द्रमहाराज तयाचे सन्निधानी सकलबुधवरनिकर करुणापात्र ऐसा रंगनाथकवि अत्यंतहर्षभरें आशीर्वाद करितो निरखा.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मीनाक्षीपरिणय भव्यनाटकासी
कल्पोनि विबुधवरासी सौख्यदेशीं
नादें तूं जनि सकुटुंबपुत्रपौत्रीं
पाळी दिग्विजय करोनि याधरित्रीं.

वर्षोतकाळीं बहुमेघराजीं
होवो सदा सस्यवती धराजी
असो तुला लोक समस्तराजी
होवेत कल्यणपरंपराजी.

॥ श्रीरस्तु ॥

इति श्रीभोंसलकुलकलशोदधिजनितकलानिधि श्रीजन्द्रमौळीश्वरवरप्रसादलब्ध चोळसिंहासनसंपत्संतति सुविराजमानसार्वभौम महाराजछत्रपती भूलोकदेवेन्द्र श्रीशरभेन्द्रभूपाळविरचित मीनाक्षीपरिण्याभिधाननाटक संपूर्ण.

॥ श्रीरामार्पणमस्तु ॥

॥ श्रीरामजयम् ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आ
भरतनि